ॐ

"वासिष्ठादि सर्व सिद्धांतसार"

द्वितीय प्रकरण.

प्रारब्ध--प्रयत्नादि भेदवादखंडन



ग्रंथकार, लेखक व प्रकाशक

शंकर यशवंतशास्त्री वाफगांवकर, पुराणीक

मु. पुणें

मुद्रक-बा. भा. जोशी, ज्ञानविलास प्रेस, पुणें.

...ी, माघ व. ९ शके १८९०

... १२ आणे.



ॐ

" वासिष्ठादि सर्वसिद्धांतसार "

द्वितीय प्रकरण


प्रारब्ध-प्रयत्नादि भेदवादखंडन



ग्रंथकार, लेखक व प्रकाशक

शंकर यशवंतशास्त्री वाफगांवकर, पुराणीक

मु. पुणें




मुद्रक-बा. भा. जोशी, ज्ञानविलास प्रेस, पुणें.


आवृत्ति १ ली, माघ व. ९ शके १८५०



किंमत १२ आणे.







॥ प्रस्तावना ॥

वाचकांस इतकेंच विदित करावेंसें वाटतें कीं, हा ग्रंथ छांपण्या-पूर्वीं आमचा मूळसंकल्प असा होता कीं, या ग्रंथाचें एकएक प्रकरण छापून त्याच्या विक्रीनें जें द्रव्य प्राप्त होईल, त्याच द्रव्याच्या मदतीनें पुढील एकेक प्रकरण छापून, अशा क्रमानें हा समग्र ग्रंथ छापून प्रसिद्ध करावा. पण सांप्रत आमच्या देशकालपरिस्थितीनें हा संकल्प व्यर्थ होत आहे. याचें कारण, जगांत कोणताही बाह्य व्यवहार सिद्ध होण्यास द्रव्य, मनुष्यांची सहायता व शरीरसंपत्ति वगैरे जीं साधनें अवश्य लागतात, या तिन्हीही गोष्टींचा आमचे ठिकाणीं अत्यंत अभाव असल्यामुळें, हीं छापून तयार असलेलीं प्रकरणेंसुद्धां प्रसिद्ध करून मुमुक्षु वाचकांच्या हस्तगत होतील अशी व्यवस्था व व्यवहारदक्षता, आमचेकडून होणें दुर्घट झालें आहे. आणि दुसरें असें कीं, आमची बाह्यव्यवहाराविषयीं निरंतर पराङ्-मुखता, व ऐकांतिक स्थितींत कालक्रमणा करण्याची संवय आम्हांस अस-ल्यामुळें, द्रव्याधीन वगैरे असणारे कोणतेही व्यवहार आमचेकडून होत नाहींत. त्यामुळें, हीं छापलेलीं तीन प्रकरणें व न छापलेलीं बाकीचीं महत्वाचीं प्रकरणें, कोठेंतरी पडून राहिल्यामुळें भक्त व मुमुक्षूंच्या हस्तगत न होतां, मूषकांच्या हस्तगत होतात कीं काय, असा नेहमीं संशय उत्पन्न होतो. आणि दुसरें असें कीं, या ग्रंथांतील प्रतिपाद्य विषय अलौकिक अस-ल्यामुळें अनधिकारी लोकांस तो दुर्बोध आहे. त्यामुळें “ मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ” या न्यायानें वेदांतशास्त्रसिद्धांतरहस्य-प्रतिपादक अशा या ग्रंथवाचनाचे ठिकाणीं प्रवृत्त होणारे याचे ग्राहक

जगांत फारच थोडे. त्यामुळें या छापलेल्या प्रकरणांची विक्री होऊन त्या पैशाचा उपयोग पुढील प्रकरणें छापण्यास होईल, हें दुर्घटच दिसतें. ह्मणून थोडक्यांत तात्पर्य बोलावयाचें ह्मणजे इतकेंच कीं, हा समग्र ग्रंथ छापून प्रसिद्ध होण्यास, यासंबंधानें वर निर्दिष्ट केलेली, बाह्य व्यवहार सिद्ध होण्याची जी मुख्य साधनसामुग्री, तिची आमचे ठिकाणीं जी न्यूनता आहे, ती न्यूनता, धार्मिक, लक्ष्मीउपासक, आणि ग्रंथज्ञ, अशा एखाद्या मुमुक्षु महात्म्यानेंच पूर्ण करण्याचें मनांत आणिलें तरच हा समग्र ग्रंथ लौकरच प्रसिद्ध केला जाईल. " न्यूनं संपूर्णतां याति भवबंधात्प्रमुच्यते " यापेक्षां न्यूनतेची पूर्णता करणारास आणखी आशीर्वचन तें काय बोलावें ?

ग्रंथकार.



"प्रारब्धप्रयत्नादि भेदवादखंडन" या प्रकरणाची

अनुक्रमणिका.

पूर्वार्ध

उत्तरार्ध

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

उपोद्घातप्रारंभः

शंका—शिष्य ह्मणतोः—गुरुमहाराज ! मी आपणांस विनंतिपूर्वक असें विचारतों कीं, मनुष्यमात्र जीवाकडून घडून येणाऱ्या सर्व शुभाशुभ कर्मकर्तृत्वाविषयीं स्वातंत्र्य जीवाकडे आहे कां ईश्वराकडे आहे ? कां, सर्व जीव सर्वथैव प्रारब्धाधीनच आहेत ? कारण कांहीं शास्त्रवाक्यें, जीवाकडून पापपुण्यात्मक घडणारे सर्व तऱ्हेचे व्यवहार ईश्वराधीन आहेत असें सांगतात; व कांहीं वाक्यें " स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः " ह्मणजे सर्व लोक आपआपल्या प्रारब्धकर्मसूत्रांत बद्ध असल्यामुळें, कोणतेंही कर्म करणें, त्यांच्या व ईश्वराच्याही स्वाधीन नाहीं; तर तें प्रारब्धाधीन आहे, असें सांगतात. तसेंच ' कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतं ' ' तस्मात्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ' इत्यादि विधिनिषेधबोधक वाक्यें, जीवांत सर्व तऱ्हेच्या कर्मकर्तृत्वाविषयीं स्वातंत्र्य आहे, असें दर्शवितात, व त्या त्याप्रमाणें अनुभवही येतो. तेव्हां प्रारब्ध, प्रयत्न, आणि ईश्वर, या तीन वादांमध्यें कर्मकर्तृत्वाविषयीं स्वातंत्र्यपारतंत्र्यासंबंधानें मुख्य प्राधान्य कोणाला आहे ? ह्मणजे प्रारब्धवाद श्रेष्ठ ह्मणावा, का प्रयत्नवाद श्रेष्ठ ह्मणावा ? का उपासक लोकांचा ईशकर्तृकवाद श्रेष्ठ ह्मणावा ? (यांत मुख्य सिद्धांत कोणचा व येथील वाक्यविरोधपरिहार कसा ? हें मला कळत नाहीं.) या विषयांत मला महान् मोह उत्पन्न होत आहे. तेव्हां आपण मजवर कृपा करून या शंकेचें निरसन करावें, अशी माझी आपणांस विनंतिपूर्वक प्रार्थना आहे.

उत्तर—गुरु ह्मणतात—बा शिष्या ! फार उत्तम प्रश्न केलास. या विषयासंबंधानें तुलाच मोह उत्पन्न झाला आहे असें नाहीं, तर जगांत बहुतेक पंडित ह्मणविणारे लोक सुद्धां या विषयांत मोहित झालेले आहेत. आणि हा विषयही तसाच वादग्रस्त असल्यामुळें, स्वात्मस्वरूपाचें अभेद-

ज्ञान ज्यांना झालेलें नसतें त्या लोकांना कळणेंही दुर्घटच आहे. कारण स्वस्वरूपाचें अज्ञान जेथपर्यंत कायम आहे, तेथपर्यंत या अशा तऱ्हेच्या अनेक शंका चित्तांत राहणें साहजिकच आहे. असो—आतां या विषया-संबंधानें पारमार्थिक आणि व्यावहारिक असे दोन्हीही प्रकारचे सिद्धांत मी तुला सांगणार आहें. कारण शास्त्रांत प्रत्येक विषयासंबंधानें कोठें तरी व्यावहारिक आणि पारमार्थिक असे दोन्ही प्रकारचे सिद्धांत सांगितलेले असतात; परंतु ते लक्षांत न आल्यामुळें असा घोटाळा उडतो. अविद्या-ध्यारोप स्वीकारून भेददृष्टीनें शास्त्रांत कोणत्याही विषयासंबंधानें जी भाषा केली जाते, व जो निर्णय ठरतो, त्यास व्यावहारिक दृष्टि, किंवा व्यावहारिक सिद्धात असें ह्मणतात. कोणताही व्यावहारिक दृष्टीनें झालेला सिद्धांत, हा व्यभिचारी ह्मणजे दोषी असून व्यवहारापुरतेंच त्यांत सत्यत्व असतें. पारमार्थिक सत्यत्वाचा गंधही त्यांत नसल्यामुळें खरें समाधान व आत्यंतिक निःसंशयता त्यानें होत नाहीं. खरें समाधान आणि मुक्तता, ही पारमार्थिक सिद्धांतविचारानेंच प्राप्त होते. ह्मणून मुमुक्षूनें नेहमीं पारमार्थिक सिद्धांतविचारच अवश्य केला पाहिजे. पारमार्थिक विचार ह्मणजे केवळ स्वात्मविज्ञानविचार, आणि जग-न्मिथ्यात्वविचार, एवढाच होय.

शिष्या ! स्वात्मविज्ञान कसें होतें वगैरे हा प्रकार आह्मीं तुला पूर्वीच्या 'आत्मसाक्षात्कार' नामक प्रकरणांत सविस्तरपणानें सर्व सांगितलाच आहे. आतां जगन्मिथ्यात्वविचार आणि अवशिष्ट राहिलेले वेदान्तशास्त्रांतील सर्व सारभूत सिद्धांतविचार, हें प्रकरण झाल्यानंतर आह्मी अन्य प्रकरणांत तुला सांगणार आहों.

वास्तविक मोक्ष किंवा आत्मज्ञान, हें प्रारब्धाधीन कधींच नाहीं. तसें असतें तर आजपर्यंत सर्व जीव केव्हांच मुक्त होऊन गेले असते. तेव्हां मोक्ष हा विचाररूप स्वप्रयत्नावरच अवलंबून आहे. सद्गुरुद्वारा सच्छास्त्र-श्रवणमननादि साधनेंकरून सर्व तऱ्हेच्या विषयवासना निवृत्त करणें, येवढ्या बाबतींतच जीवांना प्रयत्न करण्याविषयीं स्वातंत्र्य आहे. पण कित्येक

अविचारी लोक आळसानें संसारबंधनिवृत्तीविषयीं ईश्वर किंवा प्रारब्ध यांवर भिस्त ठेवून स्वस्थ राहातात. ते कधींही संसारबंधनांतून मुक्त होणें शक्य नाहीं. म्हणून परमार्थसाधनाविषयीं यथाशक्ति प्रयत्न करणें, हें जीवांच्या स्वातंत्र्यावर अवलंबून आहे. प्रारब्ध किंवा ईश्वर:यांचे आधीन नाहीं हें मुमुक्षूंना सिद्ध करून दाखविण्याकरितांच या प्रकरणास आरंभ आहे.

शिष्या ! पूर्वीं तूं जो प्रश्न केलास, हा केवळ स्वात्मविचारापैकीं पारमार्थिक दृष्टीचा आहे, असें नाहीं, तर अविद्याध्यारोपान्त:पाती व्यावहारिक दृष्टीचा तुझा प्रश्न असल्यामुळें आम्ही प्रथमतः या विषयासंबंधानें तुला पारमार्थिक सिद्धांताचें उत्तर न देतां, तुझ्या प्रश्नानुसार व्यावहारिक सिद्धांताचेंच उत्तर देऊन नंतर शेवटीं या विषयाचा पारमार्थिक सिद्धांत सांगणार आहों. यद्यपि हा तुझा प्रश्न केवळ पारमार्थिक नाहीं, तथापि पारमार्थिक विचाराला पुष्कळ प्रकारानें अनुकूल आहे. म्हणून यासंबंधानें आम्ही तुला काय विवेचन सांगतों, हें नीट एकाग्र चित्तानें श्रवण कर.

जगांत या विषयासंबंधानें तीन प्रकारचे मतवादी लोक आहेत, ते असे:—(१) प्रारब्धवादी, (२) प्रयत्नवादी (३) आणि उपासक लोक ईश्वरवादी, असे तीन प्रकार आहेत. यांपैकीं अगोदर प्रत्येक मतवाद्याचें मत काय व कसें ? हें मी तुला पुढें क्रमानेंच सांगणार आहें. व या पुढील व्याख्यानांत प्रथम सांगितलेल्या मताचें दुसऱ्या मतानें खंडण कसें ? व दुसऱ्या मताचें तिसऱ्या मतानें खंडण कसें ? व मंडण कसें ? हें सांगून, नंतर पारमार्थिक सिद्धांतमतानें सर्वच मतांचा खंडणप्रकार कसा हें मी तुला प्रकरणोपसंहारांत सांगणार आहें. असो, आतां या तीन प्रकारच्या मतवाद्यांचा मतभेद आणि विवाद असण्याचें खरें कारण म्हणजे हेंच आहे कीं, या वादी लोकांना प्रारब्ध, प्रयत्न, जीव आणि ईश्वर, यांचें पारमार्थिक ऐक्यस्वरूप यथार्थ कळलेलेंच नसतें. म्हणूनच ते स्वस्वपक्षाचा अभिमान बाळगून व्यर्थ कलह करितात. यद्यपि शास्त्रवाक्यांचे ठिकाणीं प्रसंगोपात्त या तिन्ही वादांना श्रेष्ठत्व वर्णन केलें आहे, तथापि शास्त्राचें पारमार्थिक रहस्य काय आहे, आणि कोणकोणत्या विषयांत

प्रारब्धादिकांना शास्त्रकारांनीं प्राधान्यत्व सांगितलें आहे, हें वर्म वाद्यांच्या लक्षांत येत नसल्यामुळें, अविचारानें तें तें शास्त्रवाक्यप्रामाण्य घेऊन आपआपल्या पक्षासच ते प्राधान्यता मानतात. पण वास्तविक पाहिलें असतां या वादी लोकांचा आंतून एकाही मताविषयींचा एक पूर्ण ठाम निश्चय झालेला नसतो. प्रसंगोपात्त त्यांचा तो स्वमताविषयींचा निश्चय केव्हां तरी ढासळला जातो. प्रयत्नवाद्यांच्या प्रयत्नाची गति एखादे वेळीं कुंठित झाली असतां, व त्या प्रयत्नाचें फल इच्छेप्रमाणें त्यांना प्राप्त झालें नाहीं म्हणजे मग त्यांना आंतून प्रारब्धवादच श्रेष्ठ वाटूं लागतो. तसेंच ईश्वर मुळींच नाहीं, असें म्हणणारालासुद्धां एखादे वेळीं आपल्या अक्कलेच्याबाहेर एखादी अतर्क्य गोष्ट घडून आली असतां, किंवा ती अन्यत्र कोठें दृष्टश्रुत झाली असतां, अथवा आपल्या शरीरावर प्रत्यक्षच एखादें भयंकर संकट उपस्थित झालें असतां, त्या वेळीं मात्र त्याला जगाचा नियंता कोणी तरी अद्भुत सामर्थ्यवान् ईश्वर असलाच पाहिजे असें वाटूं लागतें! याप्रमाणें प्रत्येक मतवाद्यांचा स्वमताविषयीं प्रसंगोपात्त आंतून निश्चय पालटतो. याचें कारण हेंच कीं, प्रारब्ध म्हणजे काय? प्रयत्न ह्मणजे काय! ईश्वर कोण? व आपण कोण? हेंच मूळांत त्यांना यथार्थ कळलेलें नसतें.

वास्तविक तात्विक दृष्ट्या पाहिलें असतां, प्रारब्ध, प्रयत्न, जीव आणि ईश्वर, यांच्या तात्विक स्वरूपांत यत्किंचित्ही निरनिराळा भेद नाहीं. या सर्वांचें मिळून स्पंदात्मक स्वरूप एकच आहे. आणि हें सर्व मिळून हा कर्मात्मक चित्स्पंद मायिक ह्मणजे मिथ्या आहे. हें पारमार्थिक रहस्य त्यांच्या लक्षांत येत नाहीं. ह्मणून स्वस्वमतांविषयीं झालेला त्यांचा व्यावहारिक सिद्धांतनिश्चय कायम राहात नाहीं. अहो! या वादी लोकांचा, किंवा कोणाचाही, प्रारब्धप्रयत्नादि वादापैकीं कोणत्या कां मतांचा होईना पण एकच पूर्ण निश्चय जरी राहाता, तरी पारमार्थिक अद्वैतसिद्धांतास बाध आला नसता. कारण पारमार्थिक दृष्ट्या प्रारब्धादि या सर्वांचें मिळून स्वरूप एक आहे. फक्त या चित्स्पंदांचीं व्यवहारार्थ नामें मात्र निरनि-

राळीं आहेत, एवढेंच. अवयवअवयवी दृष्टांतानें यांचें स्वरूप एक असल्यामुळें प्रारब्धादिकांपैकीं कोणाचीही प्राधान्यता जरी त्यांनीं मानिली, तरी बाकीच्या मतांचा त्यांतच अंतर्भाव आपोआप होत असल्यामुळें आमच्या अद्वैतसिद्धांतास बाध येत नाहीं.

पण वादी लोकांचा एकाच वादाविषयीं पूर्ण एकत्वनिश्चय राहात नसल्यामुळें पारमार्थिक आणि व्यावहारिक, अशा दोन्हींही सिद्धांतांस धोका बसतो. तिन्हीही वादांना प्राधान्यत्व आहे, असें प्रतिपादन करणाऱ्या तीन प्रकारच्या वाक्यांची एकवाक्यता, जीव, ईश्वर आणि कर्म यांची स्वरूपेंकरून एकरूपता आहे, असें जाणल्यावांचून होत नाहीं. हें वर्म वाद्यांच्या लक्षांत येत नाहीं, त्यामुळें त्यांनीं आपआपल्या स्वमतानें ठरविलेला सिद्धांत, विचाराअंतीं अपवादात्मक ठरला जातो. किंवा त्यांच्या स्वतःच्या मतानेंच प्रसंगाअंतीं तो ढासळतो. म्हणून प्रारब्ध—प्रयत्नादिकांत भेद मानून कां होईना, पण तो तरी एकनिश्चय ठरला पाहिजे. त्यावांचून समाधान नाहीं.

असो. येथपर्यंत या प्रकरणाचा उपोद्घात समाप्त झाला.




॥ श्री ॥

॥ विषयारंभः ॥

संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण

यांचें स्वरूपवर्णन.



शंका—शिष्यः—गुरुमहाराज! मी आपणांस अगोदर असें विचारतों कीं, संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण, अशा तीन प्रकारच्या कर्माचें स्वरूप काय? हें आपण मला एकदा कृपा करून सांगा. म्हणजे पुढील आपल्या व्याख्यानांतील सर्व प्रक्रिया माझ्या नीट लक्षांत येईल.

उत्तर—गुरुः—ऐक. या तिघांचेंही स्वरूप क्रमानेंच तुला थोडक्यांत सांगतों. अनादि कालापासून पूर्वीच्या अनेक मनुष्यदेहांतच जीं अनंत प्रकारचीं पापपुण्यात्मक कर्में देहाभिमानेंकरून या जीवानें बुद्धीचे ठिकाणीं वासनात्मक सूक्ष्म संस्काररूपानें करून ठेविलीं असतात, त्यांपैकीं ज्या कर्माच्या फलभोगास अझून आरंभ झालेला नाहीं, अशा बुद्धिस्थ असणाऱ्या वासनात्मक सूक्ष्म कर्मसमूहास संचित कर्म असें म्हणतात.

आतां प्रारब्धाचें स्वरूप सांगतों ऐक. त्या पूर्वसंचित कर्मांपैकींच सांप्रत अगदीं फलोन्मुख झालेल्या अशा कांहीं कर्माच्या फलभोगास आरंभ होण्याकरितां, ज्या कर्मानें हें वर्तमान शरीर उत्पन्न झालें आहे व ज्या पापपुण्यात्मक कर्माचा या वर्तमान देहांत सांप्रत फलभोग सुरूं झाला आहे, त्या कर्मास प्रारब्ध कर्म असें म्हणतात.

आतां क्रियमाण कर्माचें किंवा प्रयत्नाचें स्वरूप ऐक. स्वस्वरूपाच्या अविचारामुळें आणि भोग्य पदार्थांविषयीं मिथ्यात्वनिश्चय नसल्यामळें आणि जीव हा स्वतः कर्ताभोक्ता नसून मिथ्या देहाभिमानेंकरून पापपुण्याचें कर्तृत्वभोक्तृत्व पत्करतो म्हणून, या सर्व कारणांमुळें देहाकडून प्रारब्धानुसार होणाऱ्या सर्व शुभाशुभ क्रियेचेच, भोगकालीं नवीन

जे अनेक सूक्ष्म वासनासंस्कार उत्पन्न होतात, त्या नूतन वासनासंस्कारांनाच क्रियमाण कर्म असें म्हणतात. केवळ या देहाकडून घडून येणाऱ्या पापपुण्यात्मक क्रियेला क्रियमाण कर्म म्हणत नाहींत. कारण देहाकडून घडणाऱ्या सर्व क्रिया आणि भोग हे प्रारब्धांतर्गतच आहेत. हें क्रियमाण कर्माचें रहस्य अवश्य लक्षांत ठेविलें पाहिजे.

शंका-शिष्यः—यावर मी आपणांस असें विचारतों कीं, याविषयीं कित्येकांचें म्हणणें असें आहे कीं, जन्मापासून तों मरेपर्यंत जीवाच्या हातून जें जें शुभाशुभ कर्म घडत असेल, तें तें सर्व प्रारब्धानुसार असल्यामुळें प्रारब्ध कर्मच होय. नवीन क्रियमाण होतच नाहीं व तें करण्यास जीवाला अवसरही नाहीं. आणि जीवाच्या तें स्वाधीनही नाहीं. फक्त प्रारब्धभोग संपला कीं जीव सुटला. किंवा पूर्वीचें संचित कर्म पुन्हां शिल्लक राहिलें असल्यास तें भोगण्याकरितां आणखी जेवढ्या देहाची अपेक्षा लागेल तेवढे देह धारण करून तें संचित संपवून टाकलें कीं हा जीव मुक्त होतो. पाप किंवा पुण्य नवीन होतच नाहीं. जें होत असेल तें पूर्वीच्या ठरावापैकींच होत असतें. आणि आपलें म्हणणें तर प्रारब्धभोगकालींच नवीन क्रियमाण कर्म उत्पन्न होतें! तेव्हां तें कसें? हें मला एकदा पुन्हां नीट समजावून सांगा.

उत्तर—गुरु म्हणतात—शिष्या! यांतील रहस्य पुन्हा ऐक. वास्तविक हा जीव स्वस्वरूपेंकरून अकर्मरूप स०अक्रिय, अद्वितीय, ब्रह्मरूप आहे. हा कोणत्याही क्रियेचा कर्ता नाहीं, म्हणून भोक्ताही नाहीं. अशी वस्तुस्थिति खरी असून " अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते " " अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः " या भगवदुक्तीवरून स्वस्वरूपाचा विचार न केल्यामुळें, अज्ञानावृत–बुद्धि असा होऊन देहच मी असें प्रथमतः अध्यस्त ठरवून कर्ता व भोक्ता होतो. वास्तविक " प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः " म्हणजे प्रकृतीकडून किंवा देहाकडून सहज स्वभावतःच सर्व क्रिया होत असून हा ' अहंकार-

विमूढात्मा ' असा होऊन सर्व कांहीं मीच करतों असा बळेंच कर्तृत्वाभिमान आपले माथीं घेतो. त्यामुळें तें प्रारब्धकर्मच क्रियमाणरूप बनून पुन्हा संचित कर्मांत भर पडते, व त्या संचितापासूनच पुन्हा प्रारब्ध तयार होतें. याप्रमाणें हें संसारचक्र कधींच थांबविल्यावांचून थांबत नाहीं. म्हणून " पुनः पुनः चक्रवदीर्यते भवः " असें म्हटलें आहे. आणि " देहाभिमानादभिवर्धते क्रिया, विद्या गताहंकृतितः प्रसिध्यति " या श्रीरामगीतेंतील वचनांत प्रारब्धभोग सुरू असतां क्रियमाण कर्म उत्पन्न होण्याचें कारण हेंच सांगितलें आहे कीं, देह आपण नसतां, मीच देह आहें असें मूर्खपणामुळें मानतो, म्हणून देहाभिमानेंकरून जेवढी शुभाशुभ क्रिया होते तीच वासनात्मकरूपानें क्रियमाणांत किंवा प्रयत्नांत गणली जाते. आणि सांप्रत निरभिमानानें व भोक्तृत्वरूपानें होणारी क्रिया प्रारब्धांत गणली जाते. ह्मणून केवळ एक प्रारब्धभोगाची क्रिया सुरू असतां, तिच्यापासूनच दुसरी क्रिया वरील कारणामुळें त्याच काळीं उत्पन्न होते. म्हणून क्रियमाण कर्म घडून येण्यास अन्य कालाची व पृथक् देहाची आणखी अपेक्षा लागत नाहीं. आतां तूं असें पहा कीं, तत्ववेत्ता आणि अज्ञपुरुष, या दोघांच्या देहांकडून शुभाशुभ क्रियेचें आचरण पूर्वकर्मानुसार सारखेंच घडतें. पण त्यांत " नैव किंचित् करोमीति युक्तो मन्येत तत्ववित् " " गुणा गुणेषु वर्तंत इति मत्वा न सज्जते " ॥ याप्रमाणें तत्ववेत्ता आपल्या अकर्तृत्व व निश्चल, निर्विकार स्वरूपाला जाणून, मी कांहींच करीत नाहीं, सर्व कांहीं स्वभावतःच होत असतें, असा निश्चय करीत असल्यामुळें त्याचे ठिकाणीं कर्तृत्वभोक्तृत्वाचा अभिमान यत्किंचितही उत्पन्न होत नाहीं. म्हणून त्याच्या त्या देहादि प्रकृतीकडून स्वभावतःच अज्ञ जनांप्रमाणें सर्व कांहीं शुभाशुभ क्रिया घडत असतांही, तो निरभिमान आणि वासनारहित असल्यामुळें त्याच्या सर्व क्रिया फक्त प्रारब्धांतच गणल्या जातात, क्रियमाणांत गणल्या जात नाहींत. कर्ता व भोक्ता जो चिदाभास त्याहून तो तत्ववेत्ता अत्यंत निराळा, साक्षिरूपानें असतो. अज्ञ पुरुषांना स्वतःचें स्वरूप कळत नसल्यामुळें त्यांना देहा-

भिमान हा उत्पन्न होणारच; व त्यामुळें देहेंद्रियांकडून घडणाऱ्या कर्माचा हा कर्ता होत असल्यामुळें त्याचें तें प्रारब्धच क्रियमाणरूप बनून संचितांत जमा होतें. याविषयीं वामनांनीं कर्मतत्वांत असें ह्मटलें आहे कीं,

ब्रह्मज्ञ अज्ञ सम भोगिति पुण्यपापें ।
अज्ञास जोडति नवीं क्रियमाणरूपें ॥
अज्ञ प्रयत्न करिती क्रियमाणधर्में ।
तें ज्ञानियासि न घडे इतुकेंचि वर्में ॥ १ ॥

असो—आतां हें क्रियमाण कर्म उत्पन्न होण्याचें आणखी कारण असें कीं, स्वस्वरूपाचा अविचार आणि भोग्य पदार्थाविषयीं पूर्णमिथ्यात्व निश्चय नसणें, या दोन कारणांमुळें भोग्य पदार्थाविषयीं प्रथमतः प्रियाप्रियबुद्धि उत्पन्न होऊन भोगकाळीं प्रिय पदार्थाविषयीं पुन्हां नवीन वासना उत्पन्न होऊन अंतर्यामीं राहते व तीच पुढें जन्ममरणास कारण होते. म्हणून सर्व विषयाचे ठायीं स्वप्नवत् मिथ्यात्वनिश्चय होत नसल्यामुळें पुन्हां पुन्हा तद्ग्रहणाविषयीं बुद्धीचे ठायीं वासनासंस्कार होऊन राहणें याळाच क्रियमाण कर्म असें म्हणतात, हें पूर्ण लक्षांत ठेव. ज्याप्रमाणें एकाच वृक्षाच्या शाखेपासून त्याच फांदीला दुसऱ्या उपशाखा फुटतात, त्याप्रमाणें एकाच प्रारब्धकर्मरूप शाखेपासून क्रियमाणरूपानें दुसऱ्या उपशाखा त्यास फुटतात.

शिष्या ! आणखी एक तत्व लक्षांत ठेव कीं, प्रारब्धकर्माचीं स्थूल आणि सूक्ष्म अशीं दोन स्वरूपें आहेत. देहाकडून प्रत्यक्ष कोणतीही क्रिया घडून येणें हें प्रारब्धाचें स्थूळ स्वरूप होय. आणि ती चांगली किंवा वाईट क्रिया घडत असतां, त्या क्रियेचा व क्रियाकर्तृत्वाचा नवीन एक प्रकारचा संस्कार उत्पन्न होऊन अंतःकरणाचे ठिकाणीं राहणें, हें प्रारब्धाचें सूक्ष्म स्वरूप होय. या सूक्ष्म स्वरूपालाच क्रियमाण कर्म किंवा जीवाचा प्रयत्न असें म्हणतात. या क्रियमाण कर्माची प्रवृत्ति किंवा निवृत्ति करणें, हें जीवाच्या स्वाधीन आहे. म्हणून यालाच पौरुष प्रयत्न असें म्हणतात.

प्रारब्धाच्या स्थूल स्वरूपाची निवृत्ति करणें मात्र जीवाच्या स्वाधीन नाहीं हें तूं वर्म लक्षांत ठेव.

आतां क्रियमाण कर्माची आणि प्रारब्धाची तुला चांगली ओळख पटण्याकरितां किंवा या दोहोंतील भेद कळण्याकरितां, पुन्हां अन्य रूपानें याचें स्पष्टीकरण करून सांगतों. कारण हा विषय फार सूक्ष्म आहे. म्हणून याचा चांगल्या रीतीनें अवश्य विचार केला पाहिजे.

तूं असें पाहा कीं, ज्ञानी आणि अज्ञानी या दोन्ही पुरुषांच्या हातून पूर्वींच्या प्रारब्धकर्मानुसार मातृहत्या आणि अगम्यागमन अशा तऱ्हेचें पापकर्म होऊन चुकलें. (अज्ञान्याच्या हातूनच पापकर्म घडतें आणि ज्ञात्याच्या देहाकडून तें घडत नाहीं, असा मात्र तूं नियम समजूं नकोस. कारण दोघांचाही देह त्रिगुणात्मक असल्यामुळें त्रिगुणात्मक कर्म, हें न्यूनाधिक प्रमाणानें दोघांकडूनही घडणारच. म्हणूनच " सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि " असें भगवंतांनीं म्हटलें आहे.) तेव्हां ज्ञात्यांकडून लोकदृष्ट्या अगम्यागमन आणि मातृवध हें पापरूप कर्म झालें, असें जरी दिसलें, तरी त्याच्या दृष्टीनें त्याला देहच नसल्यामुळें त्याच्याकडून कोणतेंच कर्म घडत नाहीं. कारण "ब्रह्मविद्ब्रह्मैव भवति" या श्रुतिवचनावरून ब्रह्मवेत्ता सदैव ब्रह्मरूपच असतो. अर्थात् ब्रह्म हें निष्क्रिय असल्यामुळें त्याचे ठायीं कोणतेंच कर्म संभवत नाहीं. म्हणून ब्रह्मवेत्त्याला नवीन क्रियमाण कर्म तर संभवत नाहींच. पण " क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे " येथील ' कर्माणि ' या बहुवचनावरून प्रारब्धकर्महीं लोकदृष्ट्याच तत्त्ववेत्त्याला असतें. तें खरें नाहीं. त्याच्या दृष्टीनें त्यास प्रारब्ध व संचित हीं नाहींत. मग क्रियमाण कोठचें ! म्हणून " हत्वापि स इमान् लोकान् न हंति न निबध्यते " म्हणजे लोकदृष्ट्या त्यानें मातृवधच काय, पण या सर्व ब्रह्मांडास जरी मारिलेंसें दिसलें, तरी स्वस्वरूपदृष्ट्या तो कोणालाच मारीत नाहीं, म्हणूनच बद्ध होत नाहीं. " उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते " म्हणजे मारणारा आणि मरणारा, हे दोघेही

जर ती हननक्रिया आपले ठिकाणीं सत्य मानीत असतील तर त्या दोघां-
नाही अक्कल नाहीं, असें म्हटलें पाहिजे. कारण ‘ नैनं छिंदंति शस्त्राणि ’
या वचनावरून आत्मदृष्ट्या हा मारणाराही सिद्ध होत नाहीं व मरणा-
राही मरत नाहीं, असें भगवान् सांगतात. जगत्संहारकाळीं शंकर सर्व
ब्रह्मांडाला जाळून टाकतात, म्हणून काय त्यांच्या हातून तें क्रियमाणकर्म
घडलें जातें कीं काय ? तर नाहीं. फक्त अज्ञ प्राण्यांच्या कर्मानुसार हनन-
क्रियेला ते निमित्तमात्र असतात, म्हणून त्यांचे हातून अशी हननक्रिया
घडत असते. तात्पर्य, ब्रह्मवेत्त्यांच्या हातून दैहिक दृष्ट्या जरी मातृवध
किंवा अगम्यागमनादि पापकर्म किंवा पुण्यकर्म घडलेंसें दिसलें, तरी “ लि-
प्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ” या न्यायानें तो त्या कर्मांपासून
लिप्त होत नाहीं. त्याचा स्वतःचा बोध श्रुति असा सांगते कीं, “ किमहं
साधु नाकरवं किमहं पापमकरवमिति ” तथा च “ नैनं कृताकृते
तपतः ” या श्रुतीचा अर्थ असाः—‘ काय हो ! माझ्या हातून पुण्यकर्म
मुळींच घडत नाहीं, केवळ पापच घडतें, ’ असा अज्ञ लोकांप्रमाणें ज्ञात्यास
खेद कधींच वाटत नाहीं. वाशिष्ठेपि उक्तं “ यथा पर्वतमादीप्तं
नाश्रयंति मृगा द्विजाः ॥ तथा ब्रह्मविदो दोषा नाश्रयंति कदाच-
नेति ॥ अर्थ—ज्याप्रमाणें प्रखर वणव्यानें पेटलेल्या पर्वताचा आश्रय पशु
आणि द्विज म्हणजे पक्षी हे करीत नाहींत, त्याप्रमाणें ज्ञानाग्नीनें शुद्ध
असणाऱ्या ब्रह्मवेत्त्याजवळ पाप राहात नाहीं. “ ज्ञानाग्निः सर्वकर्माणि
भस्मसात् कुरुतेऽर्जुन ” इतिस्मरणात् ।

अज्ञ जनांप्रमाणेंच आत्मवेत्त्याच्या हातून अगम्यागमनादि किंवा
मातृवधादि पापकर्में घडत असल्याचें दिसत असूनही, तीं क्रियमाणरूपानें
त्यास जन्मादि दुःख देण्यास समर्थ कां होत नाहींत ? याविषयीं शत-
श्लोकींत आचार्यांनीं एक दृष्टांत हाच दिला कीं,

स्वप्ने कुर्वन्नगम्यागमनमुखमघं तेन न प्रत्यवायी ।
तद्वज्जाग्रद्दशायां व्यवहृतिमखिलां स्वप्नवद्विस्मरेच्चेत् ॥

अहो ! स्वप्नांत जर अगम्यागमनादि पाप वगैरे केलें, तर जागें झाल्यावर तद्विषयक कांहीं प्रायश्चित्त घ्यावें लागतें काय ? तर नाहीं. याचें कारण स्वप्नांत कर्ता, कर्म, वगैरे वास्तविक कोणतीही क्रियाच घडत नाहीं, असा जागृत झाल्यावर आपणांस बोध होत असल्यामुळें, तत्प्रत्यवाय लागण्याची आपणांस भीति राहत नाहीं. त्याप्रमाणें तत्त्ववेत्ता हा सर्व क्रियाकारकादि जाग्रत्संसार, स्वप्नतुल्य मिथ्या आहे, असें जाणत असल्यामुळें, त्याच्या हातून पूर्व वेगानें प्रारब्धानुसार पापपुण्यात्मक कोणतेंही कर्म घडत असल्याचें दिसत असलें, तरी त्याच्या ठिकाणीं त्या कर्माची वासना व कर्तृत्वअभिमान राहत नसल्यामुळें त्याचें तें कर्म क्रियमाणांत गणलें जात नाहीं. आतां त्याच्या उलट अज्ञ मनुष्य मात्र ‘ माझ्या हातून मातृवध, अगम्यागमन वगैरे झालें, हें खरेंच आहे, व मी त्याचा कर्ता आहें,’ असें मानतो. याचें कारण स्वरूपजागृतिच त्याला झाली नसल्यामुळें, असें मानणें साहजिकच आहे. त्यामुळें त्याचें तें अकर्म असूनही क्रियमाण कर्म बनतें. त्यामुळें वृथैव जन्ममरणादि दुःखें त्यास भोगावीं लागतात.

असो—शिष्या ! या एकंदर व्याख्यानावरून प्रारब्ध आणि क्रियमाण कर्म यांचें स्वरूप तुझ्या लक्षांत आलेंच असेल. आणि प्रारब्धापासूनच क्रियमाण कर्म कां व कसें उत्पन्न होतें, हेंही तुझ्या लक्षांत आलें असेल. आतां यांत तुला रहस्य इतकेंच सांगावयाचें आहे कीं, प्रारब्ध आणि क्रियमाण, या दोन वस्तु भिन्न नाहींत, व त्यामुळें त्या निराळ्याही करून दाखवितां येणार नाहींत. फक्त आपल्या मूर्खपणामुळें यांत एकाचे दोन भेद होऊन, दोहोंचे तीन भेद झाले आहेत. वास्तविक संचित, क्रियमाण आणि प्रारब्ध, यांचें स्पंदस्वरूप एकच आहे, भिन्न नाहीं. याचा तूं बारिक विचार करून पहा. वास्तविक क्रियमाण कर्मच संचित आणि प्रारब्धरूप बनून राहिलें आहे. किंवा याच्या उलट पाहिलें तरी संचित कर्मच प्रारब्ध व क्रियमाणरूप बनलें आहे. मिळून कर्मात्मक स्पंदजाति एकच आहे. जसें चक्र एकच असतें, पण त्याचे फेरे व आरा निरनिराळ्या दिसतात, त्याप्रमाणेंच हा नमुना आहे. म्हणून रामगीतेंत

" पुनःपुनश्चक्रवदीर्यते भवः " असा दृष्टांत दिला आहे.

असो——शिष्या, तूं पूर्वीं असें विचारिलें होतेंस कीं, क्रियमाण कर्म मुळींच कोणाच्याही हातून होत नाहीं, जन्मापासून तों मरेपर्यंत जें होतें, तें सर्व प्रारब्धच आहे, तें भोगानें संपलें कीं हा जीव मुक्त होतो. तूं जो हा चार्वाक मताचा आक्षेप घेतलास, हा अगदीं शास्त्र व अनुभव यांच्या विरुद्ध आहे. कारण मनुष्याच्या हातून जर क्रियमाण कर्म होतच नसेल, तर संचित व प्रारब्ध हें कर्म तरी मध्येंच कोठून उत्पन्न झालें ? क्रियमाण केलें म्हणूनच तें प्रारब्धरूपानें आतां भोगावयास आलें आहे. नाहींतर कृतप्रणाश व अकृताभ्यागम* हे दोष प्राप्त होतात याची वाट काय ? तेव्हां तुझ्या ह्मणण्याप्रमाणें जन्मादारभ्य मरेपर्यंत केवळ प्रारब्ध कर्माचाच भोग सुरूं राहणें, नवीन क्रियमाण उत्पन्न न होणें, हा न्याय फक्त ब्रह्मवेत्याचेच ठिकाणीं लागू होतो. सर्व मनुष्यमात्रांस तो लागू नाहीं. बाबा रे ! स्वस्वरूपाचें अज्ञान आहे तेथपर्यंत बाह्य देहादि विषयांचे ठिकाणीं सत्यत्वबुद्धि ही होणारच; व त्यामुळें विषयांचे ठायीं अहंत्वममत्वाभिनिवेश उत्पन्न होऊन जीवाकडून कांहींतरी क्रियमाण कर्म हें होणारच. तें झालें कीं, तें भोगण्याकरितां जन्म हा येणारच. ही चालत आलेली अनादि परंपरा मूलाज्ञान निवृत्त झाल्यावांचून कधींही थांबणार नाहीं. ह्मणून तें अज्ञान विवेकरूप पौरुष प्रयत्नानें निवृत्त करणें, येवढेंच जीवाच्या स्वाधीन आहे. ह्मणून या भवचक्रांतून सुटण्याचा संभव आहे. तेवढें स्वाधीन नसतें तर केव्हांच सुटका झाली नसती. असो. ह्मणून चार्वाकमतानें तूं पूर्वीं घेतलेली शंका तुच्छ आहे.

शिष्या ! येथपर्यंतच्या व्याख्यानांत तूं विचारल्याप्रमाणें संचित, क्रियमाण आणि प्रारब्ध, या तिघांचें स्वरूप तुला व्यावहारिक दृष्टीनें सांगितलें. आतां आपल्या पूर्वींच्या चालूं विषयाकडे आपण वळूं. प्रारब्ध,

---

* अकृताभ्यागम म्ह० पूर्वीं आपण पाप किंवा पुण्य कांहीं न करितांच विनाकारण त्याचें फळ हल्लीं आपणांस प्राप्त होणें, व कृतप्रणाश म्ह. हल्लीं जें आपण चांगलें किंवा वाईट करतों त्याचा उपभोग न होतां तें नष्ट होणें.

प्रयत्न व ईश्वरवाद, या तीन वादांत प्राधान्यता कोणाला ? असा तूं पूर्वी प्रश्न केला होतास. ह्याचें उत्तर देण्याकरितां त्यांत प्रथमतः अगोदर ईश्वर-वादी जे भक्त उपासक लोक यांचें ह्मणणें काय ? हें तुला सांगतों. नंतर त्याचा खंडणप्रकार सांगूं.

ईश्वरकर्तृतावादनिरूपण

ईश्वरवादी उपासक लोकांचें ह्मणणें असें आहे कीं, कोणतेंही कर्म करण्याचें जीवाच्या स्वाधीन कांहीं नाहीं व प्रारब्धाच्याही स्वाधीन नाहीं. सर्व कर्ताहर्ता परमेश्वरच आहे. त्याच्या आज्ञेवांचून झाडाचें एक पान सुद्धां हालत नाहीं. कर्ता व करविता तोच आहे. याविषयीं ही पुढील श्रुति प्रमाण आहे—

"एष ह्येव साधु कर्म कारयति तं यमेभ्यो लोकेभ्यो उन्निनीषते।
एष उ एवासाधु कर्म कारयति तं यमधो निनीषत इति"

या श्रुतिवचनाचा अर्थ असा कीं, परमात्म्याच्या मनांत ज्या मनुष्याला या लोकाहून अन्य उच्च पदवीला न्यावयाचें असेल त्या मनुष्याकडून तो चांगलींच सत्कर्मे आचरण करवून त्यास उत्तम गतीला नेतो, आणि ज्या मनुष्याला अधोगतीला नेण्याचें प्रभूच्या मनांत आलें असेल त्याकडून तो वाईट कर्माचेंच आचरण घडवून त्यास अधोगतीला नेतो. यावरून सर्व कराविणारा परमात्माच आहे, जीवाच्या आणि प्रारब्धाच्या कांहींएक स्वाधीन नाहीं. ईश्वरवादी ह्मणतात कीं, या सर्व पुढील स्मृतिवचनावरूनही, परमात्माच सर्व कांहीं आहे. व तोच कर्ता करविता आहे, असें दिसतें. तीं स्मृतिवचनें अशीं—

" अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते "

(अर्थ—मीच सर्वांचा प्रभव म्हणजे उत्पत्तिस्थान असून माझ्यामुळेंच जगांतील सर्व कांहीं व्यवहार प्रवृत्त होतात.)

" चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ॥

तस्य कर्तारमपि मां विध्यकर्तारमव्ययम् ॥

(अर्थ–गुणकर्मांच्या विभागानें हे चार वर्ण मींच उत्पन्न केले आहेत. मायोपाधिद्वारा त्यांचा कर्ता मींच असून उपाधिरहितस्वरूपानें अकर्ताही मींच आहें.)

" ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया " (अ. ७)

(ईश्वर सर्व भूतांच्या हृदयांत राहतो, म्हणून देहरूपी यंत्रावर आरूढ झालेलीं हीं सर्वभूतें, आपापल्या कार्यांचे ठिकाणीं प्रवृत्त होतात परमात्मा आपल्या मायारूप किल्लीनें सारखा त्यांना फिरवीत असतो.)

" ये चैव सात्विका भावा राजसास्तामसाश्च ये ॥
मत्त एवेति तान् विद्धि " (अ. १० श्लोक ४)

(हे त्रिगुणात्मक सर्व भाव माझ्यापासूनच प्रवृत्त होतात, असें जाण)

" बुद्धिर्ज्ञानमसंमोहो क्षमा सत्यं दम शमः ।
सुखं दुखं भवो भावो भयं चाभयमेव च ॥
भवंति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥
(अ. ९ श्लोक १५)

(हे वर सांगितलेले सर्व प्रकारचे भाव प्राण्यांचे ठिकाणीं जे होतात, हे माझ्यापासूनच होत असल्यामुळें या सर्वांना कारण अर्जुना, मींच आहें.)

" तपाम्यहमहं वर्षं निगृण्हाम्युत्सृजामि च ।
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥"

(अर्जुना ! मीच सूर्यरूपानें तापतों, पाण्याचें आकर्षण मीच करतों, व पुन्हां सोडतों मीच. अमृत मीच आहें व मृत्युही मीच.) फार तर काय, पण सर्व सदसद्वस्तुही मीच आहें. मद्व्यतिरिक्त दुसरी जगांत वस्तुच नाहीं.)

याप्रमाणें हीं वरील गीतेंतील सर्व वचनें कर्ता व करविता सर्व तोच आहे, असा अभिप्राय दर्शित करणारीं आहेत. यावरून कोणत्याही जीवांत

कसलेंच स्वातंत्र्य नाहीं असें दिसतें. सर्व जीव एखाद्या काष्ठाच्या जड बाहुलीप्रमाणें पराधीनत्वानें वागणारे आहेत. " यथा दारुमयी योषा नृत्यते कुहकेच्छया " इति भागवतेपि उक्तमेव ॥ आतां प्रारब्ध हें तर बोलून चालून जडच आहे. त्यांत कर्तृत्वसामर्थ्य तें काय असणार, हें उघड आहे. तेव्हां वर दिलेल्या श्रुतिस्मृतिप्रमाणांवरून आमचा ईश्वरवादच प्रारब्ध आणि प्रयत्नवादापेक्षां श्रेष्ठ आहे, हें सिद्ध झालें. कारणं प्रारब्ध व प्रयत्नाची जी नियति आहे, हीसुद्धां ईश्वरानेंच ठरविली असल्यामुळें ईश्वरवादालाच प्राधान्यत्व असणें सहजिकच आहे. याप्रमाणें ईशकर्तृत्ववाद्यांचें म्हणणें झालें.

अथ ईशकर्तृत्ववादखंडण

आतां या ईश्वरवाद्यांचें खंडण सांख्य व मीमांसक असें करितात कीं, अहो ! ईश्वरवादिनः, तुम्ही श्रुतिस्मृतिवाक्यें तर खूपच भाराभर जमा केलींत, पण या वाक्यांचें रहस्य मात्र आपणांस अजून निश्चित कळलें नाहीं, असें खात्रीनें म्हणावें लागतें. असो— आतां यावर मी तुला असें विचारितों कीं, तुझ्या मतानें सर्व जर ईश्वर आहे आणि तद्व्यतीरिक्त शुभाशुभ कर्म करणारा वगैरे जर दुसरा कोणचि नाहीं, तर तूं स्वतः कोण आहेस, हें अगोदर सांग पाहूं ! यावरून तूंही ईश्वरच असला पाहिजेस असें ठरतें. पण मी ईश्वर आहें अशी तुझी आंतून पूर्ण निश्चयात्मक खात्री आहे काय ? जर असेल तर वेदांत्यांचा अद्वैतसिद्धांत तुला ठसला, व बाणलाच, असें म्हटलें पाहिजे. पण आंतून खरा तसा निश्चय नसेल तर सर्वच ईश्वर आहे, आणि तोच सर्व करतो, हें म्हणणें मूर्खपणाचें नव्हे काय ? कारण पापपुण्याचा कर्ता व करविता ईश्वर मानल्यास त्या कर्माच्या सुखदुःखादि फलाचा भोक्ताही ईश्वरच मानावा लागेल. कारण जो ज्याचा कर्ता असतो, तोच त्याचा फलभोक्ता असतो; कर्ता एक आणि फलभोक्ता तिसराच, असा न्याय व्यवहारांत सुद्धां कोठें दृष्टश्रुत नाहीं. म्हणून ईश्वर कर्ता मानल्यास दुःखादि फलभोक्ताही तोच ठरतो,



आणि " सदसच्चाहमर्जुन " या तूं दिलेल्या वचनावरून सर्वच ईश्वर मानल्यास जगांत किंचिज्ज्ञ जीव ह्मणून कोणीच नाहींत असें ह्मणावें लागेल. किंवा हे जे अनंत जीव असतात हे सर्व अनंत ईश्वर आहेत असें म्हणावें लागेल. आणि तसें ह्मटल्यास " एको देवः सर्वभूतेषु गूढः " या श्रुतिवचनास बाध येतो, याची वाट काय तें सांग ? आणि

" मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय "

या तूं दिलेल्या वचनावरून व्यावहारिक दृष्टचा सर्वच ईश्वर मानल्यास नियम्य कोटींत कोणीच राहात नाहीं; त्यामुळें ईश्वर कोणाचा नियंता होणार ? आणि ईशितव्य दुसरें कांहींच नसल्यामुळें त्या ईश्वराचें ईश्वरत्वही मिथ्याच ह्मणावें लागतें. तेव्हां बाबा रे, आपली स्वतःची पूर्ण एकत्व दृष्टि बाणल्यावांचून केवळ व्यावहारिकदृष्टचा सर्वच ईश्वर आहे या म्हणण्यानें अशा अनेक तऱ्हेच्या अडचणी उत्पन्न होतात. म्हणून देहात्मबुद्धि जेथपर्यंत आहे, तेथपर्यंत उगीच वाटेल त्यानें वेदान्तमताचा स्वीकार करून, वाटेल त्या वाक्याचा स्वमतानें वाटेल तो अर्थ करून, स्वमताचें श्रेष्ठत्व वर्णन करीत बसण्यांत मतलब काय ? जेथपर्यंत साडेतीन हात देहाचा अभिमान कायम असून जीवाचें जीवत्व कायम आहे, तेथपर्यंत जीवाहून ईश्वराचा उपाधि निराळा आहे व तो ईश्वर एकच आहे, अनंत नाहींत असें मानलें पाहिजे. आणि जीवमात्र अनंत असून पापपुण्याचे कर्तेही जीवच आहेत, कर्ता ईश्वर नाहीं, असेंच तुला व्यावहारिक दृष्टचा मानलें पाहिजे. उगीच अर्धवट वेदांतमत आणि अर्धवट लौकिकमत घेण्यांत मतलब तो काय ?

आतां तुझ्या म्हणण्याप्रमाणें कर्मकर्ता ईश्वर मानून कर्मफलाचा भोक्ताही जर तोच मानला, तर मग जीवांत आणि ईश्वरांत फरक तो काय राहिला हें सांग ? ह्मणून कर्ता व भोक्ता ईश्वर होत नाहीं, हें पुढील श्रुतिस्मृतिवचनांवरूनही सिद्ध होत आहे.

" न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ॥ इति
" न करोति न लिप्यते " .... तसेंच,

" द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते
एकस्तयोः खादति पिप्पलान्नं अन्यो निरन्नो अभिचाकशीति ॥ "

अर्थः—बुद्धिरूप वृक्षाचे ठिकाणीं बसलेल्या दोन पक्ष्यांपैकीं एक जीवरूप पक्षी कर्ता व फलभोक्ता आहे आणि ईश्वररूप पक्षी अकर्ता असल्यामुळें निरन्न ह्म. कर्मफलाचा अभोक्ता आहे, असें ही श्रुति सांगत असल्यामुळें, कर्मकर्ता आणि फलभोक्ता जीवच ठरत आहे. कर्ताभोक्ता ईश्वर ठरत नाहीं. याप्रमाणें तुझ्या सप्रमाण दिलेल्या मतापैकीं एका मुद्याचें येथपर्यंत आम्हीं सप्रमाण खंडण केलें आहे. यावर आणखी काय तुझें म्हणणें असेल तें पुन्हां बोल.

शंका—अहो ! यावर माझें ह्मणणें असें कीं, कर्मकर्ता व फलभोक्ता ईश्वर नसो, पण " एष ह्येव साधु कर्म कारयति " या मागें दिलेल्या श्रुतीवरून जीवाकडून कर्मकारयिता ह्म॰ कर्म करविणारा आणि कर्माचें फल देणारा तर ईश्वर आहे ना ? यावरून जीवांत कोणतेंही कर्म करण्याचें स्वातंत्र्य नाहीं, व तो ईशपराधीन आहे, हा आमचा मुख्य मुद्दा कायमच आहे. याचें कांहीं खंडण असेल तर सप्रमाण बोला !

उत्तर—यावर आमचें यत्नवादी मीमांसकांचें म्हणणें असें कीं, जीवांनीं कर्तृत्वअभिमानानें कोणतेंही शुभाशुभ कर्म जर न केलें तर ईश्वराचे ठिकाणीं कारयितृत्वाचें आणि फलदातृत्वाचें स्वतंत्र सामर्थ्य नाहीं. म्हणजे जीवाच्या प्रयत्नाची अपेक्षा न धरतां केवळ एकट्या ईश्वरांत तें सामर्थ्य नाहीं, असें आमचें ह्मणणें आहे. याविषयीं प्रमाण—वेदांतशास्त्रकर्ते, सूत्रकार व्यास महर्षींचें ह्मणणें असें आहे कीं, (सूत्रभाष्य अ. ३, पाद २, सूत्र ४३)

" कृतप्रयत्नापेक्षस्तु विहितप्रतिषिद्धा वैयर्थ्यादिभ्यः "

या सूत्राचा व त्यावरील भाष्यकारांचा अभिप्राय असा कीं, हा जीव जर शुभाशुभ कर्माचा साभिमान कर्ता होत असेल तर मात्र ईश्वराचे ठायीं औपचारिक कारयितृत्व आणि कर्मफलदातृत्व संभवेल; नाहीं तर

तेंही संभवणार नाहीं. कारण जीवांनीं केलेल्या क्रियमाणरूप कर्मांच्या प्रयत्नाची अपेक्षा न घेतां सृष्टींच्या उत्पत्तिस्थितिसंहारादिकांविषयीं जर कर्तृत्व, कारयितृत्व आणि फलदातृत्वाचें सामर्थ्य ईश्वराचे ठिकाणीं संभवेल, तर त्याचे ठिकाणीं नैर्घृण्यादि दोष प्राप्त होतील. ह्मणजे जीवांनीं कर्तृत्वअभिमान न धरितां व कांहीं एक कर्म न करितां, जर ईश्वर त्यांकडून कर्मांचा कारयिता व बळेंच सुखदुःखादि फलदाता होईल, तर ईश्वर निर्दय ठरला जाईल. कारण जगांत एकाला सुखी व एकाला दुःखी असें विनाकारण ईश्वराला करण्याचें काय कारण ? म्हणून जीवकृत प्रयत्नाच्या अपेक्षेनेंच ईश्वर मायोपाधीनें कारयिता, फलदाता, व सृष्ट्यादिकर्ता होतो. नाहीं तर परमात्मा आत्माराम पूर्णकाम असल्यामुळें त्याला हा धंदा करण्याचें प्रयोजन काय असणार ! ह्मणून कोणतेंही कर्म करण्याचें सामर्थ्य व स्वातंत्र्य जीवाकडेच आहे. ई र करवितो ह्मणून जीव करतो, हें म्हणणें व्यर्थ आहे, आणि तें शास्त्रविरुद्ध आहे. जीव कर्ता होतो म्हणून ईश्वर त्याकडून कारयिता होतो, हा वरील सूत्रांतील " कृतप्रयत्नापेक्षस्तु " एवढ्या वाक्याचा भावार्थ झाला. व्यास म्हणतात, जीवांत स्वतः कांहींच कर्म करण्याचें सामर्थ्य व स्वातंत्र्य जर नसतें, तर सर्व विधिनिषेधात्मक शास्त्रांना वैयर्थ्य आलें असतें. अर्थात् जीव कर्मकर्तृत्वाविषयीं ईशपराधीन नसून कांहीं प्रयत्नाविषयीं स्वतंत्र आहे, हें सूत्रांतील उत्तरार्धानें सिद्ध झालें. आणि जीव जेव्हां कर्मांचा कर्ता होतो. तेव्हांच ईश्वर कारयिता व फलदाता होतो. तोही पण जीवाच्या प्रयत्नसामर्थ्यानें औपचारिक किंवा औपाधिकच होतो, खरा नाहीं, हें रहस्य होय, असा ' एष ह्येव साधु कर्म कारयति ' या श्रुतीचा व वरील सर्व सूत्राचा अंतःस्थ भावार्थ होय.

यावर आणखी ज्यांना शंका असतील त्यांनीं वर दिलेल्या सूत्राचें सविस्तर भाष्य पहावें. ह्मणजे तेथें सर्व शंका निवृत्त होतील.

शंका—अहो ! आपण प्रत्यक्ष व्याससूत्र प्रमाण दिलेंत, आतां

यावर माझें बोलणें खुंटलें. पण माझी अंतःस्थ मळमळ अझून नाहींशी झाली नाहीं. म्हणून मी पुनः आपणांस असें विचारतों कीं,

" अन्नं ब्रह्मा रसो विष्णुर्भोक्ता देवो महेश्वरः "
" त्रीन् लोकान् व्याप्य भूतात्मा भुंक्ते विश्वभुगव्ययः "

या वचनाचे ठायीं तर भोक्ता व भोजयिता हरिच आहे, असें प्रत्यक्ष सांगितलें आहे, आणि मागें जीं मीं अनेक स्मृतिवचनें सांगितलीं, त्यांतही कर्ता, कारयिता, भोक्ता, सर्व परमात्माच आहे, असें सांगितलें असून, तुम्ही तर कर्ता व भोक्ता, जीवच आहे असें ठरविलेंत ! तेव्हां हीं मीं दिलेलीं श्रुतिस्मृतिवचनें खोटीं म्हणावीं कीं काय ? याचें उत्तर सांगून या तुमच्या व माझ्या वाक्यांचा विरोधपरिहार कसा होतो, हें तरी मला एकदां कळूं द्या.

उत्तर—या आक्षेपावर वेदान्ती असें उत्तर देतात कीं, अरे ! तूं ज्या वाक्यावरून परमात्मा कर्ता व भोक्ता ठरवितोस, त्या वाक्यांचा वास्तविक अंतःस्थ अभिप्राय तसा नाहीं. तर " द्वे रूपे ब्रह्मणः मूर्तं चामूर्तं च " या श्रुतीवरून ब्रह्माचीं दोन रूपें आहेत, एक अमूर्त ह्मणजे निर्गुण, निरूपाधिक; आणि दुसरें विद्या व अविद्योपाधिक. अशीं दोन रूपें आहेत. त्यांत " विद्ध्यकर्तारमव्ययं " या वाक्याचा अभिप्राय परमात्मा निर्गुण अव्ययरूपानें केवळ अकर्ता, अभोक्ता असा आहे. आणि " तस्य कर्तारमपि मां " या वचनाचा अर्थ परमात्मा वास्तविक कारयिता व फलदाता नसून मायोपाधीनें तो असल्यासारखा होतो असा आहे. ज्याप्रमाणें एखादा राजा स्वतः आपण शत्रूचा संहारकर्ता नसून, ह्मणजे सैन्यद्वारा संहारकर्ता असून, राजानें शत्रूचा संहार केला असा त्यावर आरोप होतो; किंवा सूर्य जगांतील कोणतीही क्रिया करीत नाहीं व प्रकाशनक्रियाही मुद्दाम बुद्धिपूर्वक करीत नसून त्याच्या सत्तेनें जगांतील सर्व क्रिया होत असल्यामुळें सूर्यावर क्रियाकर्तृत्वाचा जसा आरोप होतो, त्याप्रमाणें प्रकृतीकडून सर्व क्रिया होत असतांना, परमात्म्यावर कर्तृत्वकारयितृत्वाचा आरोप करून तो

कर्ता व कारयिता आहे, असें लौकिक दृष्ट्या (औपचारिक) बोलण्याचा शास्त्रवाक्यांचा (उपासनासिद्ध्यर्थ) अभिप्राय आहे.

आतां " भोक्ता देवो महेश्वरः " " तस्य कर्तारमपि मां " " निगृण्हाम्युत्सृजामि च " ददामि बुद्धियोग तं " " मत्तः सर्वं प्रवर्तते " वगैरे जीं स्मृतिवाक्यें तूं दिलींस, यांचा अभिप्राय असा आहे कीं, परमात्मा स्वस्वरूपेंकरून म्हणजे निरुपाधिक ब्रह्मरूपेंकरून अकर्ता अभोक्ता जरी आहे, तथापि " जीवेनानुप्रविश्य सच्चत्यच्चाभवत् " या श्रुतीवरून ईश्वरच अविद्योपाधिद्वारा जीवरूपानें या शरीरांत प्रविष्ट होऊन, पापपुण्याचा कर्ता व फलभोक्ता झाला आहे. आणि विद्योपाधीनें म्हणजे मायोपाधीनें जीवाकडून कर्मकरविता आणि कर्मफलाचा दाता असा झाला आहे. आणि निर्गुण, निराकार, निरूपाधिक स्वरूपानें अकर्ता अभोक्ता असा आहे. एवंच " सदसच्चाहमर्जुन " वगैरे जीं वाक्यें आहेत यांचा अभिप्राय सोपाधिक व निरुपाधिक रूपानें सर्वच परमात्मा आहे असें सांगण्याचा आहे; स्वस्वरूपानें कर्ता–भोक्ता तो आहे, असें सांगण्याकडे नाहीं. तुम्ही उपासक लोक अशा व्यवस्थेनें वाक्यविरोधपरिहार जाणत नाहीं व श्रुतिस्मृत्यादि वाक्यांचा पारमार्थिक भाव जाणत नाहीं, म्हणून तुमचें तें एकदेशी मत अवश्य खंडणीय आहे. मीं जो वरती दोन्हीही प्रकारच्या विरोधी वाक्यांचा अभिप्राय सांगितला हाच अभिप्राय हरिमीडे स्तोत्रांत आचार्य बोलून दाखवितात—

" क्षेत्रज्ञोऽयं कारयिता जंतुषु कर्तुः । कर्ता भोक्तात्माऽत्र हि
चिच्छक्त्यधिरूढः ॥ तं संसारध्वांतविनाशं हरिमीडे ॥ २१ ॥

अर्थ–हा परमात्माच अविद्याख्य चिच्छक्तीवर आरूढ होऊन, जीवरूपानें कर्ता व भोक्ता होतो. त्याचप्रमाणें मायाख्य चिच्छक्तीवर आरूढ होऊन हाच क्षेत्रज्ञरूपानें जीवाकडून कर्मकरविता व जीवाच्या कर्मानुसार प्रारब्धरूपानें फलदाता होतो. यावरून तात्पर्य असें निघतें कीं, प्रकृतीचा (म्हणजे प्रारब्ध आणि जीवाच्या प्रयत्नाचा) स्वीकार केल्यावांचून ईश्व-

रास कांहीं एक करतां व करविंतां येत नाहीं. या कामांत तो स्वतः असमर्थ किंवा पंगू आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. फक्त कोणत्याही कार्याला ' सत्ता, स्फूर्ति आणि ज्ञानप्रकाश करणें, एवढेंच काम ईश्वराचे स्वाधीन आहे. भगवान् सुद्धां स्वतः तोंडानें असेंच बोलतात कीं,

" अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ॥
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवामि युगे युगे ॥ "
" प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ॥ " इत्यादि.

अर्जुना, मला स्वतःला जन्म जरी नाहीं, मृत्यु जरी नाहीं, मी सर्वांचा ईश्वर जरी आहें, तथापि प्रकृतीचा व माझा अध्यस्तसंबंध झाल्यावांचून मला कांहींच करतां येत नाहीं. म्हणून कल्पित संबंधानें मी आपल्या प्रकृतीचा स्वीकार करून, नंतर मग मी वाटेल तें करूं शकतों. म्हणून सर्वकर्तृत्व, कारयितृत्व, भोक्तृत्व वगैरे धर्म माझे नाहींत. हे सर्व प्रकृतिधर्म असून मूर्ख लोक श्रुतिस्मृतींचा यथार्थ अर्थ न जाणतां माझ्यावर आरोप करितात.

" प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः "

या वचनावरूनही परमात्मा कर्ता करविता नसून सर्व प्रकृतिच करते, असें होतें. ह्मणून केवळ एकटाच ईश्वर सर्व कांहीं करतो, हें म्हणणें चुकीचें आहे. कर्तृत्वादि धर्म सर्व प्रकृतीचे असून त्यांचा ईश्वरावर आरोप कसा होतो ? याविषयीं तुला पुन्हा दृष्टांत सांगतों एक. मेघांच्या आड असणारा चंद्र स्वतः निश्चळ असून तो मेघांच्या धावण्यानें धावत सुटला आहे, असा त्यावर जसा आरोप करितात, त्याप्रमाणें जीव आणि ईश या दोघांवरही, हा कर्तृत्वभोक्तृत्वाविषयीं केवळ आरोप मात्र आहे. आतां ईश्वराच्या कारयितृत्वाविषयीं आणि फलदातृत्वाच्या आरोपाविषयीं दुसरा दृष्टांत असा समज कीं, चुंबक मण्याच्या संन्निध असणारें लोह जसें केवळ त्याच्या सांन्निध्यामुळें आपोआप फिरूं लागतें, चुंबक त्यास हेतुपूर्वक फिरवीत नाहीं, फार तर काय, पण चुंबकास लोहाचें फिरणें माहीतसुद्धां नसतें; पण त्यास चलित करण्याचा आरोप जसा त्या चुंबक-

मण्यावर होतो, त्याप्रमाणें—

"ईश्वरः सर्वभूतानां० भ्रामयन् सर्व भूतानि"

म्हणजे ईश्वर सर्वांच्या हृदयांत राहून सर्व जीवांना आपआपल्या कार्यांचे ठायीं फिरवितो, किंवा प्रेरणा करतो, वगैरे. हा ईश्वरावर केवळ सांनिध्यधर्मामुळें वृथैव आरोप केला जातो. वास्तविक तो कोणाला पाप किंवा पुण्य करण्याविषयीं प्रेरणा करीत नाहीं व कोणाकडून करवीतही नाहीं, व जीवरूपानेंही तो कांहींच करीत नाहीं व कोणाला सत्तास्फूर्ति व प्रकाश करण्याची क्रियाही करीत नाहीं. चुंबकवत् किंवा दीपवत् निश्चल आहे तसाच आहे. वसिष्ठ म्हणतात—

"दीपः प्रकाशनार्थैव न करोति पुनः क्रियां ।
तथैव परमात्माऽयं नवै किंचित् करोति वै ॥"

ज्याप्रमाणें दीप, चोरांना किंवा सावांना आपल्याकडून प्रकाश व्हावा या हेतूनें प्रज्वलित होत नाहीं, किंवा हेतुपूर्वक कोणतीही क्रिया करीत नाहीं, केवळ त्याच्या अस्तित्वामुळें व प्रकाशस्वभावामुळेंच सर्वांच्या सर्व क्रिया होत असून त्या दीपावर प्रकाशनक्रियेचा आरोपमात्र होतो; तूं असें पहा कीं, एका चोरानें दिव्याच्या प्रकाशांत चोरी केली, त्यामुळें त्याला सर्व जिनसा सांपडल्या. कर्मधर्मसंयोगानें त्या चोरास राजानें पकडलें आणि विचारलें कीं, तुला या कामांत मदत कोणीं केली? व ही बुद्धि कां झाली? तें सांग. चोर ह्मणाला, दीपानें या कामांत प्रकाश करण्याची मला मदत केल्यामुळें मला सर्वच माल सांपडला, व तो चोरण्याची बुद्धि झाली. तेव्हां या पापाला अर्धा वाटेकरी दीप असल्यामुळें अर्धी शिक्षा त्यास केली पाहिजे. तात्पर्य, हें जसें मूर्खपणाचें भाषण असून दीपावर जसा प्रकाशनक्रियेचा व्यर्थ आरोप केला जातो, त्याप्रमाणें—

"एष ह्येव साधु कर्म कारयति" 'ददामि बुद्धियोगं तं"
"मत्तः सर्वं प्रवर्तते"

वगैरे वाक्यांवरून मूर्ख लोक असें ह्मणतात कीं, ईश्वरच बरेंवाईट

करण्याची सर्वांना बुद्धि देतो. बुद्धिदाता तो आहे. प्रेरक तो आहे. सर्व कांहीं कर्ताहर्ता तोच आहे. आह्मी कांहीं करीत नाहीं व आमच्या कांहींएक स्वाधीन नाहीं; असा, मूर्ख लोक शास्त्रवाक्यांचा अभिप्राय न जाणतां, त्या ईश्वरावर व्यर्थ आरोप करितात. वास्तविक सर्व कांहीं आपणच करीत असतात; पण वरील मेघ आणि चंद्राच्या किंवा दीपाच्या दृष्टांताप्रमाणें ते ईश्वरावर आरोप करितात. हें त्यांच्या मूर्खपणाचें आश्चर्य नव्हे काय ?

शंका—अहो ! " हरिर्हरति पापानि दुष्टचित्तैरपि स्मृतः । " या वचनावरून स्पष्ट असें दिसतें कीं, दुर्बुद्धीच्या लोकांनीं जरी त्या प्रभूचें नामस्मरण किंवा अर्चनपूजन केलें, तरी तो त्यांचीं सर्व पापें हरण करतो. अर्थात् पापनिवृत्तीचें कर्तृत्व त्याचे ठिकाणीं आहे. ह्मणूनच त्यास अन्वर्थ 'हरि' असें म्हटलें जातें. तेव्हां आपल्या वरील व्याख्याना-वरून हें वरील वचन जर खोटें ठरलें, तर त्या प्रभूचें नामस्मरण वगैरे सुद्धां कोणीही करणार नाहींत. यामुळें महान् अनर्थ होईल ! तेव्हां वरील वचनाची व्यवस्था कशी ?

उत्तर—अरे ! तुझ्या या पुराण वचनाला—

" नादत्ते कस्यचित् पापं न चैव सुकृतं विभुः ।
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ॥ "

हें स्मृतिवचन विरोधी येतें, याची वाट तूं काय लावणार तें सांग ! येथें तर भगवान स्पष्ट असें सांगतात कीं, प्रभु कोणाचें पापही हरण करीत नाहीं व पुण्यही हरण करीत नाहीं. हा सर्व खुळ्यांचा बाजार आहे. या पारमार्थिक वाक्यापुढें वरील तुझ्या व्यावहारिक वाक्याची किंमत काय ? असो. तथापि या दोन्ही वचनांचा विरोधपरिहार असा कीं, " हरि-र्हरति पापानि " इत्यादि हरीचें स्तवन करणारीं वाक्यें परमार्थविचार-हीन असणाऱ्या अगदीं मूर्ख लोकांकरितांच करून ठेविलीं आहेत, आणि " नादत्ते कस्यचित् पापं " इत्यादि वाक्यें, शास्त्रविचारवान् उत्तम अधि-

कारी पुरुषांकरितां केलीं आहेत. म्हणून अधिकारभेदानें दोन्हींही वाक्यें व्यर्थ नव्हेत, अशा दृष्टीनें उभयतांत विरोध येत नाहीं. याविषयीं प्रमाणः—वसिष्ठ म्हणतात (वा. प्र० ५ अ. ४३)

" शास्त्रयत्नविचारेभ्यः मूर्खाणां प्रपलायिनां ॥
कल्पिता वैष्णवी भक्तिः प्रवृत्यर्थं शुभास्थितौ ॥ "

अर्थ—वसिष्ठ म्हणतात, स्वतःच आपण हरि आहों हें ज्यांना कळत नाहीं व पारमार्थिक शास्त्रविचारापासून जे लोक फारच दूर राहिले आहेत, अशा व्यावहारिक मूर्ख लोकांचा साधनपरंपरेनें कांहीं तरी उद्धार व्हावा किंवा त्यांची कांहींतरी शुभ मार्गाचे ठिकाणीं प्रवृत्ति व्हावी, आणि विष्णु वगैरे काल्पित देवतेचें पूजन, अर्चन वगैरे त्यांनीं करावें, म्हणून साधनभक्तीची कल्पना शास्त्रकारांनीं केली आहे, व तेवढ्याकरितां पाप किंवा दुःख दूर करण्याचें हरीचे ठिकाणीं सामर्थ्य आहे असें हरीचें स्तवन केलें आहे. वास्तविक स्वतःच्या विचाररूप प्रयत्नाखेरीज काल्पित असणाऱ्या ईश्वरामध्यें स्वातंत्र्य व सामर्थ्य किती असणार ? तुकोबा म्हणतात—

कल्पनेचा देव कल्पनेची पूजा । तेथें कोणी दूजा आढळेना ॥
आढळेना देव आढळेना भक्त ॥ कल्पनेरहित काय आहे ॥

वसिष्ठ म्हणतात—(वा. प्र. ९ अ. ४३)

" चिरमाराधितोऽप्येष परमप्रीतिमानपि ॥
नाविचारवतो ज्ञानं दातुं शक्नोति माधवः ॥ १० ॥
विना पुरुषयत्नेन दृश्यते चेज्जनार्दनः ॥
मृगपक्षिगणं कस्मात्तदसौ नोद्धरत्यज ॥ ११ ॥

अहो ! तुम्हां उपासक लोकांना आम्ही असें विचारतों कीं, तुमच्या ईश्वरांत कर्तुं, यथाकर्तुं, अन्यथा कर्तुं, असें जर सामर्थ्य व पूर्ण स्वातंत्र्य आहे, तर मग तो सर्व जगाला एकदम मुक्त कां करून टाकीत नाहीं ? किंवा मृगपक्षिगणादिकांचा तो उद्धार कां करीत नाहीं ? कांहीं लोकांना सुख व कांहींना दुःख असें कां देतो ? मुमुक्षूंनीं आपलें पूजनअर्चन वगैरे

करावें, भक्ति करावी, अशी तरी त्यास अपेक्षा कां असावी ? हें सांगा ! तात्पर्य, वसिष्ठ म्हणतात—विचाररूप स्वप्रयत्नाखेरीज सर्व व्यर्थ आहे आणि ईश्वर मायोपाधिक व अविद्योपाधिक झाल्यावांचून किंवा तसा मानल्यावांचून कर्ता, कारयिता, फलदाता व फलभोक्ता वगैरे कांहींच सिद्ध होत नाहीं, हा इत्यर्थ होय. म्हणून केवळ ईशकर्तृतावाद व्यर्थ आहे.

शिष्या ! येथपर्यंत ईशकर्तृतावादाला श्रेष्ठत्व मानणाऱ्या लोकांच्या मताचें खंडण संपलें. आतां सांख्यमताचेंही खंडण करण्याकरितां त्यांच्या मताचा थोडक्यांत अनुवाद करून त्याचा खंडणविचार संक्षेपतः तुला सांगतों. नीट एकाग्र चित्तानें यांतील मार्मिक अभिप्राय लक्षांत आण.

अथ सांख्यमते प्रकृतिकर्तृतावादनिरूपण.

शिष्या ! आतां सांख्यवाद्यांचें म्हणणें असें आहे कीं, “ प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ” या वचनावरून आणि पूर्वींच्या सर्व व्याख्यानावरून जीव आणि ईश्वर यांचे ठिकाणीं कर्तृत्व आणि कारयितृत्व संभवत नसून प्रत्येकाची प्रकृति किंवा स्वभावच सर्व कांहीं करतो, असें त्यांचें म्हणणें आहे. म्हणून “ स्वभावस्तु प्रवर्तते ” असें म्हटलें आहे. आणि “ अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बव्हीं प्रजां जनयंतीं सरूपां ” या मुंडकश्रुतिप्रमाणावरून, ही महाषड्गुणैश्वर्यसंपन्न भगवती देवी, ह्मणजे प्रकृति, हीच सर्व कांहीं क्रिया जीवाकडून करविते. म्हणून हीच सर्वांपेक्षां परमपूज्य असल्यामुळें, आमचा प्रकृतिकारणवादच सर्वांत श्रेष्ठ आहे. याप्रमाणें प्रकृतिवादी सांख्याचें म्हणणें आहे.

॥ अथ सांख्यमतखंडणप्रारंभः ॥ *



या प्रकृतिवाद्यांना वेदांती असें विचारतात कीं—

तुम्ही प्रकृति जड मानतां, कां चेतन मानतां ? जड मानीत

असाव, तर जड पदार्थांत कोणतेंही कार्य करण्याचें ज्ञान व सामर्थ्य असणें शक्य नाहीं.* जगांत चेतनाश्रयावांचून जड पदार्थाकडून कोणतेंही कार्य झाल्याचें कोठें दृष्टश्रुत आहे काय? एवढें अवाढव्य आणि विचित्र जगत् उत्पन्न करणें, संहार करणें वगैरे आणि, जीवाकडून किंवा ईश्वराकडून शुभाशुभ वाटेल तीं कामें करविणें या गोष्टी स्वतंत्र तऱ्हेनें चेतनाश्रयावांचून जड असणाऱ्या प्रकृतीकडून होणें कधींही संभवनीय नाहीं. एक प्रकृतिच सर्व कांहीं करते, या मूर्खवत् भाषणांत अर्थ काय? तुम्हीं वर प्रमाणार्थ दिलेल्या श्रुतिस्मृतिवचनांचा अभिप्राय तसा नाहींत, तर चेतन पुरुषाच्या सान्निध्यानेंच प्रकृति सर्व कांहीं करते असा आहे. चेतन पुरुषाच्या सान्निध्यावांचून प्रकृतीला कोणतेंही कार्य करण्याचें स्वतंत्र रीतीनें सामर्थ्य नाहीं, असाच वरील वचनांचा अभिप्राय आहे. आतां तूं कदाचित् प्रकृति चेतन जरी मानीत असशील, तरी पण एकट्या चेतन प्रकृतीकडून देहादि जड पदार्थांचें साहाय्य घेतल्यावांचून कोणतेंही कार्य करतां येणें शक्य नाहीं. कारण प्रकृति स्वतः निरवयव आहे. जगांत केवळ निरवयव असणाऱ्या चेतन पदार्थाकडूनही कोणतें एखादें कार्य झालेलें दृष्टश्रुत नाहीं. आणि प्रकृति चेतन मानल्यास दुसरी अडचण अशी येते कीं, प्रकृतिही चेतन व पुरुषही चेतन, असे दोन चेतन पदार्थ मानल्यास द्वैतापत्ति होऊन, अद्वैतप्रतिपादक श्रुतिवचनांस बाध येतो. आणि मग कार्य—उत्पादनाविषयीं चेतनपुरुषसान्निध्याची तिला जरूरी नाहीं असें होईल. कारण जगांत कोणत्याही स्त्रियेला चेतन पुरुषसान्निध्यावांचून स्वतंत्र रीतीनें प्रजोत्पादन करण्याचें सामर्थ्य आहे, असें कोठेंही दृष्टश्रुत नाहीं. ह्मणून जड आणि चेतन या दोन्हांच्या संयोगानेंच कोणतेंही कार्य होतें; असें सिद्ध आहे. आणि याविषयीं वेदस्तुतींतही ३० व्या श्लोकांत असें ह्मटलें आहे कीं—

---

* सांप्रत ज्यांचें आम्ही खंडन करीत आहों, ते कापिल मुनि देवहूतीचे ठिकाणीं अवतीर्ण झालेल्या वेदांतसांप्रदायी कपिलाचार्यांहून निराळे आहेत. त्यांचें खंडण करीत नाहीं.

" न घटत उद्भवः प्रकृतिपुरुषयोरजयोरुभयं-
युजा भवंत्यसुभृतो जलबुद्बुदवत् ॥ "

अर्थ—प्रकृति आणि पुरुष हें जोडपें अनादि असून अज आहे. ज्याप्रमाणें पाण्यावर बुडबुडा उत्पन्न होण्यास जल, वायु आणि आकाश य. तीन पदार्थांची अपेक्षा लागते, त्याप्रमाणें येथें प्रकृति ह्मणजे प्रारब्ध, चेतन पुरुष ह्मणजे जीव आणि ईश, व त्याचा प्रयत्न, अशा तीन पदार्थांच्या संयोगानेंच कोणतीही न्याय्य अथवा अन्याय्य क्रिया घडली जाते. केवल जड प्रकृतीकडूनच कोणतीही शुभाशुभ क्रिया घडली जाणार नाहीं व केवल चेतन पुरुषाकडूनही ती केली जाणार नाहीं. असा " प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः " इत्यादि वचनांचा अभिप्राय होय. ह्मणून तुह्मां सांख्यांचा केवल प्रकृतिकर्तृतावाद व्यर्थ होय. याप्रमाणें सांख्य मताचें खंडण संक्षेपतः दर्शित केलें आहे.*

शिष्या ! आतां तुला निरीश्वरवादी कर्ममीमांसकांचें मत आणि त्या मताचा खंडणविचार थोडक्यांत सांगतों. हे सर्व विषय ऐकून ठेव. कंटाळूं मात्र नकोस. कारण आपल्या पारमार्थिक सिद्धांताला बळकटी येण्याला हीं विचारसाधनें फार चांगलीं आहेत. या अनेकमतश्रवणाच्या योगानें आपल्या मनांत असणारे जे अनेक प्रकारचे किरकोळ संशय ते आपोआपच नष्ट होऊन जातात. आपण स्वतोत्थानरहित जरी असलों, तरी अनेक मतांचा अभिप्राय आपले लक्षांत आला ह्मणजे, त्यामुळें आपणांस परतोत्थानाची भीति राहात नाहीं. एवढा या श्रवणांत फायदा आहे.



* विस्तरतः ज्याला जाणण्याची इच्छा असेल त्यांनीं सूत्रभाष्याच्या द्वितीय अध्यायांतील प्रथमपाद, सर्व पहावा.)

॥ नास्तिक निरीश्वरकर्मवादप्रारंभः ॥

गुरु म्हणतात—नास्तिक वाद्यांचे सहा प्रकार आहेत. त्यांपैकीं हे निरीश्वरवादी, जगत्कर्ता ईश्वर वगैरे मुळींच मानीत नाहींत. हे केवळ स्वकृत प्रयत्नालाच प्राधान्यता मानतात. भगवद्गीतेंत या मताचा—

" असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरं ॥ "

या श्लोकानें भगवंतांनीं अनुवाद केला आहे. तसेंच श्रीमद्भागवतामध्यें दशमस्कंधाच्या पूर्वार्धांत २४ व्या अध्यायामध्यें १३ व्या श्लोकापासून प्रसंगानुसार, या निरीश्वरवादाचा भगवंतांनीं अनुवाद केला आहे. तोच विषय येथें थोडक्यांत तुला सांगतों. यांत काय मजा आहे, हें लक्षपूर्वक ऐक. भागवतांत असा वर्णनप्रसंग आला आहे कीं, गोकुळामध्यें नंदानें वार्षिक इंद्रयागनामक उत्सव करण्यास प्रारंभ केला; त्या वेळीं कृष्णाच्या मनांत इंद्राचा गर्वपरिहार करण्याचें आलें. तेत्व्याकरितां गोवर्धन पर्वताचा उत्सव सुरू करावा. पण नंद आणि गांवकरी लोक आपलें ऐकणार कसें, म्हणून या लोकांचा आपल्या या कार्यापुरता ईशपूज्यतेसंबंधानें बुद्धिभेद करावा, या हेतूनें कृष्णानें उत्सवाचे पूर्व दिवशीं सर्व ग्रामस्थ मंडळींचीं सभा जमवून, त्या सभेंत या पुढील निरीश्वरवादाचें व्याख्यान करण्यास आरंभ केला. तो प्रकार तूं ऐक.

॥ कृष्ण उवाच ॥

कर्मणा जायते जंतुः कर्मणैव विलीयते ॥
सुखं दुःखं भयं क्षेम कर्मणैवाभिपद्यते ॥१३॥
अस्ति चेदीश्वरः कश्चित् फलरूप्यन्य कर्मणां ॥
कर्तारं भजते सोऽपि न ह्यकर्तुः प्रभुर्हि सः ॥१४॥
किमिंद्रेणेह भूतानां स्वस्वकर्मानुवर्तिनां ॥
अनीशेनान्यथा कर्तुं स्वभावविहितं नृणां ॥१५॥
स्वभावतंत्रो हि जनः स्वभावमनुवर्तते ॥

स्वभावस्थमिदं सर्वं सदेवासुरमानुषं ॥१६॥
देहानुच्चावचान् जंतुः प्राप्योत्सृजति कर्मणा ॥
शत्रुर्मित्र उदासीनः कर्मैव गुरुरीश्वरः ॥१७॥ इति ॥

याचा भावार्थ असा कीं, कृष्ण ह्मणतात—“बाबा! आज हा आपल्या येथें कसला उत्सव आरंभला आहे?”

नंद म्हणतो—“बाळा! उद्यांपासून आपले घरीं वार्षिक कुलपरंपरागत आलेला हा इंद्रयागोत्सव सुरू होणार आहे. उद्यां आपले घरीं पक्वान्नांचा कोट करून, त्याचा इंद्रदेवाला नैवेद्य अर्पण करावा लागतो; म्हणून हीं पक्वान्नें वगैरे तळण्याला आजपासूनच सुरुवात केली आहे.”

इतकें नंदाचें भाषण ऐकून, कृष्णानें बोलण्यास आरंभ केला:—“कायहो बाबा! हा ईश्वर तुम्हीं कुठला काढलात काय कीं! अहो! ईश्वर असतो कोठें? आणि तो पाहिलाहे कोणीं? आह्मी तर बुवा, ईश्वरबींश्वर कुच मानीत नाहीं!(अंतःस्थ भावः—कृष्ण हे स्वतःच ईश्वर असल्यांमुळें, हें सर्व बोलणें त्यांनाच शोभतें.) अहो! तुमच्यासारख्या भोळ्या लोकांनींच पूर्वींपासून ईश्वराचें हें उगीच एक बंड माजविलें आहे! यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण बाबा! तुम्ही असा विचार करा कीं, सर्व जीव आपआपल्या कर्मांनींच उत्पन्न होतात; कर्मांनींच मरतात. त्याचप्रमाणें सर्वांना सुख, दुःख, भय, अभय, क्षेम वगैरे हें सर्व ज्याच्या त्याच्या कर्मांनींच त्याला प्राप्त होत असतें; मग येथें ईश्वर मानण्याचा संबंधच काय? व तो आहे कोठें? आणि त्याच्या स्वाधीन आहे काय? बरें, तुमच्या ह्मणण्याप्रमाणें घटकाभर ईश्वर कोणी एक गोमाजी आहे, असें का धरून चालानात? पण तो तरी आपल्याकडून कांहीं तरी कष्ट करून घेतल्यावांचून आपल्याला फुकट काय काढून देतो? त्याकडून आपणास इष्ट फल प्राप्त करून घेण्यास, त्याचें भजनपूजन वगैरे कांहींतरी कष्ट करावे लागतातच. कांहींएक कर्म न करणाराचा कांहीं तो प्रभु नव्हे. आम्ही कांहींएक कर्म न करतां जर तो आह्मांला पदरचें काढून देईल, तर मग एक

असो बुवा! पण तो तुमचा ईश्वर कर्त्यांच्या शुभाशुभ प्रयत्नावर जर अवलंबून आहे, तर मग त्याच्या स्वतःमध्यें फल देण्याचा पराक्रम तो काय आहे, हें सांगा? अहो! जगांत कोणी कोणाला दिल्या घेतल्यावांचून आपल्या पदरचें फुकट काढून कांहीं एक देत नाहीं. मग तो ईश्वर असो, का मनुष्य असो. सर्व दिल्याघेतल्याचेच आहेत."

"बाबा! मी तुम्हांला असें विचारतों कीं; आपल्या सर्वांच्या प्राक्तन कर्मानुसारच जर आपल्याला सुखदुःख प्राप्त होत आहे, तर मग अजागलस्तनवत् असणाऱ्या त्या इंद्ररूप ईश्वराला भजण्यापुजण्यांत अर्थ तरी काय आहे? व तो ईश्वर आहे तरी कशावरून? व तोच आपल्याला चांगलेंवाईट फल देतो हें तरी कशावरून ठरविणार? बरें, तो फल जरी देत असला, तरी फुकट तर देत नाहींना? अहो! वाण्याच्या सौद्याप्रमाणें पैसा टाकावा तेव्हां माल घ्यावा. मग दुकानदाराप्रमाणें त्या ईश्वराची एवढी प्रतिष्ठा तरी पाहिजे कशाला? अहो! आपल्या या गोवर्धन पर्वताचा उद्यांपासून उत्साह सुरू करून, त्याचीच जर आपण कांहीं सेवा केली, तर तो नाहीं का आपल्यास इष्ट फल देणार? मग त्याला इंद्रच कशाला पाहिजे, हें सांगा! अहो,

"यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयाऽर्चितुमिच्छति।"
"ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भ०"

असें पूर्वकल्पांतील गीतेंत सांगितलेंच आहे * या वचनावरून सर्व आपल्या कर्म करण्यावरच अवलंबून आहे, हें नाहीं का यांत स्पष्ट होत? मग काल्पनिक कोणीतरी एक ईश्वर जर मानणें असेल, तर मग या गोवर्धन पर्वताला मानण्यास काय हरकत आहे? आणि कित्येक मोठे लोक असें म्हणतात कीं, ईश्वर फार दयाळू आहे. पण स्वतःवर एखादें भयंकर

---

* पूर्व कल्पांतील ह्मणण्याचें कारण—पूर्वीचा भगवान निराळा व तो कालही निराळा. आतांची गीता अझून तयार झाली नाहीं. व आपलेंच वाक्य आपण प्रमाण कसें सांगावें?

संकट उपस्थित झालें असतां, त्या ईश्वराच्या नांवानें कितीही पांचजन्य करून मोठ्यानें ओरडून घसा कोरडा केला, तरी तो सर्वांचे संकटनिवारणार्थं धावून येतो काय ? तर नाहीं. हेंच कां त्याचें दयाळुत्व ? आणि काय म्हणे, ईश्वर कर्तुं अन्यथा कर्तुं समर्थ आहे आणि कृपेचा सागर आहे ! पण फुकटांत तर एकाचेंही दुःख तो नाहींसें करीत नाहीं ना ? वाः ! खूप दयाळुत्व त्याचें ! विशेषगें तर खूप लांबलचक त्यास देतात ! ”

“ असो, तेव्हां बाबा ! मला तर ईश्वर मानण्यांत कांहींएक मतलब दिसत नाहीं. कारण हे सर्व लोक आपआपल्या प्राक्तन संस्कारांच्या आधीन आहेत, असेंच विचाराअंतीं म्हणावें लागतें. कारण जो तो आपल्या पूर्वसंस्कारस्वभावानुरूप, पापपुण्य वगैरे करण्याला प्रवृत्त होतो. वेळ पडली म्हणजे शास्त्राचें, गुरूचें वगैरे कोणी कोणाचें ऐकत नाहीं. देव काय, मनुष्य काय, असुर काय, प्रत्येकजण स्वकर्मानुसार लहानमोठा देह धारण करून, उच्चनीच पदवीला प्राप्त होतात. यांत आणखी ईश्वराचा संबंध तो काय ? अहो ! तुम्ही आम्ही सर्वच ईश्वर आहोंत असें म्हणण्यास काय हरकत आहे ? तात्पर्य, प्रारब्धकर्म आणि प्रयत्न, यानेंच कालानुसार इष्टफलप्राप्ति होत असल्यामुळें काल्पनिक ईश्वर मानण्यापेक्षां आमचा निरीश्वर कर्मवाद श्रेष्ठ मानण्यास काय हरकत आहे ? ”

याप्रमाणें कृष्णाचें भाषण नंदानें व बाकीच्या सभासदांनीं ऐकून घेतल्यावर, तो नंद कृष्णास म्हणतो, कृष्णा ! हें तुझें बोलणें एका प्रकारानें मला हिशोबी वाटतें, पण यावर मी तुला असें विचारतों कीं, जगत्कर्ता ईश्वर जर नसेल तर ही सृष्टि मग कोणीं उत्पन्न केली सांग पाहूं ?

कृष्ण म्हणतो—बाबा ! हें काय वेडयासारखें तुमचें विचारणें ? अहो ! प्रत्येकाच्या आईबापांनीं प्रत्येकाला उत्पन्न केलें ! या न्यायानें ही सर्व सृष्टि तुम्हीं आम्हीं सर्वांनीं मिळूनच केली आहे. मला माझ्या आईबापांनीं, तुम्हांला तुमच्या आईबापांनीं, तसेंच किडा, मुंगी, पशु, पक्षी वगैरे या सर्वांना सर्वांच्या आईबापांनींच उत्पन्न केलें. अहो ! हीं मुलें लेंकरें उत्पन्न

करण्यास ईश्वर का रात्रीचा प्रत्येकाच्या घरीं चालून गेला आहे ? उत्पत्तीची टांकसाळ आपल्याच प्रत्येकाच्या घरीं असते. आपलें गांव आणि ईश्वराचें नांव मधेंच पाहिजे कशाला ? कुंभार जसा एखादे ठिकाणीं मडकीं घडीत बसतो, तसा ईश्वर माणसें कां कुठें घडीत बसला आहे ? अहो ! तुम्ही आम्ही सर्वच ईश्वर ! "सदसच्चाहमर्जुन" हा सिद्धांत नीट बारिक विचारानें लक्षांत ठेवा."

दुन्हा नंदाचा प्रश्न—"कृष्णा ! प्रत्येकाच्या आईबापांना परंपरेनें उत्पन्न करणारा असा सर्वांचा आद्य आईबाप कोण ?"

उत्तर—"कर्मणा जायते जंतुः कर्मणैव विलीयते ॥"

ह्मणजे सर्वांचें शुभाशुभ कर्मच सर्वांचा आद्य आईबाप होय."

प्रश्न—होय, पण कर्माचा तरी उत्पादक कोण ?

उत्तर—ज्याची त्याची मूर्ख कल्पनाच.

प्रश्न—कल्पनेला कोणीं उत्पन्न केलें ?

उत्तर—वासनेनें; व वासनेला अविचारी कल्पनेनें उत्पन्न केलें.

प्रश्न—पण हे दोन्हेही कां उत्पन्न झाले ? व यांना कोणीं उत्पन्न केलें ?

उत्तर—आपल्या स्वस्वरूपाच्या अविचारानें.

प्रश्न—हा अविचार तरी कां झाला ?

उत्तर—वासिष्ठ उवाचः—

"अविचारः स्वभावोत्थः विचारेण विनश्यति ॥"

अर्थ—अविचार हा स्वभावतःच उत्पन्न होतो. याचा कर्ता कोणी नाहीं. पण तो विचारानें नाहींसा होतो.

प्रश्न—हा अविचार कोणाला झाला (ह्म० याचे आईबाप कोण) ?

उत्तर—जो प्रश्न करतो तोच, व त्याचेच ठिकाणीं तो झाला.

म्हणून प्रश्नकर्ताच वरील परंपरेनें सर्वांचा आईबाप व सृष्टिकर्ता ईश्वर होय. हेंच पूर्वीचें उत्तर सिद्ध झालें.

एवंच या वरील संवादावरून इतकें सिद्ध झालें कीं—

अज्ञानमेवास्य हि मूलकारणं तद्धानमेवात्र विधौ विधीयते ॥

ह्मणजे अविचार हाच सर्वांला कारण असून तो आपलेच ठिकाणी होत असल्यामुळें त्याचे आईबाप आपणच आहों. म्हणून अशा परंपरेनें आपणच सर्वांचे ईश्वर आहों. ईश्वर तुमच्याआमच्याहून वास्तविक निराळा नाहीं. बाबा ! हा जो मीं पूर्वीं सिद्धांत सांगितला, तोच पुन्हा युक्ति व प्रमाणावरून कायम ठरत आहे. ह्मणून स्वतःहून अन्य ईश्वरबीश्वर आम्ही कुच मानीत नाहीं ! ह्मणून " कर्मैव गुरुरीश्वरः " ह्म० आपण आणि अविचारापासून उत्पन्न झालेलें आपलें कर्मच गुरु किंवा ईश्वर होय हा आमचा निरीश्वर वाद्यांचा सिद्धांत वेदांतशास्त्राप्रमाणें अगदीं बरोबर आहे. आतां तुम्हांला कोणी तरी कर्मांगभूत देवता मानण्याची जर अपेक्षा असेल, तर मग इंद्राशींच तुम्हांस काय कर्तव्य आहे ? हा आपला प्रत्यक्ष गोवर्धन पर्वत येथें आहे, यालाच देव मानून उत्तम फलप्राप्तीकरितां याचेंच भजनपूजनादि कांहीं कर्म उद्यांपासुन सुरू केलें म्हणजे झालें. तदुद्देशानें आपण केलेलें कर्मच आपणास फलद्रूप होईल. अहो ! प्रत्यक्ष दृष्ट ईश्वर सोडून अदृष्ट असणाऱ्या इंद्रादि देवांची निराळी कल्पना करण्यांत काय मतलब आहे ? असें तर बुवा माझें निश्चित मत आहे. यावर तुम्हांला जें योग्य दिसेल तें करा. "

याप्रमाणें नंदादि सभासदांनीं कृष्णाचें तें सर्व भाषण ऐकून त्यांना तें सर्व खरें वाटलें, आणि त्यास अनुमोदन देऊन त्या दिवसापासून तेथील गोवर्धन पर्वताचा उत्सव त्यानीं सुरू केला. तो संप्रदाय अद्यापपावेतों तेथें सुरूं आहे. याप्रमाणें कथासंदर्भ आणि निरीश्वरवाद प्रतिपादन केला.

गुरु म्हणतात, शिष्या ! याप्रमाणें श्रीकृष्णांनीं नास्तिकमताचा जो अनुवाद केला तोच मीं तुला सांगितला. यांत आपल्याहून ईश्वर निराळा नाहीं, हें कृष्णाचें भाषण वेदांतमतानें पाहिलें असतां अक्षरशः खरें आहे. आणि " तत्त्वमस्यादि " सर्व महावाक्यें हेंच सांगत आहेत. आतां असल चार्वाकादि नास्तिकमतांत आणि वेदांतमतांत ईश्वरादिकासंबंधानें

अगदींच थोडा फरक आहे. तो असा कीं, चार्वाक आणि वेदांती, आपणाहून ईश्वर निराळा मानीत नाहींत. येथील दोघांचे "आपण" हे शब्द बरोबर आहेत, पण चार्वाक् 'आपण' शब्दाचा अर्थ देह असा समजतो; आणि वेदांती 'आपण' शब्दाचा अर्थ देह न घेतां "क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्व०" या न्यायानें.) देहव्यतिरिक्त 'क्षेत्रज्ञ, साक्षी' असा समजतात. तसेंच नास्तिकही सर्वच खोटें ह्मणतात, आणि वेदांतीही सर्वच खोटें मानतात; पण वेदांती आपल्या देहासकट सर्व जगत् खोटें मानतात, आणि नास्तिक लोकमात्र आपल्यां देहासकट जेवढे प्रत्यक्ष दिसणारे पदार्थ आहेत, त्यांस खरे मानीत असून धर्माधर्म, ईश्वर वगैरे जेवढे अप्रत्यक्ष पदार्थ आहेत तेवढेच खोटे मानतात. एवढा दोघांत फरक आहे. आतां कृष्ण स्वतःच ईश्वर असल्यामुळें ते जें बोलतील, तें विचारांतीं सर्व अक्षरशः खरें आहे व तें त्यांचें त्यांनाच शोभतें. पण मागें झालेलें त्याचें नास्तिकमताचें भाषण एखाद्या देहाभिमानी पुरुषानें जर ग्रहण केलें तर त्यास मात्र तें अनर्थालाच कारण होईल. ह्मणून त्या नास्तिक मताचा अतज्ज्ञ लोकांनीं त्याग करावा, या हेतुस्तव पुढील व्याख्यानांत आह्मी त्या मताचें खंडण दर्शवित आहों. मागील निरीश्वरमतांत जेवढा त्याज्य भाग आहे तेवढ्याचेंच फक्त आम्ही खंडण करीत आहों, ग्राह्य विषयाचें खंडण करीत नाहीं.

॥ निरीश्वर नास्तिकमतखंडणप्रारंभः ॥

सेश्वर कर्ममीमांसक या निरीश्वर नास्तिक मताचें खंडण असें करतात कीं, हे चार्वाका! तुझें म्हणणें—जगत्कर्ता ईश्वर नाहीं, प्रत्येकाच्या कर्मानें स्वभावतःच हें जगत् उत्पन्न होतें व कर्माचें फल कर्मानेंच स्वभावतः प्राप्त होतें, त्यास ईश्वराची जरूरी नाहीं. तसेंच प्रत्येकजण आपणच ईश्वर आहों. हे तुझे तिन्हीही मुद्दे अत्यंत मूर्खपणाचे असून, श्रुति, युक्ति आणि अनुभव यांना अगदीं विरुद्ध आहेत. आणि 'ईश्वर नाहीं' या

मताला व्यावहारिक दृष्टचा तूं एकही श्रुतिप्रमाण दिलें नाहींस. म्हणून तुझें मत अप्रामाणिक असल्यामुळें त्याज्य आहे.

आतां ईश्वर सत्य असून तोच सृष्टिकर्ता आहे, व कर्मानुसार कर्माचा फलदाताही ईश्वरच आहे, अशा अर्थाविषयीं आम्ही हीं श्रुतिवचनें देतों. हीं ऐकून ठेव.

(मुंडके) " ब्रह्मा देवानां प्रथमः संबभूव विश्वस्य कर्ता भुवनस्य गोप्ता ॥ स ब्रह्मविद्यां सर्वविद्याप्रतिष्ठामथर्वाय ज्येष्ठपुत्राय प्राह ॥ स तपो तप्यत, स तपस्तप्त्वा सर्वमिदमसृजत् ॥ " सोऽकामयत बहुस्यां प्रजायेयमिति ॥ तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशदिति ॥ " " प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ॥ अहं सर्वस्य प्रभवो मतः सर्वं प्रवर्तते " ॥ इत्यादि स्मृतिरपि ॥ " चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुण० " इति च ॥

या सर्व श्रुतिस्मृतींवरून ईश्वर सत्य असून सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, संहार-कर्ताही तोच आहे; हें सिद्ध होत आहे. तसेंच—


" लभते च ततः कामान् मयैव विहितान् हि तान् ॥ "

इत्यादि स्मृतीवरून कर्मफलदाताही ईश्वरच आहे, हेंही सिद्ध होतें. कारण कर्म हें जड असल्यामुळें, कर्मानेंच कर्माचें फल स्वभावतः आपोआप मिळतें, हें म्हणणें मूर्खपणाचें आहे. कारण कर्माला रूप नाहीं, जाति नाहीं, पृथक् सत्ता नाहीं. अशा जड कर्मापासून फल मिळणें, किंवा सृष्टि उत्पन्न होणें, असंभाव्य आहे. आतां तूं नास्तिक असल्यामुळें श्रुतिस्मृतिवचनें तुला मान्य नाहींत, पण तुझें भाषण अप्रामाणिक आहे हें दर्शित करण्याकरितां, हीं वरील प्रमाणें मीं तुला सांगितलीं आहेत.

असो—तुझें म्हणणें आपणच ईश्वर आहों—

" ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान् सुखी ॥ "

व आपण सृष्टिकर्ते आहों. पण या म्हणण्यांत अर्थ काय ? कारण या सृष्टीच्या



वैचित्र्याबद्दल जीवांना नुसती मनानेंसुद्धां कल्पना जर करतां येत नाहीं, तर तिला निर्माण करण्याचें सामर्थ्य बाजूलाच राहो! आणि पुत्रादि प्रजा स्वतःच्या इच्छेप्रमाणें निर्माण करण्याचें जर आपल्या स्वाधीन असतें, तर मग पुत्रादिकांकरितां देवाला नवस करण्याचें प्रयोजन काय? बरें, हें एक असो—पण पर्वत, नद्या, अनेक तऱ्हेचे वृक्ष, किडा, मुंगी व विचित्र रंगीबेरंगी पशु, पक्षी वगैरे हे अनंत पदार्थ मनुष्यानेंच आपल्या पराक्रमानें उत्पन्न केले आहेत काय? अहो! स्वतःचा ज्याचा त्याला देहसुद्धां नीट करतां येत नाहीं, तर ही सृष्टिरचना तो काय करणार? हें दिसतच आहे. आतां तूं कदाचित् असें ह्मणशील कीं, हे पर्वतादि पदार्थ किंवा पंच महाभूतें हीं परमाणु, द्व्यणुक, त्र्यणुक, यांच्या परस्पर संमेलनापासून उत्पन्न झालीं. पण परमाण्वादि हे स्वतः जड पदार्थ असल्यामुळें त्यांचें परस्पर संमेलन करणारा चेतन अधिष्ठाता कोणी तरी असल्यावांचून यांचें संमेलन होणार कसें तें सांग?

शंका—यावर तूं कदाचित् असें ह्मणशील कीं, चुना आणि कात हे दोन पदार्थ एकत्र झाले असतां, त्यांपासून तांबडेपणा हा तिसराच गुण आपोआप स्वभावतः उत्पन्न होतो. त्याप्रमाणें परमाणु किंवा जगांतील कोणतेही दोन किंवा दोहोंपेक्षां अधिक पदार्थ एकत्र झाले असतां, त्यांपासून ही सृष्टि व सृष्टींतील अनेक विचित्र पदार्थ स्वभावतःच उत्पन्न होतात. याला निराळा आणखी उत्पादक लागत नाहीं.

उत्तर—पण या आक्षेपावर मी असें ह्मणतों कीं, दोन जड पदार्थांचा संयोग, चेतन कारागिरावांचून आपोआप कसा होणार? आणि दुसरें असें कीं, प्रत्येक पदार्थांत अमुकच गुणधर्म असावा ही नियति, कोणी तरी कल्पक असल्यावांचून सिद्ध होणार नाहीं. मिरचीनें तिखटच असावें, उसानें गोडच असावें, व अग्नीनें उष्ण असावें, पाण्यानें थंड असावें इत्यादि पदार्थांचा स्वभाव किंवा गुणधर्म ठरविणारा कोणी तरी असल्यावांचून आपोआपच गुणधर्मस्वभाव ठरला जाणार नाहीं. म्हणून उभय-

पदार्थसंयोगानें किंवा त्या त्या वस्तूच्या गुणधर्मानें, सृष्टी व सृष्टींतील कार्यें स्वभावतःच होतात, हें ह्मणणें सयुक्तिक नाहीं. ह्मणून स्वभाववाद किंवा केवल कर्मवाद मानणें योग्य नाही. आणि दुसरें असें कीं, केवल जड कर्मातच जर फलदातृत्वसामर्थ्य असेल, तर मग एखाद्यानें बिनमालकावांचूनच जर नौकरी करण्याचें कर्म केलें, तर त्या सेवारूप कर्मानेंच स्वतः पगाराचे पैसे दिले पाहिजेत ! मग पगार घेण्यास मालकाकडे जाण्याचें काय कारण ? आणि यांत दुसरा मुद्दा असा कीं, तुझ्या निरीश्वरमतांत फलदाता मालकच जर नाहीं, तर मग कर्म तरी कोणाच्या उद्देशानें तूं करणार ? कारण कर्म करण्याला कर्मांगभूत देवता कोणीतरी पत्करावीच लागते. त्यावांचून अधांतरीं नुसतें कर्मच संभवत नाहीं. तात्पर्य—कोणत्याही बाजूनें विचार केला असतां, यावद्देहात्मबुद्धि जेथपर्यंत आहे, तेथपर्यंत व्यावहारिक दृष्ट्या जगाचा नियंता ईश्वर कोणी तरी आहे, असेंच मानलें पाहिजे. कारण त्या त्या कालीं पर्जन्य पाडणें, चंद्रसूर्यादि गोलकांना आकाशांत अधांतरीं थोपवून धरणें, पृथ्वी पाण्यावर तरंगून धरणें इत्यादि अतर्क्य गोष्टी घडवून आणणें, या गोष्टी जडाकडून किंवा किंचिज्ज्ञ जीवाकडून किंवा स्वभावतःच होणें शक्य नाहीं. ह्मणून ज्या सर्वज्ञाकडून या गोष्टी होतात, तोच ईश्वर, व तोच सृष्टिकर्ता, व फलदाताही तोच आहे, असें मानल्या-वांचून भागणार नाहीं. म्हणून तुझा निरीश्वरवाद त्याज्य आहे. यास्तव मनुष्यमात्रानें नास्तिक मताचा स्वीकार न करितां, त्या परमात्म्याला जाणून त्याचीच भजनपूजनादि सेवा शास्त्रांत यथाधिकार सांगितल्याप्रमाणें करून या भवबंधांतून आपली सुटका करून घ्यावी, असें सेश्वर कर्ममीमांसकांचे मतानें सिद्ध झालें.

श्लोक—स्तंभावांचुनि हें उभें नभ असे, पृथ्वी जळीं कीं तरे ।
देहो हा नवछिद्रभग्न असतां त्यामाजि वायू ठरे ॥
ऐसे खेळ अचाट दावुनि पहा तूं भिन्न सर्वांहुनी ।
तूंतें स्वानुभवें विलोकिति जगीं नैराश्यवेत्ते मुनी ॥ १ ॥

निरीश्वरवादखंडण समाप्त

॥ अथ प्रारब्धप्राधान्यमतनिरूपणारंभः ॥

गुरु ह्मणतात—बा शिष्या ! प्रयत्नवादाचें खंडण करण्याकरितां प्रारब्धवाद्याचें ह्मणणें असें आहे कीं, प्रयत्नवाद आणि ईशकर्तृतावाद या-पेक्षां आमच्या प्रारब्धवादालाच प्राधान्यता विशेष आहे. कारण मनुष्यांना कोणत्याही प्रयत्नाविषयीं बुद्धि होणें हें पूर्व संस्कारांवरच अवलंबून आहे. ह्मणून "बुद्धिः कर्मानुसारिणी" ही जी ह्मण आहे ही व्यर्थ ह्मणतां येणार नाहीं. आणि जीवांत कोणत्याही कर्माचा प्रयत्न करण्याचें स्वातंत्र्य जर असतें तर सर्वच जीव स्वप्रयत्नानें सुखी झाले असते. ज्याअर्थीं प्रत्येक जीव कोण-त्याना कोणत्या तरी एखाद्या विषयांत दुःखी असतोच, त्या अर्थीं त्याच्यांत सुखः साधनाविषयीं स्वातंत्र्य नसून प्रारब्धपरतंत्रता आहे, हें स्पष्ट रीतीनें अनुभवास येतें. म्हणून इष्ट विषयाचा प्रयत्न होणें आणि प्रयत्नाचें फळ मिळणें, हे दोन्हीही भाव प्रारब्धाधीन आहेत असें सिद्ध होतें.

शंका—यावर प्रयत्नवादी कदाचित् असें ह्मणेल कीं, ऐहिक प्रयत्नानेंच कित्येकांची रोगनिवृत्ति, धनप्राप्ति, विद्याप्राप्ति, पुत्रप्राप्ति, वगैरे फल प्राप्त होत असल्याचें आणि स्वस्वातंत्र्यानें तत्तद्विषयक प्रयत्न होत असल्याचें प्रत्यक्ष दृष्ट आहे. यांत प्रारब्ध मानण्याचें काय कारण ? या-वर आमचें उत्तर असें कीं, तूं वर 'कित्येकांची, प्रयत्नानें रोगनिवृत्ति वगैरे होते,' असे शब्द घातलेस, यावरून सर्वांनाच तसें प्रयत्नाचें प्रत्यक्ष फल मिळत नाहीं, हें तुझ्या बोलण्यावरूनच सिद्ध होत आहे. म्हणून आम्ही असें म्हणतों कीं, ज्यांचा ज्यांचा इष्ट विषयाच्या फलप्राप्तीचा काल प्रारब्धानुसार आला असेल, त्यांना त्यांनाच त्या त्या विषयाच्या फलप्राप्तीविषयीं प्रयत्न करण्याची बुद्धि होईल; सर्वांना होणार नाहीं. आणि प्रारब्ध जर अनुकूल असेल, तरच त्या प्रयत्नाचें फल येथेंच प्रत्यक्ष मिळतें. नाहींतर प्रयत्नानेंही इष्टमनोरथ सिद्ध होत नाहींत, असाही पुष्कळ अनुभव आहे. याविषयीं तूं असें पहा कीं, कित्येक विद्या शिक-

ण्याला योग्य अधिकारी असूनही, व विद्येची इच्छा असूनही, विद्या शिकण्याचा प्रयत्न करीत नाहींत. किंवा त्यांस विद्या शिकण्याचीं साधनें गुरु, धन व देश-काल वगैरे सामुग्री जुळून येत नाहीं; व कदाचित् दैव-वशात् जुळून आल्यास त्याप्रमाणें विद्या शिकण्याचा प्रयत्न करूनही विद्या येत नाहीं, व आली तरी प्रारब्धानुकूलता नसल्यामुळें, इष्ट फल-प्राप्ति होत नाहीं. यावरून स्त्री, पुत्र, धनादि सर्व विषयांची प्राप्ति होणें, आणि त्यांच्या प्राप्तीविषयीं योग्य प्रयत्न होणें, या दोन्हीही गोष्टी प्रारब्ध-कर्माधीन असल्यामुळें, सर्व जीव प्रारब्धपरतंत्र आहेत असेंच ठरतें. म्हणून प्रयत्न आणि फलभोग यांत जीवांना स्वातंत्र्य नाहीं, हें सिद्ध होत आहे. यावर कित्येक शास्त्रकारांचें म्हणणें असें आहे कीं, प्रापंचिक सुख, दुःख व स्त्री, पुत्र, धनादि सर्व विषय, हे प्राप्त होणें किंवा न होणें हें सर्व दैवा-धीन असो; पण परमार्थाविषयीं यत्न करणें, हें पौरुषप्रयत्नाधीन आहे. प्रारब्धाधीन नाहीं. यावर माझें प्रारब्धवाद्याचें म्हणणें कीं, हें मत चुकीचें आहे. कारण—

" बहुत सुकृताची जोडी, म्हणुनी विठ्ठलीं आवडी ॥ "

या संतवाक्यावरून ज्याचा पूर्वीचा शुभ वासनासंस्कार असेल, तोच मनुष्य शुभकार्याचे ठिकाणीं प्रवृत्त होईल आणि ज्याचा पूर्वीचा अशुभ वासनासंस्कार असेल, तो अशुभ कृत्याचे ठिकाणींच प्रवृत्त होईल.

" पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ॥ "

या भगद्वचनावरूनही पूर्व जन्मींचा ज्याचा जसा प्रबल संस्कार असेल, त्याच मार्गाला तो वळणार; मग प्रपंच असो कीं परमार्थ असो.

" जन्मांतरसहस्रेषु या मतिर्भाविता पुरा ।
तामेव भजते जंतु उपदेशो निरर्थकः ॥ "

या वचनावरूनहीं हेंच निष्पन्न होत आहे कीं, यद्यपि शास्त्रका-रांनीं विधिनिषेधात्मक प्रयत्न मनुष्यास कर्तव्यत्वानें सांगितला आहे, तथापि ज्याचा शास्त्रविधीनें वागण्याचाच पूर्वीचा शुभ संस्कार प्रबल असेल

तोच शास्त्रविधीनें वर्तन करील आणि त्याचेच ठिकाणीं सर्व शास्त्रवाक्यांची साफल्यता होईल. ज्याचा जन्मांतरींचा शुभ वासनासंस्कार नसेल तो प्रपंचांतच राहून निषिद्ध मार्गानेंच वर्तन करणारा असल्यामुळें त्याला शास्त्रोपदेश निरर्थक आहे. अहो! भजनपूजन किंवा श्रवणमननादि परमार्थ-साधनाविषयीं प्रयत्न करण्याचें जर सर्वच मनुष्यांच्या आधीन असतें तर ते तद्विषयक प्रयत्न कां करीत नाहींत? संसारसमुद्र दुःखरूप आहे, त्यांतून आपली सुटका व्हावी, हें सर्वांना कळत नाहीं काय? अर्थात् हें कित्येकांना कळत असूनही ते परमार्थसाधनाविषयीं यत्न कां करीत नाहींत? याचें उत्तर सांगा. यावर, अविचारामुळें ते प्रयत्न करीत नाहींत असें आपण म्हणाल; पण तो अविचार तरी त्यांचे ठिकाणीं कां असावा? हें सांगा. अर्थात् प्रारब्धानेंच अविचार होतो असें म्हणावें लागतें, आणि दुर्योधनानें जें म्हटलें आहे तेंच बरोबर आहे—

जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिर्जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः ॥
केनापि देवेन हृदि स्थितेन यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि ॥

म्हणजे प्रारब्धरूप परमात्मा जशी जशी मला प्रेरणा करील, तसा तसा मी वागतों; मनुष्याच्या स्वाधीन कांहीं नाहीं.

अर्जुनाचेंही म्हणणें याविषयीं असेंच आहे—

"अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः" ॥

"देवा! पाप करण्याची मला बिलकुल इच्छा नसतांना व शुभ कर्म करण्याची मला इच्छा असून, मला बलात्कारानें पापकर्म करण्याविषयीं कोण प्रेरणा करतो हें कांहींच समजत नाहीं." यावरून सर्व जीव सर्व कामांत प्रारब्धाधीन आहेत हेंच सिद्ध होतें. आणि याविषयीं तुम्हीं दुसऱ्या बाजूनें असा विचार करा कीं, परमार्थाविषयीं प्रयत्न करण्याचें स्वातंत्र्य मनुष्यांत जर असेल तर सर्व ज्योतिषशास्त्र खोटें म्हणावें लागेल! कारण प्रत्येक मनुष्याच्या जन्मकुंडलीवरून जन्मापासून तों मरेपर्यंत

शुभ अथवा अशुभ किंवा प्रपंच अथवा परमार्थ यांतील जेवढ्या अवश्य गोष्टी व्हावयाच्या असतील त्या होणारच व जें होणार नसेल तें होणार नाहींच, असें निश्चयपूर्वक ज्योतिषशास्त्रावरून ठरतें. मात्र कुंडली बरोबर असून ती जाणणाराही यथार्थच असावा लागतो. यथार्थ ज्योतिर्वेत्ता निश्चयपूर्वक असें म्हणतो कीं, कुंडलीमध्यें मोक्षकारक ग्रह ज्या स्थानीं असावयास पाहिजेत त्या ठिकाणीं ते ते शुभग्रह जर नसतील तर परमार्थ-विषयक प्रयत्नही हातुन घडणार नाहीं व मोक्षेच्छा असली तरी या देहांत तो मुक्त होणार नाहीं. तसेंच प्रवृज्याग्रह, कुंडलींत जर असतील, तरच तो विरक्त किंवा संन्यस्त होईल. नाहींपेक्षां संन्यासग्रहणाची इच्छा असूनही, प्रारब्धप्रतिबंधामुळें तो योग येणार नाहीं. तसेंच संसारांत असून कर्मनिष्ठ होणेंही, कर्मस्थानच्या शुभाशुभ ग्रहांवरच अवलंबून आहे. शुभस्थानीं पापग्रह किंवा त्यांची दृष्टि असेल तर तत्तत्कालीं हातून पापच घडणार, शुभग्रह असतील तर पुण्यच घडणार! असा जर जन्मा-पासून तों मरेपर्यंतचा सर्व ठराव होऊन चुकला आहे, तर आम्ही नवीन तें काय करणार! व "एवं कुरु, एवं मा कुरु" असा शास्त्रकारांनीं विधि-निषेध आम्हांस सांगण्याचें तरी काय प्रयोजन असावें, तें हरि जाणे! कारण अमुक मनुष्याकडून अमुक मिनिटांत अमुक अमुक गोष्ट निश्चय-पूर्वक होणारच, असा जर सर्व विषयांचा ठराव कुंडलीविज्ञानावरून निश्चय-पूर्वक पूर्वींच ठरला आहे, तर आतां जीवाच्या स्वातंत्र्यांत कोणचा विषय शिल्लक राहिला हें सांगा? अर्थात परमार्थ होणें न होणें हेंही ठरलेलें असतें.

अहो! " अवश्यंभावि भावानां प्रतिकारो भवद्यदि ॥
तदा दुःखैर्न लिप्येरन् नलरामयुधिष्ठिराः ॥ "

असें विद्यारण्यांचें ह्मणणें आहे. अवश्य ठराविक गोष्टींचा प्रति-कार करण्याचें मनुष्याच्या स्वाधीन असतें तर नलराजा, राम, युधिष्ठिर हीं मोठमोठालीं धेंडें, ईश्वरानुगृहीत असून सुद्धां दुःखी का झालीं याचा विचार नीट करा! ह्मणून " यदभावि न तद्भावि भावि चेन्न तदन्यथा ॥ इति

चिंताविषघ्नोयमगदः किं न पीयते " ॥ अर्थ—मनुष्यावर प्रारब्धवशात् एखादें संकट उत्पन्न झालें असतां, कसें करूं व काय करूं अशी मोठी चिंता उत्पन्न होते. या चिंतारूप विषयावर औषध हेंच आहे कीं; जें होणार तें होणारच; व जें न होणार, तें कधींही होणार नाहीं, असा विचारानें निश्चय करणें. या औषधानेंच चिंतारूप विष नष्ट होतें, असें विद्यारण्यांनीं पंचदशींत म्हटलें आहे. तेव्हां माझें ह्मणणें चिंता ही प्रारब्धानेंच होते व त्यावरील औषधोचारही प्रारब्धानेंच प्राप्त होतो. तसेंच संसार-दुःखही प्रारब्धानेंच प्राप्त होतें. तन्निवृत्तिउपायभूत विधिनिषेधात्मक शास्त्राज्ञाही प्रारब्धानेंच प्राप्त होते. शास्त्राज्ञेप्रमाणें वागणेंही दैवानुसारच होतें. ह्मणून शास्त्राज्ञेलाही एका प्रकारानें वैयर्थ्य ह्मणतां येणार नाहीं. तेव्हां सर्व बाबतींत प्रारब्धच बलवत्तर आहे. येथें अधुनिक प्रयत्नाचें कांहीं एक चालत नाहीं. हें पुढील व्याख्यानावरूनही तुम्ही लक्षांत आणा.

" तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतवर्षभ ॥ "

या ठिकाणीं भगवंतानीं अगोदर इंद्रियनिग्रह करण्याचा प्रयत्न करावयास सांगितलें, पण हा प्रयत्न कित्येकांना बलवत्तर पूर्व संस्कारा-मुळें असाध्य होत असल्यामुळें " निग्रहः किं करिष्यति " असेंच भग-वंतांना शेवटीं म्हणावें लागलें. याचें कारण अदृष्टवशात् तो निग्रह कित्ये-कांना होतो व कित्येकांना होत नाहीं. ज्यांचा पूर्वींचा शुभसंस्कार दृढ असेल, तेच इंद्रियनिग्रह वगैरे पौरुष प्रयत्नानें करूं शकतात. व ज्यांचा अशुभ संस्कार दृढ असेल त्यांना तो होत नाहीं. अजितेंद्रियत्वामुळें अनर्थ होतो हें त्यांना कळत नाहीं असें नाहीं. तर ज्या पंडितांना हें कळतें, ते सुद्धां अजितेंद्रिय कां राहतात हें सांगा? अहो, मोठमोठाले पंडित लोक,

" कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत् त्रयं त्यजेत् ॥ "

हें शास्त्र दुसऱ्याला सांगतात, पण त्यांच्या स्वतःकडे पाहिलें ह्मणजे या गोष्टीचें त्यांचे ठिकाणीं आवळ्याएवढें पूज्य असतें! दुसऱ्याला मात्र काम जिंकावा, क्रोध जिंकावा, लोभ जिंकावा, जितेंद्रिय असावें, असें सांगतात,

पण दुसऱ्यांपेक्षांही कामादि विकार त्यांचे ठिकाणीं ज्यास्त दृष्टीस पडतात. तेव्हां यांना ज्ञान नाहीं असें म्हणावें कीं काय ? तर तसें ह्मणतां येणार नाहीं. कारण तसें म्हटल्यास " सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ॥ " या श्लोकास वैयर्थ्य येऊन पूर्वींच्या मोठमोठ्या ज्ञाते लोकांनासुद्धां मूर्ख म्हणावें लागेल. तेव्हां ज्ञानी असो का अज्ञ असो, कामक्रोधादि षड्-विकार जिंकणें न जिंकणें, हें प्रत्येकाच्या प्रारब्धावरच अवलंबून आहे. त्यांच्याकडे त्याचा दोष नाहीं. तुम्हीं असें पहा कीं,

" त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः "

असें कळत असतांनासुद्धां ब्रह्मदेवासारख्या शास्त्रप्रवर्तक असणाऱ्या मोठमोठाल्या भेंडांची या प्रारब्धानें काय दुर्दशा उडविली आहे, हें पुराणादिकांवरून तुमचे लक्षांत येण्यासारखें आहे. पूर्वींचे ज्ञाते असोत का आत्तांचे असोत, आपआपल्या प्रकृत्यनुसार त्यांच्या देहांकडून चांगल्या-वाईट ज्या गोष्टी घडावयाच्या त्या घडणारच. आतां यांत फरक इतकाच कीं, कित्येकांना काम अजिंक्य होतो, कित्येकांना क्रोध अजिंक्य होतो व कित्येक ज्ञात्यांना लोभ अजिंक्य होतो. याचा या पुढील उदाहरणावरून बारीक विचार करा. अहो, फार तर काय, पण कामाच्या बाबतींत ब्रह्मदेवसुद्धां स्वकन्येचे ठिकाणीं रत झाला ! तसेंच साक्षात् शंकराचीसुद्धां या प्रारब्धानें काय दुर्दशा उडविली, हें भागवताच्या अष्टमस्कंधांत मोहिनी-चरित्रांत स्पष्ट सांगितलें आहे. तेथें असें ह्मटलें आहे कीं, शंकरानें मोहि-नीला पाहून मोहानें तिच्या पाठीस लागून शेवटीं स्वशरीराची शुक्रपातानें सर्वस्वी हानि करून घेतली ! तसेंच अजितेंद्रियत्वामुळें इंद्रानें तर अह-ल्येशीं गमन केल्यामुळें गौतमाकडून असा शाप घेतला कीं, " योनि-लंपट दुष्टात्मन् सहस्रभगवान् भव " इति ॥ म्हणजे 'तूं हजारों प्रकारें भगवान हो.' असा इंद्रानें शाप घेऊन आपल्या पूज्य शरीराला कायम-चींच हजारों भोकें पाडून घेतलीं ! चंद्र तर या कामापायीं गुरुपत्नीचे ठायीं गमन केल्यामुळें अखेर काळा पडला ! याचप्रमाणें पराशर, विश्वा-

मित्र, वगैरे मोठमोठ्या घेंडांचा जितेंद्रियत्वाविषयींचा पराक्रम कितपत गाजला, हें सर्व पुराणांतरीं वर्णन केल्यावरून तुह्मांस माहित असणारच. त्याचें आतां विशेष स्पष्टीकरण नको. तसेंच आतां ज्यांनीं—

"तस्मात्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ"

हें ज्ञान स्मृतिरूपानें सर्व जगाला सांगितलें, त्या श्रीकृष्णाचें जितेंद्रियत्व आणि पूर्ण ब्रह्मचर्यत्व कितपत होतें हें तर सर्व जगजाहीर आहेच. अहो! कृष्णानें तर या कामापायीं आणि अजितेंद्रियत्वामुळें मूर्ख लोकांकडून "चोर–जार–शिखामणिः॥" अशी लेखी व कायमचीच पदवी मिळविली! ठीकच आहे, साक्षात्कृष्ण झाला तरी अदृष्टापुढें काय करणार? श्रीकृष्णाच्या जन्मकुंडलीमधें जायास्थानीं पापग्रहान्वित उच्चीचा शुक्र होता. त्यामुळें त्या शुक्रानेंच कृष्णाला "चोर–जार–शिखामणिः" ही पदवी मिळवून दिली असें म्हणण्यास हरकत नाहीं. कृष्णाकडे काय त्याचा दोष आहे? आणि आमच्या प्रारब्धवादालाही विशेष जोर या कृष्णाच्या पूर्ण ब्रह्मचर्यामुळेंच आला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कृष्णावर स्वतः प्रारब्धानें हा अशा तऱ्हेचा शिंतोडा जेव्हां उडविला तेव्हां त्यांना गीतेंत

"निग्रहः किं करिष्याति" "करिष्यस्यवशोऽपि तत्" "पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः" "सदृशं चेष्टते स्वस्याः"

इत्यादि वचनें घालून ठेवावीं लागलीं. नाहींतर आमच्या या प्रारब्धवादाला उच्चासन मिळालें नसतें, हें खास. असो. हा एक कामासंबंधानें पूर्व संस्काराचा प्रभाव ज्ञात्याचे ठिकाणींसुद्धां कसा असतो, हें सप्रमाण सांगितलें.

आतां क्रोधजयाच्या बाबतींत सुद्धां ज्ञात्यांचे ठिकाणीं हाच नमुना दिसतो. दुर्वास आणि सनकादिकांना क्रोध जिंकावा अशी अक्कल नव्हती कीं काय? पण ती वेळ आली कीं, अक्कल बाजूलाच राहते. तुम्ही असें पहा कीं, "कामात्क्रोधोऽभिजायते" या न्यायानें पाहिलें असतां सनकादिकांसारख्यांना तर 'काम' म्हणजे कोणतीही इच्छा नसून वैकुंठ लोकीं जाऊन त्या बिचाऱ्या जयविजयावर रागावून त्यांना शाप देऊन

तीन जन्म भोगावयास लावण्याचें काय कारण ? पण कोणीहि असो; यावद्देह आणि मन जिवंत आहे, तेथपर्यंत ईश्वर असला तरी हे षड्विकार झाल्यावांचून राहणार नाहींत. असें वसिष्ठांनीं या पुढील श्लोकांत म्हटलेंच आहे (वा. प्र. ६ पू. अ. ८५ श्लो. १०६)

"सर्वस्यैव हि राजर्षे भूतजातेर्जगत्त्रये ।
देवादेरपि देहो यं द्वयात्मैव स्वभावतः ॥
अज्ञमस्त्वथवा तज्ज्ञं यावत्स्वांतं शरीरकं ।
सर्वमेव जगत्यंग सुखदुःखमयं स्मृतम् ॥
तमो मेघपटेनैव स्वभावो ह्यत्र कारणं ॥
सम्यग्ज्ञानाग्निना यस्य दग्धा संदेहजालिकाः ।
नाभिवांच्छति न द्वेष्टि न शोचाति न हृष्याति ।
सर्वं कर्म करोत्यंतर्न करोति च किंचन ॥

असो. हा एक क्रोधाचा नमुना तुलां थोडक्यांत सांगितला. आतां लोभाचा मासला तत्त्ववेत्त्यांचें ठिकाणींसुद्धां कसा दृष्टीस पडतो हें पाहा. काम, क्रोध आणि लोभ हे तिन्ही विकार वसिष्ठ, याज्ञवल्क्य, जनक, श्रीकृष्ण, वगैरे महापंडित व तत्त्ववेत्ते असूनही यांचे ठिकाणीं हे विकार मूर्तिमंत जागृत होतेच. कारण यांचे ठिकाणीं स्त्री, पुत्र, धन वगैरे विषयांचा लोभ निःशेष जर नसेल, तर यांना मग संसारांत राहून अनेक प्रकारच्या भानगडी करण्याचें तरी कारण काय ? अहो,

"अकामस्य क्रिया काचित् दृश्यते नेह कर्हिचित् ॥
यद्यद्धि कुरुते जंतुस्तत्तत्कामस्य चेष्टितम् ॥"

यावरून ज्या अर्थीं हे संसारांत होते, त्या अर्थीं तें सर्व कामचेष्टितच म्हटलें पाहिजे. यांना जर लोभ नव्हता, तर मग या लोकांनीं संन्यासआश्रम कां घेतला नाहीं हें सांगा ? अहो ! याज्ञवल्क्यांनीं तर सभेंत सर्व पंडित लोकांना फसवून जनकांकडून हजारों सुवर्णखचित गायी लुटून आणल्या ! तेव्हां बायकामुलांचा व धनाचा लोभ असल्यावांचून यांचे

हातून हीं कृत्यें होतील काय ? अहो ! यांचें ज्ञान लोकांना सांगण्यापुरतेंच. पण यांचे विषयलोभाचें प्रारब्ध यांना कोठें सोडतें ? तात्पर्य—ज्ञानी असो का अज्ञ असो, देह आहे तेथपर्यंत कामक्रोधादि षड्रिपूंच्या कचाट्यांतून निःशेष सुटका होणें कधींही शक्य नाहीं. निःशेष जितेंद्रिय होण्याचा प्रयत्न करण्याचें ज्याच्या प्रारब्धीं असेल तोच जितेंद्रिय होईल. असा ब्रह्मरूप झालेला जो कोणी शुक—वामदेवासारखा असेल तो मात्र सुटला. बाकी सर्व प्रारब्धांतच गुरफटले आहेत. प्रारब्धादि कर्मांतून फक्त एक ब्रह्ममात्र सुटलें आहे. याखेरीज कोणत्याही देहधाऱ्याला प्रारब्ध कर्म उल्लंघन करण्याचें स्वातंत्र्य दिसत नाहीं. म्हणून प्रयत्नवाद व्यर्थ आहे. आणि ईश्वरही सर्वांच्या प्रारब्धानुसारच सर्वांना फलदाता असल्यामुळें, फलदातृत्वामध्यें ईश्वरालाही स्वातंत्र्य नाहीं. असें " कृतप्रयत्नापेक्षस्तु " या व्याससूत्रानें पूर्वींच्या व्याख्यानांत सिद्ध झालेंच आहे. म्हणून आमचा प्रारब्धवादच सर्व वादांत श्रेष्ठ आहे. याविषयीं प्रमाण सांगून मी आपल्या प्रारब्धकर्मावरच सर्व भार ठेवून आतां बोलणें बंद करून स्वस्थ बसतों.

शशिदिवाकरयोर्ग्रहपीडनं गजभुजंगमयोरपि बंधनं ॥
मतिमतां च विलोक्य दरिद्रतां विधिरहो बलवानिति मे मतिः ॥१॥
श्रुतिरपि " तस्य तावदेव चिरं यावन्न विमोक्षेऽथ संपत्स्यथ इति !!

येथें प्रारब्धवाद्याचें मत समाप्त झालें.

प्रयत्नप्राधान्यनाममतवर्णन ॥



प्रारब्धवादखंडणप्रारंभः ॥

गुरु म्हणतात शिष्या ! याप्रमाणें प्रारब्धवाद्याचें मत काय आहे हें तुला सांगितलें. आतां प्रयत्नवाद्याचें यावर काय म्हणणें आहे, तेंहि ऐक. प्रारब्धवाद्याचें मागें झालेलें सर्व भाषण ऐकून घेऊन त्या मताचें खंडण करण्याकरितां प्रयत्नवादी बोलण्यास सुरवात करीत आहे. अहो !

प्रारब्धवादिन: , आपण जी इतका वेळ बडबड केलीत, ही केवळ एखादा वेडा मनुष्य जसा स्वप्नांत बरळत सुटतो, त्याप्रमाणें होय. आपलें हें सर्व भाषण अनुभव आणि शास्त्र यांचे विरुद्ध असल्यामुळें अत्यंत मूर्खपणाचें आहे. म्हणून तुझें मत मुमुक्षु लोकांना सर्वथैव त्याज्य आहे. तुला प्रारब्ध आणि प्रयत्न यांचें स्वरूप अझून कळलें नाहीं, असें दिसतें. असो. मी तुला असें विचारतों कीं, प्रारब्धकर्म हें कोणीं उत्पन्न केलें ? तें ईश्वरानें केलें ? कां आकाशांतून आपोआपच उत्पन्न झालें ? ईश्वरानें केलें म्हणशील तर ईश्वर हा दीपप्रकाशवत् अकर्ता व अभोक्ता असल्यामुळें त्याचे ठिकाणीं याचें कर्तृत्व संभवत नाहीं. कारण तो आप्तकाम आत्माराम आहे. त्याला एवढ्या उठाठेवीची जरूरी काय ? आणि कारणावांचून बळेंच जीवांना सुख:दुख भोगविण्याकारितां तो जर पापपुण्यात्मक प्रारब्धकर्म उत्पन्न करील, तर तो निर्दय ठरत असल्यामुळें त्यावर नैर्घृण्यादि दोष प्राप्त होतील. आणि दुसरें असें कीं, ईश्वर जर प्रारब्ध कर्माचा उत्पादक असेल, तर सुखदु:खाचा भोक्ताही तोच ठरेल, जीव ठरणार नाहींत. कारण जो ज्या कर्माचा कर्ता असतो, तोच त्याचा फलभोक्ता असतो. कर्ता एक आणि फलभोक्ता निराळाच हा न्याय कुठला ! म्हणून ईश्वर प्रारब्ध-कर्माचा उत्पादक होत नाहीं, हें सिद्ध झालें. व कर्त्यावांचून तें आपोआप आकाशांतूनही उत्पन्न होणें शक्य नाहीं. आतां यावर तूं कदाचित् असें म्हणशील कीं, प्रारब्धकर्म प्रवाहरूपेंकरून अनादि सिद्ध आहे, त्याचा कर्ता कोणी नाहीं, तर हें तुझें म्हणणें मूर्खपणाचें आहे, कारण प्राक्कर्म प्रवाहरूपेंकरून अनादि जरी असलें, तरी त्याचा कोणी तरी कर्ता असल्यावांचून कर्माचें अस्तित्वच संभवत नाहीं. म्हणून प्रारब्धकर्माचा कर्ता कोणीच नाहीं, हें म्हणणें चुकीचें आहे. कारण कर्ता कोणी नसेल तर भोक्ताहि कोणीच असणार नाहीं असें होईल. म्हणून सुखदु:खाचा भोक्ता ज्या अर्थीं जीव प्रत्यक्ष दिसत आहे, त्या अर्थीं प्रारब्ध कर्मही स्वप्रयत्नानें जीवानेंच करून ठेविलें आहे. यावरून स्वप्रयत्नावांचून जड प्रारब्धाची सिद्धि होत नाहीं हें सिद्ध होतें. आडांत नसेल तर पोहऱ्यांत

येणार कोठून ? या न्यायानें जीवामध्यें प्रयत्न करण्याचें स्वातंत्र्य जर नसेल तर प्रारब्ध आपोआप तयार होणार कोठून ? अर्थात् प्रारब्धाचा उत्पादक जीवांचा प्रयत्नच असल्यामुळें, प्रयत्नवादच मुख्य ह्मणावा लागतो. प्रारब्ध स्वतः उत्पन्न झालें नाहीं व तें ईश्वरानेंही उत्पन्न केलें नाहीं. ईश्वर प्रारब्ध आणि प्रयत्न या दोघांस दीपाप्रमाणें उदासीनत्वानें सारखाच प्रकाशित करतो. जीवांकडून बळेंच पापपुण्य करवून त्यांना विनाकारण दुःख द्यावें असें वैषम्य ईश्वरांत नाहीं. दीप जसा, चोर आणि साव किंवा राजा आणि दरिद्री यांना सारखाच प्रकाश करतो, त्याप्रमाणें परमात्मा सत्ता, स्फूर्ति आणि ज्ञानप्रकाश या बाबतींत दैव आणि यत्न या दोघांनाही सारखाच अनुकूल आहे. सूर्यप्रकाशाच्या सांन्निध्यानें जगांतील सर्व लोकांचे व्यवहार जसे त्यांच्या यत्नानें आपोआप सुरू होतात, ते सूर्य स्वतः करीत नाहीं, व कोणाला करावयासही सांगत नाहीं, त्याप्रमाणें सर्व जीवांच्या वासनेच्या ठायीं ईश्वराच्या ज्ञानप्रकाशाची व्यापकता असल्यामुळें प्रत्येकाच्या वासनेनुसार प्रत्येकाचे आपआपल्या विषयांत प्रयत्न सुरू होतात, आणि त्या यत्नाचें शुभाशुभ कर्मफलही सर्वांस पूर्वकर्मानुसार आपोआप प्राप्त होतें. ईश्वर मुद्दाम बुद्धिपूर्वक लोकांकडून पाप किंवा पुण्यकर्म करवितो, आणि त्याचें फल त्यांना देतो, असें मात्र नाहीं. तर लोहचुंबकन्यायानें त्याच्या सत्तेवर आणि प्रकाशसान्निध्यानें आपोआप प्रत्येकाच्या पूर्वकर्मानुसार प्रत्येकास सुखदुःखादि फल प्राप्त होतें. यांत ईश्वराचा कर्तृत्व, कारयितृत्व आणि फलदातृत्वादि कांहींएक संबंध नाहीं. ह्मणूनच

" नैव किंचित् करोति सः " " न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः " " नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं "

इत्यादि स्मृति, ईश्वरावरील कर्तृत्वादिकांचा आरोप निवारण करीत आहेत. असो. यासंबंधानें वशिष्ठ आणि रामचंद्र यांचा झालेला संवाद, थोडक्यांत तुला सांगतों, नीट लक्षपूर्वक ऐक. ह्मणजे तुझ्या डोक्यांत शिरलेलें प्रारब्धरूपी पिशाच तत्काळ नष्ट होईल. हें पिशाच नष्ट होणें, हेंच

पुढील पुण्यकारक संवादश्रवणाचें फल आहे असें जाण. (वा.प्र. २ सर्ग ९)

॥ राम उवाच ॥ प्राक्तनं वासनाजालं नियोजयति मां यथा ॥
मुने तथैव तिष्ठामि कृपणः किं करोम्यहं ॥ २३ ॥

अर्थ—राम म्हणतात, हे मुने! पूर्वकर्म मला जशी प्रेरणा करील तसेंच मी वागतों व वागणार. मी सर्वथैव प्रारब्धाधीन असल्यामुळें अगदीं कृपण झालों आहें. आपण अमुक कर आणि अमुक करूं नको हें सांगतां खरें, पण माझ्यांत कोणताही प्रयत्न करण्याचें स्वातंत्र्य नाहीं! प्रारब्धानें जेवढें होणार असेल तें होणारच. याप्रमाणें प्रारब्धवादासंबंधानें रामचंद्राचें अनेक तऱ्हेचें पूर्वीचें व हें आतांचें भाषण ऐकून वसिष्ठ मुनि बोलण्यास सुरवात करतात. (प्र. ४ अ. ८।९) वसिष्ठ उवाच—

नाकृतिर्न च कर्माणि न स्पंदो न पराक्रमः ॥
तन्मिथ्यारूढवज्ज्ञानं दैवं नाम किमुच्यते ॥
दैवं न दृश्यते दृष्टया न च लोकांतरे स्थितं ॥
पुरुषो जायते लोके वर्धते जीर्यते पुनः ॥
न तत्र दृश्यते दैवं जरायौवनबाल्यवत् ॥
प्राक् स्वकर्मेतराकारं दैवं नाम न विद्यते ॥
तस्मात्प्राक्पौरुषाद्दैवं नान्यत्तत्प्रोज्झ्य दूरतः ॥
इति पौरुषेमवास्ति दैवमस्तु तदेव च ॥

अर्थ—वसिष्ठ म्हणतात रामा! तूं दैव हें कोठचें काढलेंस? अरे! या दैवाला आकार नाहीं, रूप नाहीं, जाति नाहीं. याला स्वतः स्पंद नाहीं, व याची कोणतीही क्रिया दिसत नाहीं, व पराक्रमही दिसत नाहीं! असें असून उगीच कुठलें तरी एक दैव काढलेंस आणि कर्तव्यकर्माचा त्याग करून एखाद्या महामूर्ख आळशासारखा स्वस्थ बसतोस, याला ह्मणावें तरी कांय? अरे! मूर्ख लोकांनीं स्वकल्पनेनें मिथ्याच रूढीला आणलेलें असें हें दैव म्हणजे काय पदार्थ आहे हें एकदां सांग पाहूं? वेड्या! आजपर्यंत दैव हें कांहीं कोणाच्या डोळ्याला दिसलें नाहीं. बरें,

तें कांहीं येथून अन्यत्र लोकांतरीं राहतें असेंही म्हणतां येत नाहीं. कारण तेथें तरी त्याचा अनुभव कोणाला यावा कीं नाहीं? पण लोकांतरीं सुद्धां तसाही कोणास त्याचा अनुभव नाहीं. अरे! हा पुरुष उत्पन्न झाल्यापासून आपल्या व दुसऱ्याच्या बाल्य, यौवन, जरादि सर्व अवस्था प्रत्यक्ष पाहतो. पण त्या अवस्थेंत दैव ह्मणून कांहीं पदार्थ कोणाला आजपर्यंत दृष्टीस पडला नाहीं. मग स्वप्रयत्नव्यतिरिक्त अन्य दैवाची व्यर्थ कल्पना करण्यांत अर्थ काय? अरे! आपणच पूर्वजन्मीं केलेला जो प्रयत्न त्यालाच दैव ह्मणतात. प्रयत्नाहून प्रारब्धाची कांहीं निराळी जाति नाहीं. फक्त कालभेदामुळें प्रयत्नाच्याच स्वगतभेदाला प्रारब्ध असें ह्मणतात. प्रारब्ध आणि प्रयत्न यांत सजातीय किंवा विजातीय भेद बिलकुल नाहीं. म्हणून प्रयत्नाहून प्रारब्ध ही निराळी वस्तु काढून दाखवितां येणार नाहीं. आणि 'प्रारब्ध' या शब्दांतच रभ् धातु प्रयत्नार्थी असल्यामुळें त्याचा अर्थ पूर्व प्रयत्न असाच होत आहे. पूर्व प्रयत्नालाच दैव, अदृष्ट, भाग्य, प्रारब्ध वगैरे शब्दांनीं उच्चारिलें जातें एवढेंच. यांत फक्त एक भूतकालांत झालेला प्रयत्न आणि एक वर्तमानकालांत सुरूं असणारा प्रयत्न एवढाच काय तो दोहोंतील भेद. पूर्वीं आपणच केलेला जो यत्न तो आतां दिसत नाहीं. ह्मणून यालाच अदृष्ट म्हटलें जातें व हल्लीं देहाभिमानेंकरून केलेल्या वासनात्मक कर्मसंस्काराला क्रियमाण कर्म अथवा प्रयत्न असें म्हटलें जातें. ह्मणून प्रारब्ध आणि क्रियमाण प्रयत्न, या दोहोंचे कर्ते आपणच आहों. यावरून कर्तृत्वाविषयीं आपल्यांत पारतंत्र्य केव्हांही नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. वास्तविक प्रारब्धाचे कर्ते आपणच असून कित्येक मूर्ख लोकांस असें वाटतें कीं, आपण व आपल्या प्रयत्नकर्माहून दैव ह्मणून अन्य कांहीं तरी एखादी दैवी माया वगैरे अजब वस्तु असावी, व तिचा आपणावर सुखदुःखभोक्तृत्वाविषयीं मोठा जुलूम होत आहे! अशी मूर्ख लोकांची समज होऊन बसली आहे. पण ती अत्यंत चुकीची आहे. तूं असें पहा कीं, पूर्वीं आपणच आपल्या प्रयत्नानें व स्वातंत्र्यानें एखादी भिंत बांधलेली असते, किंवा एखादें झाड लावलेलें असतें. त्यापासून जर

आपणांस अडचण होऊं लागली तर त्या भिंतीस व झाडास पाडून टाकण्याचें स्वातंत्र्य व सामर्थ्य आपणांत आहे. त्या भिंतीची ' मी आतां तात्काल पडणार नाहीं.' अशी जरी तक्रार व बलात्कार असला, तरी कांहीं कालानें व अनेक उपायानें तिला हाणून पाडण्याचें आपणांत सामर्थ्य आहे. त्याप्रमाणें पूर्वी आपणच आपल्या प्रयत्नानें उत्पन्न केलेल्या प्रारब्धाचा नाश करण्याचें आपल्या स्वाधीन आहे. तो कसा ह्मणशील तर प्रबल प्रारब्धाचा भोगानें नाश होतो एक, अथवा " दैवं जह्यात् समाधिना " या सप्तम स्कंधांतील उक्तीवरून निर्विकल्प समाधीच्या अभ्यासानें दैव जिंकतां येतें. आणि अप्रबल असणारे जे पूर्व संस्कार व भोग हे आधुनिक प्रबल प्रयत्नानें नष्ट करतां येतात. एवंच यथाशक्ति व कालाकालानें वाटेल तें करण्याचें जीवांत स्वातंत्र्य आहे. आणि पारमार्थिक स्वात्मविचारानें पाहिलें तर प्रारब्धादिकांचा व आपला कांहीं एक संबंध नाहीं. आत्मदृष्टया प्रारब्ध वगैरे मुळांत नाहींच, मग त्याचा नाश तो काय करावयाचा ? पण ही भाषा सर्वांस पटणार नाहीं. ह्मणून तो विचार तूर्त राहूं द्या. सांप्रत विचारदृष्टया वासिष्ठ म्हणतात—

दैवं जेतुं यतो यत्नैर्बालो यूनेव शक्यते ॥
यथा यथा प्रयत्नः स्याद्भवेदाशु फलं तथा ॥
बालः प्रबलपुंसेव तज्जेतुमिह शक्यते ॥
द्वाहुडावेव युध्येते पुरुषार्थौ परस्परं ॥
य एष बलवांस्तत्र स एव जयति क्षणात् ॥

अर्थ—रामा ! द्वंद्व युद्धामध्यें तरुण मनुष्य लहान मुलाला जसा सहज जिंकून टाकतो, किंवा दोन एडक्यांचें युद्ध सुरू असतां, त्यामध्यें जो बलिष्ठ एडका असतो तो अप्रबल अशा लहान एडक्यास जसा सहज जिंकतो, त्याप्रमाणें प्रारब्ध आणि प्रयत्न हेच कोणी दोन प्रकारचे एडके आहेत असें समज. या दोघांमध्यें प्रयत्नरूप एडका जर जास्त जोरदार असेल तर अप्रबल असणाऱ्या प्रारब्धसंस्कारांना व त्यांच्या फलाला तो

तात्काल हाणून पाडतो. ह्मणजे किरकोळ प्रारब्धभोग आधुनिक विशेष प्रयत्नानें नष्ट होतात, आणि जे प्रबल भोगसंस्कार असतात, ते मात्र या जन्मांत किरकोळ यत्नानें नष्ट होणारे नसतात, ते भोगानेंच नष्ट होतात. ह्मणून
" आलीया भोगाशीं असावें सादर। देवावरी भार घालूं नये ॥ "
या वचनावर आणि—

" अवश्यंभावि भावानां प्रतिकारो भवेद्यदि ॥
तदा दुःखैर्न लिप्येरन् नलरामयुधिष्ठिराः ॥

या वचनावर विश्वास ठेवून समाधान ठेवावें. हीं वरील वचनें प्रबलभोगविषयक आहेत. आणि " जहि शत्रुं महाबाहो " " तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य०" ' कुरु ' ' त्यज ' ' जुहुयात् ' ' दद्यात् ' वगैरे विधिनिषेधप्रतिपादक वाक्यें, अप्रबल असणारे पूर्व वासनासंस्कार ऐहिक प्रयत्नानें नष्ट होतात, म्हणून प्रत्येकानें यथाधिकार व यथाशक्ति शुभवासना वाढवून अशुभ वासना नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यास सांगत आहेत. अशा युक्तीनें उभय वाक्यांत विरोध येत नसून वैय्यर्थ्यही येत नाहीं. तात्पर्य, कांहीं प्रारब्धकर्म प्रयत्नानें व कांहीं भोगानें नष्ट करण्याचें जीवांत सामर्थ्य व स्वातंत्र्य आहे. जीव सर्वथैव पराधीन आहे असें म्हणतां येणार नाहीं.

क्रमेणोपार्जितेऽप्यर्थे नष्टे कार्या न खेदिता ॥
न बलं यत्र मे शक्तं तत्र का परिदेवना ॥

अर्थ—एखादे वेळीं असें दिसून येतें कीं, दुःखनिवृत्तीविषयीं पुष्कळ यत्न करूनही प्रारब्धप्राबल्यामुळें फलसिद्धि होत नाहीं, त्यामुळें सर्व यत्न फुकट गेला असें वाटतें. अशा वेळीं प्रारब्धरूप एडक्याचा जोर आपल्या आधुनिक प्रयत्नापेक्षां ज्यास्त आहे, असा विचार करून सद्यःफल प्राप्त झालें नाहीं ह्मणून खेद व शोक करीत बसूं नये. कारण आधुनिक यत्नाचें फल भोग समाप्त झाल्यानंतर होणारें असतें. विचारपूर्वक केलेला कोणताही प्रयत्न फुकट कधींही जात नाहीं, असा पूर्ण निश्चय ठेवावा.

सर्व एव जगद्भावा जयत्यधिकयत्नवान् ॥
तस्मात्पौरुषमाश्रित्य सच्छास्त्रैः सत्समागमैः ॥
प्रज्ञाममलतां नीत्वा संसारजलधिं तरेत् ॥ २४ ॥

अर्थ—वसिष्ठ ह्मणतात—रामा, जगांतील कोणत्याही विषयासंबंधानें जो निरंतर सारखा यत्न करीत राहतो, त्याला कांहीं प्रतिबंधामुळें तात्काल फल जरी न मिळालें, तरी तें प्रयत्नानुरूप केव्हांना केव्हां तरी मिळणारच. पण प्रयत्न कोणचा करावा आणि कोणचा करूं नये, एवढा मात्र अगोदर पूर्ण विचार करावा लागतो. नाहीं तर उगीच आपला कोणता तरी एखादा उकिरडा घोळीत बसण्याच्या यत्नानें रत्न सांपडत नसतें. किंवा उगीच इकडला डोंगर तिकडे फेकून देण्याच्या यत्नानें आत्यंतिक सुखाची प्राप्ति होणार नाहीं. त्याप्रमाणें सांसारिक विषयाच्या प्राप्तीसंबंधानें वाटेल तितका यत्न केला तरी आत्यंतिक सुख प्राप्त न होतां, उलट दुःखच पदरात पडणार. ह्मणून सच्छास्त्रश्रवणार्थ सत्समागम करण्याविषयींच यत्न करून हा संसारसमुद्र तरून जावा. शुद्ध बुद्धि होण्याकरितां प्रथमतः मन आणि इंद्रियें जिंकल्यावांचून कोणतेंही साधन होणार नाहीं. म्हणून जितेंद्रिय होण्याचा जो प्रयत्न याशच पौरुष प्रयत्न म्हणतात.

“ तज्जयाय यतंते ये न लोभलवलंपटाः ॥
ते दीनाः प्राकृता मूढाः स्थिता दैवपरायणाः ॥ ”

अर्थ—स्त्री-धनादिकाविषयीं लंपट झालेले मूर्ख लोक मन आणि इंद्रियें जिंकण्याचा यत्न न करतां परमार्थ दैवाधीन आहे, सद्गुरु मिळणें दैवाधीन आहे व सच्छास्त्रश्रवणमनन होणें दैवाधीन आहे, असें समजून कोट्यावधि जन्म या संसाररूपी उकिरड्यावर रममाण होतात. त्यामुळें ते प्राकृत लोक सर्व बाजूनें निरंतर अत्यंत दैन्यस्थितींतच राहतात. ह्मणून परमार्थजिज्ञासु लोकांनीं दैववाद्यांची व सांसारिक मनुष्यांची संगति कधींही करूं नये. तो महापंडित जरी असला, आणि जितेंद्रिय नसल्यामुळें अनेक व्यसनांच्या आधीन होऊन संसारासक्त जर असेल, तर तसल्या मनुष्याची संगति, हा

विद्वान् आहे असें समजून, अमानें, कधींही करूं नये.

" विषयाशामहापाशाद्यो विमुक्तो सुदुस्त्यजात् ॥
स एव कल्प्यते मुक्त्यै नान्यच्छट्शास्त्रवेद्यपि ॥ "

(इत्याचार्योक्तिः)

रामा ! सध्यां तूं दैववाद्यांचा पक्ष स्वीकारला आहेस. त्यामुळें तुझें म्हणणें सर्व कांहीं दैवच करतें, प्रयत्न करणें सुद्धां आमच्या स्वाधीन कांहीं नाहीं. यावर तुला मी असें विचारतों कीं, (वा. प्र. २ अ. ८)

दैवमेवेह चेत्कर्तृ पुंसः किमिव चेष्टया ॥
स्नानदानासनोच्चारान् दैवमेव करिष्यति ॥ ६ ॥
किं वा शास्त्रोपदेशेन मूकोऽयं पुरुषः किल ॥
संचार्यते तु दैवेन किं कस्येहोपदिश्यते ॥ ७ ॥

अर्थ—अरे ! सर्वच गोष्टी जर तुझें दैव स्वतः येऊन करण्यास तयार असेल, तर मग आतां मनुष्याला जेवणखाण, स्नान, शौच, बसणें, उठणें, बोलणें, चालणें वगैरे या सर्व क्रिया स्वतः करून तरी काय कर्तव्य आहे ? तुझें दैवच स्वतः येऊन हीं सर्व कामें करील ! मग तूं प्रेतासारखा उगीच पडून कां राहात नाहींस ? व श्वासोच्छ्वास टाकण्याचे तरी एवढे श्रम तूं कां करतोस ? तेंहीं दैवच करीत असेल व तसें असल्यास दैवव्यतिरिक्त तूं कोणी नाहींसच, असें म्हटलें पाहिजे. किंवा असलास तरी शवतुल्य मृतप्राय तूं असला पाहिजेस, असें म्हणण्यास काय हरकत आहे ? अहो ! सर्व कांहीं दैवच करतें, किंवा दैवानुसार होतें, असें म्हटल्यास मग शास्त्रोपदेश सुद्धां निरर्थक ठरणार. आणि वाणीकडून बोलविणारेंही दैवच ठरल्यास हा पुरुष स्वतः मुकाच आहे असें म्हणावें लागेल. मग कोणी कोणाला उपदेश करावयासही नको व बोलावयास नको. कारण सर्व दैवच करणार आहे. वा ! काय अकलेची कमाल आहे ! धन्य तुझें प्रारब्ध आणि तूं !"

नच निस्पंदता लोके दृष्टेह शवतां विना ॥
स्पंदाच फलसंप्राप्तिस्तस्माद्दैवं निरर्थकं ॥ ८ ॥

अर्थ—तेव्हां बाबा रे! निस्पंदता म्हणजे निष्क्रियता ही फक्त शवामध्येंच असते. मनुष्यांनीं स्वतः हालचाल वगैरे क्रिया केल्यावांचून कोणतेंही फल प्राप्त होत नाहीं.

आक्षेप—आणि मी तुला असें विचारतों कीं, दैव हा काय पदार्थ आहे? आणि तें राहातें कोठें? शरीराच्या बाहेर राहतें? कां शरीरांतच राहतें? शरीराच्या बाहेर राहतें म्हणशील तर तें कशावरून ठरविणार? व तें कोणीं पाहिलें आहे? व शरीराच्या आंत आहे म्हणशील तर तें तरी कशावरून ठरणार? व आंत कोठें राहतें हें एकदां सांग पाहूं? या आक्षेपावर दैववादी उत्तर असें देतो कीं, ज्याअर्थी आपणांस पाप करण्याची आणि दुःख भोगण्याची इच्छा नसतांनाही आपणांस प्रेरणा करून बळेंच आपल्याकडून तें कर्म घडवितें आणि दुःख भोगावयास लावितें, त्या अर्थीं दैव हा कांहीं तरी अमूर्त पदार्थ असावा असें अनुमान होतें. यापेक्षां, तें कोठें असतें याचा निर्णय तें अमूर्त असल्यामुळें करतां येणें शक्य नाहीं. पण प्रारब्धाच्या साहाय्यानेंच सर्व गोष्टी घडतात येवढें खरें.

वसिष्ठ उवाच ॥ न चामूर्तेन दैवेन मूर्तस्य सह कर्तृता ॥
पुंसः संदृश्यते काचित् तस्माद्दैवं निरर्थकं ॥ ९ ॥

अर्थ—अरे! हें तुझें म्हणणें अगदीं मूर्खपणाचें आहे. कारण एखाद्या अमूर्त व्यक्तीनें मूर्तिमान मनुष्याला प्रेरणा किंवा साहाय्य केलें आहे असें जगांत कोठें तरी तुला आढळून आलें आहे काय? तेव्हां स्वप्रयत्नाहून दैव हा कांहींतरी निराळा पदार्थ असेल अशी कल्पना करणें व्यर्थ होय. अहो! काय चमत्कार सांगावा! हे सर्व लोक व्यवहारांतील सर्व क्रिया आणि प्रत्येक शुभाशुभ क्रियेचा विचार, संकल्प, प्रेरणा, प्रयत्न वगैरे सर्व आपणच करीत असून मध्येंच दैव शब्द घुसडतात, याचें काय कारण आहे हें समजत नाहीं. अहो! या प्रारब्धवाद्यांची आणि ईश्वरवाद्यांची दैव आणि ईश्वर या भाषेसंबंधीं व्यवहारांत नेहमीं अशी मजा दिसून येते कीं, एक दैवाजीपंत या नांवाचा गृहस्थ होता.

त्याच्यां मुलीचें लग्न व्हावयाचें होतें. ती मुलगी वरचि उपवर झाली. तेव्हां त्याच्या एका मित्रानें त्यास असें विचारलें कीं, कां दैवाजीपंत ! मुलीच्या लग्नाचें कोठें जुळून आलें कीं नाहीं अझून ? यावर दैवाजीपंत ह्मणतात, काय बुवा अझून दैवयोग कांहीं दिसत नाहीं आणि ईश्वराच्याही मनांत जुळवून आणण्याचें अझून दिसत नाहीं. मित्र म्हणतो—मग आतां स्वस्थ बसून उपयोग काय ? आतां तिला नवरा पाहाण्यास मुलीचें दैव जाणार, कां ईश्वर जाणार, कां तुह्मी स्वतः जाणार ? दैवाजीपंत कुंथत ह्मणतात, तो प्रयत्न मलाच केला पाहिजे. व त्याप्रमाणें मी आतां उद्यांच मुहूर्त पाहून वर पाहण्यास जाण्याचा बेत केला आहे; पण याउपर प्रारब्ध हातून काय घडवील तें खरें. यावर मित्र म्हणतो, मग एकदां दैव काय म्हणतें तें पाहून लवकर या कीं ! पुढें मजा अशी झाली कीं, दैवाजीपंत स्वतःचें भाडें वगैरे खर्च करून गेले व वर पाहण्याची सर्व खटपट, जुळवाजुळवी करून परत घरीं आले. घरीं आल्यावर पुन्हा त्यांच्या मित्रानें त्यांस विचारलें कीं, कसें काय बुवा ? कोठें जुळून आलें कीं नाहीं ? दैवाजीपंत ह्मणतात, ईश्वरानें फार उत्तम योग जुळवून आणला. व या कामांत तिच्या नशीबाची अनुकूलता फार चांगली दिसते, व हल्लीं मुलीचे व माझे ग्रह फार चांगले आहेत. त्यामुळें हें झट्कन जुळून आलें. मित्र म्हणतो—या कामांत तुम्हांला कांहींच खटपट करावी लागली नसेल. दैव आणि ईश्वर यांनीं आपला उद्योग सोडून जाण्यायेण्याचा भाडेखर्च तुमच्याजवळ न मागतां, तुह्मांला कांहींएक त्रास न पडूं देतां अशा प्रसंगीं ते तुमच्या उपयोगीं पडले हें तुमचें भाग्यच म्हणावयाचें. दैवाजीपंत म्हणतात—हें तर खरेंच बुवा ! आपल्या माणसाच्यानें काय व्हावयाचें आणि आपल्या तें काय स्वाधीन आहे ! ब्रह्मलिखित असेल तेंच होणार.

मित्र म्हणतो—मग अशाच जर दैवावर भरंवसा ठेवण्याचा तुमचा पक्का निश्चय असेल, तर मग आतां उद्यांपासून मुलीचें लग्न होऊन ती आपल्या घरीं जाईपर्यंत तुम्ही माझ्या घरच्या माडीवर तिसऱ्या मजल्यावर जाऊन खुशाल झोंप घेत पडानात ? लग्नांतली पुढची दगदग कांहीं एक करूं

नका. उगीच एखादे आजारी बिजारी पडाल ! मुलीचें दैव जाणे न तें लग्न जाणे. काय वाटेल तो गोंधळ घालीत.

यावर दैवाजीपंत म्हणतो—मित्रा ! तूं आमची इतका वेळ सारी थट्टाच करतोस असें मला वाटतें. मित्र म्हणतो, हें तुम्हांला आत्तांशीं समजलें वाटतें. इतका वेळ झोंपेतच होतां कीं काय ? वा:, खूप तुमचें दैव पराक्रमी आहे बुवा ! काय सगळा खुळ्यांचा बाजार. कां हो दैवाजीपंत, आतां उद्यांपासून लग्नांतलीं सर्वही कामें तुमचें दैवच कां येऊन करणार आहे ? प्रथम लग्नाचा मांडव घालणें, बोहलें करणें, घरोघर अक्षत भिरवित जाणें, वाजंत्रीं ठरविणें, पोषाख वस्त्रपात्र घेणें, मुलास हुंडा मोजून देणें व स्वैपाकपाणी वगैरे लग्नांतील हजारों कामें, हीं कां तुमचें दैव किंवा ईश्वर कां येऊन स्वत: करणार आहे ? सारखें पदोपदीं दैव, दैव म्हणत सुटलांत, याला म्हणावें तरी काय? वा: ! काय आश्चर्य सांगावें या दैववादी लोकांचें ! सर्व घरचीं दारचीं कामें आपणच स्वत: खटपट करून करतात आणि सर्व दैवानें झालें आणि ईश्वरानें केलें, असें तोंडानें बोलतात ! तेव्हां आतां तुमच्यासारख्या भ्रामिष्ट लोकांपुढें काय बोलावें हें कांहीं समजत नाहीं. थट्टा केल्याचा तुह्मांला खंडीभर राग मात्र येतो, पण डोक्यांत शिरलेलें दैव मात्र अझून निघून जात नाहीं !

शंका—अहो ! दैव स्वत: कोणतीही क्रिया न करो, पण त्याची अनुकूलता व ईश्वराची अनुकूलता असल्यावांचून कोणतेंही काम सिद्धीस कसें जाणार व त्याचें फळ तरी कसें मिळणार, हें मला सांगा ?

उत्तर—यावर आम्ही असें म्हणतों कीं, स्वत: आम्ही आपल्या इंद्रियांकडून कोणतीच क्रिया जर न केली, तर दैव स्वत: येऊन आमचीं घरांतलिं सर्व कामें करील काय ? व प्रयत्नावांचून कर्मांचें फल तरी तें देणार आहे काय ? मग आह्मांला यांत दैवाची अनुकूलता ती कोणची असणार ? जें जें आमच्या मनांत येतें, तें तें कर्म आम्हीच करणार, व त्याप्रमाणें आमच्या हातून योग्य प्रयत्न झाल्यास त्याचें फल योग्य कालीं

आह्मांस सहज प्राप्त होणार. यांत प्रारब्धाच्या अनुकूलतेचा संबंधच काय आहे तो सांग ?

शंका—अहो ! यत्न करणारे तुम्ही खरे, पण यत्न करविणारें दैव आहे ना ? ही त्याची अनुकूलता काय थोडी समजतां ?

यावर आमचें म्हणणें, आपण स्वतः जर कांहींच क्रिया केली नाहीं, किंवा क्रियेचे कर्तेच जर झालों नाहीं, तर मग दैव ती क्रिया कोणाकडून करविणार ? आपण कर्तृत्व पत्करल्यावांचून कोणी कोणावर बलात्कार करणार नाहीं. व तसें शत्रुत्व करण्याचें कांहीं कारणही दिसत नाहीं. मग उगीच मधें दैव शब्द पाहिजे कशाला ?

म्हणून वसिष्ठ म्हणतात—

मनोबुद्धिवदप्येतद्दैवं नेहानुभूयते ॥
आगोपालं कृतप्रज्ञैस्तेन दैवमसत्तदा ॥ ११ ॥
पृथक्चेद् बुद्धिरन्योर्थः सैव चेत्कान्यता तयोः ॥
कल्पनायां प्रमाणं चेत्पौरुषं किन्न कल्प्यते ॥ १२ ॥
नामूर्तेस्तेन संगोऽस्ति नभसेव वपुष्मतः ॥
मूर्तं च दृश्यते लग्नं तस्माद्दैवं न विद्यते ॥ १३ ॥

अर्थ—अमूर्त असणाऱ्या आकाशाचा मूर्तिमान् पदार्थाशीं जसा कोणताही संबंध होत नाहीं, त्याप्रमाणें अमूर्त असणाऱ्या दैवाचा मूर्तिमान् मनुष्याशीं कोणत्या तऱ्हेचा संबंध होणार ? जगांत दोन्ही पदार्थ जेथें साकार असतात तेथेंच परस्परांचा कांहीं तरी संबंध होत असतो.

वसिष्ठ म्हणतात कीं, लहानांपासून तों थोरांपर्यंत सर्व लोकांना स्वतःच्या मन, बुद्धि वगैरे इंद्रियांचा व त्यांच्याकडून घडणाऱ्या क्रियेचा जसा प्रत्यक्ष अनुभव येतो, तसा त्यांत कोठें दैवाचा अनुभव येत नाहीं. त्यामुळें तें मिथ्याच म्हटलें पाहिजे. आतां बुद्धीहून दैव निराळें आहे असेंही कदाचित् तूं ह्मणशील, पण तें बुद्धीहून निराळें असल्याचा तसा

कोणासही अनुभव येत नाहीं. ह्मणून तें मिथ्या म्हणावें लागतें. आतां बुद्धि आणि दैव एकच आहे, असें जर तुझें ह्मणणें असेल, तर मात्र तुझ्या व आमच्या मताचा ऐक्यभाव जुळतो. पण बुद्धीहून दैव निराळें आहे अशी तूं नुसती कल्पना करून, ती कल्पनाच जर प्रमाण मानशील तर मग प्रयत्न सत्य आहे, व तोच मुख्य आहे, अशी कल्पना तरी कां सत्य मानीत नाहींस? दैव आपल्या बुद्धीहून निराळें आहे, असा वृथैव आग्रह धरण्यांत तरी मतलब काय आहे? आतां सर्वच दैव करतें, या ह्मणण्यांतील तुझा अभिप्राय यत्न, दैव आणि जीव या तिन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे, अशा भावनेनें ह्मणजे केवल पर्यायशब्दानें तूं जर दैव-शब्दाचा उच्चार करीत असशील, तर मग तुझा आमचा वादच संपला. जसें जल, उदक, पाणी, इत्यादि एकाच पदार्थाला अनेक नांवांनीं उच्चारिलें तरी त्यांत भिन्नार्थ होत नाहीं. अशा अभिप्रायानें तुझें व आमचें ऐकमत्य आहे. पण तूं प्रयत्नाहून आणि आपल्या स्वरूपाहून प्रारब्धाची जाति पृथक् मानून, त्यांत श्रेष्ठकनिष्ठपणा जर मानीत असशील, तर मात्र तुझा आमचा वाद कधींच संपणार नाहीं. व शेवटीं या द्वैत बाबतींत तुलाच पिछेहाट करावी लागेल हें पूर्ण लक्षांत ठेव.

विनियोक्तृ च भूतानां अस्त्यन्यच्चेज्जगत्त्रये ॥
शेरते भूतवृंदानि दैवं सर्वं करिष्यति ॥ १४ ॥

अर्थ—वशिष्ठ ह्मणतात, या जगत्रयाचे ठिकाणीं सर्व जीवांच्या बुद्धीचें नियमन करणारी अशी दैव ह्मणून जर कांहीं सत्यवस्तु स्वबुद्धीहून निराळी असेल, तर मग सर्व लोकांनीं निर्भय व निश्चिंतपणानें खुशाल घोरत पडण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण दैव सर्व कांहीं करणारच आहे; मग स्वतः प्रयत्नाचा खटाटोप करून व्यर्थ श्रमी होण्यांत तरी अर्थ काय? असें ह्मणण्याची पाळी येईल. पण तसा कोठेंही अनुभव व प्रमाण नाहीं. म्हणून दैववाद अत्यंत मिथ्या आहे. वशिष्ठ म्हणतात, रामा! दैव फलद्रूप होतें कां प्रयत्न फलद्रूप होतो, याविषयीं ज्याला संशय वाटत असेल,

त्यानें याची थोडक्यांत आत्तांच परीक्षा पाहण्याकरितां स्वतःच एकदां अग्नींत उडी टाकून पहावी! तेथें अग्नीनें आपल्या अंगाचा दाह जर न झाला तर मात्र तुपचा दैववाद आह्मी खरा मानूं. पण जर अंगाला चटका बसला तर मात्र आमचा प्रयत्नवाद श्रेष्ठ मानला पाहिजे. हें प्रयत्नाविषयीं प्रत्यक्षच उदाहरण आहे. ह्मणून अग्नीचा दाहक स्वभाव दुसऱ्या मणिमंत्र-औषधी वगैरे उपायेंकरून शांत करण्याचा प्रयत्न केल्यावांचून शांत होणार नाहीं व तसा प्रयत्न न केल्यास केवल दैवयोग मानून तो अग्नींत जर उडी घालील तर शरीर दग्ध झाल्यावांचून राहाणार नाहीं! हें पूर्ण लक्षांत ठेव. आतां यावर तूं कदाचित् ह्मणशील कीं, प्रऱ्हादादि भक्तांचा देह अग्नींत टाकला असूनहीं, त्यांचा देह दैवयोगानें दग्ध कां झाला नाहीं? तेथें त्यांनीं अग्नि शीत होण्याचा प्रयत्न कोठें केला होता? यावर आमचें ह्मणणें—अग्नि शीत होण्याचा त्याचा प्रयत्न त्या वेळेस जरी दृष्ट नाहीं, तरी पूर्वकालांत त्यानें भक्तियोग किंवा हठयोगादि साधनें करून अग्नीच्या दाहक शक्तिस्तंभनाचा प्रयत्न पूर्वींच करून ठेविला होता, ह्मणून त्याचें शरीर दग्ध झालें नाहीं. तो आळसानें मूर्खासारखा दैवावर भरंवसा ठेवून बसला नव्हता. तात्पर्य, प्रयत्नच फलद्रूप होतो, हें सिद्ध झालें.

शंका—अहो!

"दैवं फलति सर्वत्र न विद्या न च पौरुषं"

हें वाक्य दैवच फलद्रूप होतें, असें स्पष्ट सांगत आहे. याची वाट काय? व सर्वांस नेहमीं असाच अनुभव येतो. प्रयत्न करूनहीं फल न मिळालें असतां, शेवटीं दैव ह्मणून हात टेकण्याची पाळी येते, असा सर्वत्र अनुभव आहे. आणि दैवच फलद्रूप होतें, याविषयीं जगांतील दुसरा अनुभव असा कीं, एखाद्या दत्तक दिलेल्या पुत्राला कांहींएक प्रयत्न न करितां एकदम आयतीच पुष्कळ इस्टेट प्राप्त होते. किंवा एखाद्याला आयताच कोठें तरी द्रव्याचा निधि सांपडतो. तर या ठिकाणीं तो कोठें प्रयत्न करावयास जातो? या अनुभवावरून दैवच फलद्रूप होतें, प्रयत्न फलद्रूप होतो हें ह्मणणें व्यर्थ आहे.

उत्तर—अरे! कित्येकांचे प्रयत्न सांप्रत जरी दिसण्यांत आले नाहींत तरी ते पूर्व जन्मांत झालेलेच असतात. त्यामुळें त्यांना या जन्मांत यत्न न करितां एकदम वस्तुलाभ होतो. पूर्वजन्मीं ज्यांचा यत्न तात्काल फल प्राप्त होण्याइतका पूर्ण व योग्य रीतीनें झालेला नसतो, त्यांना या जन्मीं राहिलेल्या यत्नाची पूर्तता करावी लागते. किंवा पूर्वी यत्न मुळींच झालेला नसेल तर या जन्मीं त्यांना अथपासून इतिपर्यंत सर्वच यत्न पूर्ण करावा लागतो, तेव्हां फलप्राप्ति होते. पूर्वीचा यत्न दिसत नाहीं व आत्तांचा यत्न दिसतो, एवढाच फरक. त्यामुळें असें वाटतें कीं, एखाद्याला आयताच गठ्ठा कसा मिळतो ? व आम्हीं इतके यत्न करूनही आम्हांस फल कां मिळत नाहीं ? त्यावरून प्रयत्न व्यर्थ असून प्रारब्धच श्रेष्ठ असावें, असा भ्रम होतो. पण तो व्यर्थ आहे. आतां " दैवं फलति सर्वत्र " या तूं दिलेल्या वचनाचाही हाच अभिप्राय आहे कीं, तेथील दैव शब्दाचा अर्थ, पूर्वजन्मांतील प्रयत्न असाच घ्यावा लागतो. त्या-वांचून गति नाहीं. कारण प्रयत्नावांचून प्रारब्ध सिद्धच होत नाहीं. कोणचा तरी व केव्हां तरी प्रयत्न केल्यानेंच प्रारब्ध बनलें आहे. प्रारब्ध-जाति आपोआप आकाशांतून उत्पन्न झालेली नाहीं. म्हणून वरील श्लोकांतील दैवपदाचा अर्थ पूर्वप्रयत्न असाच आहे. ह्मणून पूर्वशंका व्यर्थ आहे. या-विषयीं 'कर्मतत्व' ग्रंथांत चतुर्थाध्यायांत वामनांचेंही ह्मणणें असें आहे कीं,

पूर्वील यत्न फळदायक या शरीरीं ॥
हे यत्न होतिल पुढें सुखदुःखकारी ॥
या कारणें सकळ टाकुनि लोकधंदा ॥
चित्तीं धरा दृढ मुकुंदपदारविंदा ॥ १ ॥

(अर्थ स्पष्टच आहे.) आणि प्रयत्नच सर्वत्र फलद्रूप होतो, दैव फलद्रूप होत नाहीं, याविषयीं मागें वसिष्ठांनीं अग्नींत उडी टाकून पाहण्याच्या प्रयत्नाविषयीं जसा दृष्टांत दिला, तसाच सुभाषितकार दुसरा दृष्टांत असा सांगतात कीं,

चक्रीसमीपे संविष्टा सुस्थिता पिष्टकारिणी ॥
उद्यमेन विना पिष्टं यदि स्याद्दैवमस्तु ते ॥ १ ॥

अहो दैववाद्यांनो ! तुम्हीं असा विचार पहा कीं, एखादी दळण दळणारी बाई धान्याचें टोपलें घेऊन नुसतीच जात्याजवळ जाऊन स्वस्थ जर बसली, आणि जात्यांत धान्य घालून, जातें फिरविण्याचा तिनें यत्न जर मुळींच केला नाहीं, तर दैवानेंच धान्याचें पीठ आपोआप तयार होईल काय ? तर होणार नाहीं. तसें होत असेल तर मात्र तुमचें दैवच फलद्रूप होतें असें आम्ही ह्मणूं. पण प्रयत्नावांचून कोणचीच गोष्ट सिद्ध होत नाहीं, असा जर पदोपदीं प्रत्यक्ष अनुभव आहे, तर प्रयत्नाखेरीज दैव अन्य आहे हें बोलण्यांत अर्थ काय ? अरे दैववाद्यांनो ! मी तुह्मांला आणखी असें विचारतों कीं, तुमचा सर्व दैवावरच जर भरंवसा आहे, तर मग रात्रीं निजतांना दरवाज्यांना स्मरणपूर्वक, कडी अडसर वगैरे घालून आणि द्रव्याच्या पेट्या व फडताळें वगैरे यांना कड्याकुलपें घालून निजण्याचें काय कारण ? दैवांत असेल तर चोर नेईल, नसेल तर नेणार नाहीं! तसेंच दुखणें आलें असतां द्रव्य खर्चून औषधोपचार वगैरे करण्याचा मनःपूत प्रयत्न कां करितां ? बरें किंवा वाईट हें दैवानें होणारच आहे. तसेंच आपल्या मुलाच्या नशिबांत विद्या यावयाची असेल तर आपोआप येईल, मग शिकण्याचे व शिकविण्याचे यत्न कां करितां ? व सरकारानें शाळा व मास्तरही ठेवण्याचें कारण नव्हतें. तात्पर्य, दैवच सर्व करतें व करवितें, असें नुसतें तोंडानें बोलतां मात्र. पण वर निर्दिष्ट केलेले सर्व प्रयत्न आपणच करतां. यावरून दैवावरही तुमचा एक पूर्ण निश्चय नाहीं, हें सिद्ध होतें. असो—तेव्हां नाममात्र असणाऱ्या दैवाची निराळी एक कल्पना करण्यापेक्षां, दैव शब्दाचे ठिकाणीं प्रयत्न शब्दाचाच प्रयोग करण्यांत विशेष गौरव दिसतो. ह्मणून हा प्रारब्धवाद सोडून द्या. वसिष्ठ ह्मणतात—

मूढैः प्रकल्पितं दैवं तत्परास्ते क्षयं गताः ॥
प्राज्ञास्तु पौरुषार्थेन पदमुत्तमतां गताः ॥ १६ ॥

ये शूरा ये च विक्रांता ये प्राज्ञा ये च पंडिताः ॥
तैस्तैः किमिव लोकेऽस्मिन् वद दैवं प्रतीक्ष्यते ॥ १७ ॥
कालविद्भिर्विनिर्णीता यस्यास्ति चिरजीविता ॥
स चेज्जीवति संच्छिन्नशिरास्तद्दैवमस्तु ते ॥ १८ ॥
कालविद्भिर्विनिर्णीतं पांडित्यं यस्य राघव ॥
अनध्यायितयैवासौ तज्ज्ञश्चेद्दैवमुत्तमं ॥ १९ ॥
विश्वामित्रेण मुनिना दैवमुत्सृज्य दूरतः ॥
पौरुषेणैव संप्राप्तं ब्राह्मण्यं राम नान्यथा ॥ २० ॥
पौरुषेणैव यत्नेन साम्राज्यं दानवेश्वराः ॥
पौरुषेणैव यत्नेन दानवेभ्यः सुरेश्वराः ॥ २३ ॥

अर्थ–रामा ! दैवाला वास्तविक पारमार्थिक सत्ता नसतांना या अविचारी लोकांनीं स्वतःच्या आलस्यदोषामुळें त्याची कल्पना केली आहे व त्या दैवांतच ते गुरफटून वृथैव क्षय पावतात. वास्तविक जे प्राज्ञ पुरुष आहेत, ते योग्य कर्तव्यक्रियेविषयीं कधींही आळस न करितां स्वपौरुषप्रयत्नानेंच उत्तम पदवीला प्राप्त होतात. या जगांत आजपर्यंत जे कोणी शूर, पराक्रमी, बुद्धिमान् व पंडित वगैरे होऊन गेले, ते आपल्या यथायोग्य प्रयत्नानेंच उत्तम पदवीला प्राप्त होऊन जगांत प्रसिद्धीस आले आहेत. त्यांनीं कोणत्याही कामांत दैवाची वाट पाहिली नाहीं. आतां तुझा दैववादही आम्हीं खरा मानला असता, पण एखाद्या उत्तम ज्योतिषानें एखाद्या मनुष्यास शंभर वर्षें आयुष्य आहे, असें जरी कुंडलीवरून बरोबर लिहून ठेवलें असलें, तरीपण त्या शतायु मनुष्याचा आपण आत्तांच जर एकदम शिरच्छेद केला, तर तो मरणार नाहीं काय ? शिरच्छेद करूनही तो जर न मरेल तर मात्र प्रारब्धयोगाला श्रेष्ठत्व द्यावें लागेल. किंवा ज्योतिषानें एखादा मनुष्य पंडित होईल असें निश्चयपूर्वक सांगितलें असतां, त्या मनुष्यानें अध्ययन करण्याचा प्रयत्न न करतां जर तो पंडित होईल, तर मात्र तुझें दैव श्रेष्ठ ह्मणतां येईल. पण प्रयत्नावांचून

कोणतीच क्रिया जर सिद्ध होत नाहीं, तर उगीच सर्व बाबतींत दैव-प्राधान्य मानण्यांत अर्थ काय? अरे! तूं असें पाहा कीं, विश्वामित्र ऋषींनें दैवाला झुगारून स्वतः क्षत्रिय असून पौरुष प्रयत्नानेंच ब्रह्मर्षित्व प्राप्त करून घेतलें. तसेंच देव काय, दानव काय, या सर्वांनीं स्वपौरुषानेंच साम्राज्य प्राप्त करून घेतलें. दैवाची वाट पाहात ते बसले नाहींत. यावरून सर्वांत पौरुष प्रयत्नच बलवान आहे हें सिद्ध झालें. असो.

यांप्रमाणें प्रयत्नवादानें प्रारब्धवादाचें खंडण झालें.

येथें प्रकरणाचा पूर्वार्ध संपला.



॥ श्री ॥

उत्तरार्ध

प्रारब्धप्रयत्नांतर्गत शंकासमाधाननिरूपण ॥



गुरु म्हणतात—शिष्या ! येथपर्यंत तुला तीन प्रकारच्या मतवाद्यांचा व निरीश्वरवाद्यांचाही अभिप्राय साग्र कथन केला. आतां याविषयीं अन्य ग्रंथकारांचें मत काय आहे, याचेंही पण तुला थोडक्यांत दिग्दर्शन करून सांगतों. लक्षपूर्वक ऐक. यासंबंधानें निश्चलदासकृत विचारसागर ग्रंथाच्या दुसऱ्या तरंगामध्यें अशी प्रक्रिया सांगितली आहे कीं, स्वप्रयत्नरूप कर्मापासून दोन अंकुर उत्पन्न होतात; एक वासना, व दुसरें सुखदुःख देणारें अदृष्ट. पूर्वीच्या शुभकर्मापासून शुभवासना व धर्मबुद्धीचा अंकुर उत्पन्न होतो. आणि अशुभ कर्मापासून अशुभ वासना व अधर्मबुद्धि उत्पन्न होते. शुभ वासनेपासून शुभ कर्माचे ठायीं प्रवृत्ति, आणि त्या शुभ-क्रियेपासून सुखोत्पत्ति होते. याचप्रमाणें अशुभ वासनेपासून अशुभ कर्माचे ठायीं प्रवृत्ति व त्या अधर्माचरणामुळें दुःखोत्पत्ति होते. एवंच, कर्मबीजा-पासून वासना आणि अदृष्ट, असे दोन अंकुर उत्पन्न होतात. त्यामध्यें फक्त वासनांकुराचाच ऐहिक प्रयत्नानें नाश होतो व अदृष्टांकुराचा भोगानें नाश होतो. म्हणून भोगाविषयीं व तत्साधनभूत प्रयत्नाविषयीं पूर्वादृष्टच म्हणजे पूर्व यत्नसंस्कारच श्रेष्ठ आहेत. आतां शास्त्रामध्यें जेवढा म्हणून पुरुषप्रयत्न सांगितला आहे, त्यापासून जन्मादि प्रवृत्तीस हेतुभूत ज्या वासना, त्यांचाच फक्त नाश होतो. अत्यंत प्रबल जे दुःखादि भोग, त्यांचा नाश होत नाहीं. पूर्वीचे जे सर्व प्रकारचे अप्रबल संस्कार असतात, ते या जन्मांतील प्रबल श्रवणमननादि संस्कारानें नाहींसे होतात व पूर्वीचे जे प्रबल संस्कार ते भोगानेंच नाहींसे होतात. तेथें ज्ञानाचें किंवा अप्रबल यत्नाचें कांहींएक चालत नाहीं. म्हणून “ अवश्यंभावि भावानां प्रतिकारो० ” इत्यादि

श्लोक पूर्वीं दिले आहेत त्यांचा भावार्थ असाः—प्रबळ पूर्वकर्मांचा म्हणजे अदृष्टाचा आधुनिक क्षुद्र प्रयत्नानें नाश होत नाहीं. तर भोगानेंच त्याचा नाश होतो, हा इत्यर्थ होय. एवंच अशा युक्तीनें प्रारब्धही श्रेष्ठ आहे व वासनानिवृत्ति करण्याचे कामांत श्रवणादि प्रयत्नही श्रेष्ठ आहे. म्हणून उभय वाक्यांत विरोध येत नाहीं. असा गूढ शास्त्रसिद्धांत आहे. (याप्रमाणें ' विचारसागर ' नामक ग्रंथकाराचें मत आहे.)

आतां मोक्ष दैवाधीन नाहीं, याविषयीं लघुवाक्यवृत्तीवर टीका करणारे जे हंसराज स्वामी, त्यांनीं आपल्या वाक्यवृत्तिनामक ग्रंथांत हाच अभिप्राय कथिला आहे. त्यांतील ओव्या प्रमाणार्थ किंचित् पुढें दिल्या आहेत. (पान ९८, ओवी १२ पासून)

हंसराज स्वामींचें मत



उगीच प्रेरणा करावी ॥ कर्मसूत्रें स्फूर्ति द्यावी ॥
हाचि धर्म असे स्वभावीं ॥ नियंतृत्वें ईशाचा ॥ १ ॥
येथें कोणी आशंका करिती ॥ कीं ईश प्रेरिता जीवांप्रती ॥
तरी होणार तें न चुके कल्पांतीं ॥ मग जीवांचा यत्न व्यर्थ २
तरी अवधारा याचें उत्तर ॥ होणार तें न चुके अणुमात्र ॥
परी प्रयत्न करिती जे नर ॥ हाही भोग सुखदुःखाचा ॥ ३ ॥
मग पुरुषप्रयत्न काय राहिला ॥ म्हणशी तरी ऐक यया बोला
प्रवृत्तिरूप भोग जीवाला ॥ ये विषयीं प्रयत्न नको ॥ ४ ॥
होणार तें अन्यथा न घडे ॥ न होणार तें नव्हे कोडें ॥
हा नियमचि आहे प्रवृत्तीकडे ॥ तो करो न करो प्रयत्न ॥ ५ ॥
तस्मात्प्रवृत्तीचा प्रयत्न न करावा ॥ घडणार तें घडेल स्वभावा ॥
परंतु निवृत्तिरूप मोक्षस्वभावा ॥ प्रयत्नेंवीण नव्हेचि ॥ ६ ॥
“ (स्वभावस्तु प्रवर्तते ॥ प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमा०) ”
प्रारब्धाधीन मोक्ष नाहीं ॥ कारण कीं अभोक्ता आत्मा विदेही ॥

तो कळावा विचारें निःसंदेहीं ॥ तेथें सुखदुःख आटती ॥ ७ ॥
सुखदुःख होणें तें प्रारब्धें घडे ॥ कर्महानि प्रारब्धें केवी जोडे ॥
तस्मात् परमार्थप्राप्ति जोडे ॥ श्रवणादि यत्नें ॥ ८ ॥

वासिष्ठेऽपि–" विना यत्नभरेणेदं न सिध्यति कदाचन ॥
महतोऽभ्यासवृक्षस्य फलं विद्धि परं पदं ॥ १ ॥"

असो–येथपर्यंत परमार्थाविषयीं प्रयत्नाची आवश्यकता सांगितली. आतां प्रवृत्तिमार्गांतसुद्धां प्रयत्नाची यथाशक्ति किंचित् आवश्यकता आहे. पण ' यथाशक्ति ' हीं मुद्याचीं अक्षरें पूर्ण लक्षांत ठेवा, विसरूं नका. !

याविषयीं सुभाषितकारांचें ह्मणणें असें—

" उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीर्दैवेन देयमिति कापुरुषा वदंति ॥ दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ॥ १ ॥

अर्थ—व्यवहारांत सुद्धां उद्योगी पुरुषांनाच लक्ष्मी प्राप्त होते. ती दैवानें मिळाली असें मूर्ख लोकांचें ह्मणणें आहे. म्हणून प्रथम प्रत्येक विषयासंबंधानें प्रारब्धाची वाट न पाहतां यथाशक्ति अगोदर प्रयत्न करून पहावा. प्रयत्न सफळ न झाला तर मग दैवयोग समजावा, ह्मणजे आपणाकडे मग त्याचा दोष नाहीं. ' प्रयत्नाअंतीं परमेश्वर ' अशी जी व्यवहारांत ह्मण आहे ती एवढ्याकरितांच आहे.

आतां आणखी या शास्त्रवाक्यविरोधपरिहारासंबंधानें सूक्ष्म विचार असा आहे कीं, शास्त्रकारांनीं प्रत्येक ठिकाणीं विधिवाक्यानें प्रयत्न करावयास जेवढा सांगितला आहे, तो प्रवृत्तिमार्गाविषयीं नाहीं, तर परमार्थ किंवा निवृत्तिमार्गाविषयींच सांगितला आहे. कारण प्रवृत्तिरूप जो संसार यांतील स्त्री, धन, पुत्र, विद्या, यश, मरण वगैरे जे विषय आहेत, हे अत्यंत दुःखरूप असल्यामुळें व ते संपादन करण्याकडे प्राण्यांची नैसर्गिक प्रवृत्ति असल्यामुळें विषतुल्य विषय संपादण्याविषयीं शास्त्रकार अपूर्व अथवा

नियमविधीनें प्रयत्न करण्यास कधींही सांगत नाहींत. ज्याप्रमाणें नदीचा प्रवाह, हा प्रयत्नावांचून नैसर्गिकच अधोमार्गानें जात असतो, प्रवाह खालीं जाण्याविषयीं कोणालाही प्रयत्नाची अपेक्षा नसते, पण तो प्रवाह उच्च मार्गाला चढविण्याविषयीं मात्र अनेक प्रकारचे प्रयत्न करावे लागतात व तद्विषयक विधिही योजावे लागतात, त्याचप्रमाणें ही संसारनदीही विषय-समुद्ररूप अधोगतीला प्रयत्नावांचून जात आहे. याविषयीं प्रयत्न नकोच. जसे जसे ज्याचे पूर्वसंस्कार असतील तसे तसे विषय, तत्संबंधीं सुखदुःखें व प्रयत्न हे होणारच आहेत. म्हणून निवृत्तिमार्गाचा प्रयत्न करण्याविषयीं शास्त्रकारांचा आग्रह आहे. असें पुढील भागवतांतील श्लोकावरून स्पष्ट होत आहे. (भा. ए. अ. ४) " लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तु जंतोर्न हि तत्र चोदना ॥ व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञसुराग्रहैराशु निवृत्तिरिष्टा ॥ १॥ (मनुरपि०) न मांसभक्षणे दोषो न मद्ये न च मैथुने ॥ प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तु महाफला ॥ १ ॥ (मांसादिसेवने दोषः न इति न, अपि तु दोष एव, इति अस्मिन् पद्ये कान्वयर्थः ॥ शेषं स्पष्टं) *

आतां—संसारनिवृत्ति किंवा सर्व कर्मांची निवृत्ति, पौरुष प्रयत्ना-खेरिज प्रारब्धानेंच कां होत नाहीं म्हणाल, तर याचें कारण प्रारब्धकर्म हें अविद्याजन्य असल्यामुळें, अविद्याजन्य कर्मानेंच अविद्याजन्य सर्व कर्मांची निवृत्ति संभवणार नाहीं. जसें, अंधारानेंच अंधाराची निवृत्ति संभवत नाहीं, तर तन्निवृत्तीला तद्विरोधी प्रकाशाचीच अपेक्षा लागते. त्याप्रमाणें अज्ञानविरोधी अशा आत्मानात्मविचाररूप प्रयत्नानेंच सर्व कर्मांची निवृत्ति संभवते. " ज्ञानाग्निः सर्व कर्माणि भस्मसात्क्रियतेऽर्जुन " इति ॥

म्हणून सांसारिक विषयप्राप्तीविषयीं प्रयत्न करण्याची वासना न ठेवतां ज्ञानप्राप्त्यर्थ श्रवणमननादि साधनांविषयीं प्रयत्न करण्याचीच दृढ-

---

* आम्ही या श्लोकाचें व्याख्यान साम्र पाध्यायांच्या टीकेसह अन्यत्र स्वतंत्र प्रकरणरूपानें केलें आहे, तें पहावें. कारण या ठिकाणीं किंचित् विषयांतर झाल्यासारखें दिसतें, म्हणून दिलें नाहीं.

वासना करणें व तद्विषयक यथाशक्ति प्रत्यक्ष प्रयत्न सुरू ठेवणें याळाच पौरुष प्रयत्न म्हणतात. धर्म, अर्थ व काम हे मुख्य पुरुषार्थच नव्हेत. हे अदृष्टानुसार ईशसंकल्पनियतीनें ठरलेलेच आहेत. हे विषय प्रयत्नानें संपादन करण्याविषयीं मुख्यत्वें शास्त्राज्ञाही नाहीं, व हे नश्वर पुरुषार्थ संपादन करण्याच्या प्रयत्नाला पौरुष प्रयत्नही ह्मणत नाहींत. विषयवासना विषयाच्या मिथ्यात्वज्ञानानें निवृत्त करण्याविषयीं जीव स्वतंत्र आहे, ह्मणून वासनानिवृत्तीलाच पौरुष प्रयत्न ह्मणतात हें सिद्ध झालें.

म्हणून कोणत्याही शास्त्रवाक्याशीं या सांगितलेल्या युक्तीनें परस्परविरोध येत नाहीं. आतां विषयांच्या मिथ्यात्वनिश्चयानें सर्व वासनेची निवृत्ति करणें, याळाच पौरुष प्रयत्न म्हणण्याचें कारण काम, क्रोध, लोभ, मोह वगैरे यांची वासनाच जन्माला कारण आहे. पूर्व प्रबल संस्कारेंकरून ज्ञान्यांचे ठिकाणींसुद्धां देहपातापर्यंत हे कामादि विकार राहूं शकतात; प्रयत्नेंकरूनही यांची निःशेष निवृत्ति जरी कित्येकांचे ठिकाणीं संभवत नाहीं, तथापि विचारानें किंचित् निवृत्ति संभवते, ह्मणून बाधितानुवृत्तीनें आभासरूपानें तत्ववेत्त्याचे ठिकाणीं हे विकार जरी अवशेष राहिले, तरी ते पुनर्जन्मास कारण होत नाहींत. कामादि विकार यांची वासनाच पुनर्जन्मास कारण होते. याविषयीं भागवत–एकादशस्कंधांत—

आदेहांता क्वचित् ख्यातिः ततः संपद्यते मया ॥

अशी भगवदुक्ति प्रमाण आहे. याचा अर्थ–ज्ञान्याचे ठिकाणीं सुद्धां हे कामलोभादि विकार, आभास रूपानें क्वचित् देहपातपर्यंतही राहूं शकतात. ते प्रबळ संस्कार असल्यामुळें कितीही प्रयत्न केला तरी कांहीं अंशानें तो निष्फळ होतो. पण तद्विषयक वासना मात्र पूर्वींच नष्ट झाली असल्यामुळें देहपातानंतर हे विकार आपोआपच नष्ट होऊन तो मुक्त होतो. म्हणून वासनात्यागाविषयींच पुरुषप्रयत्न सफल होय. व हाच पुरुषार्थ होय. याविषयीं विद्यारण्य म्हणतात—

पौरुषेण प्रयत्नेन बलात्संत्यज्य वासनां ॥
स्थितिं बध्नासि चेत्तर्हि पदमासादयस्यलं ॥ १ ॥

(विवेकचूडामणिः)

तस्मात्सर्वप्रयत्नेन भवबंधविमुक्तये ॥
स्वैरेव यत्नः कर्तव्यो रोगादाविव पंडितैः ॥
निजं प्रयत्नमाश्रित्य जयेदादौ स्वकं मनः ॥
दैवैकपरतां त्यक्त्वा बालबोधोपकल्पितां ॥ १ ॥

प्राक्तनं वासनासूलं पुरुषार्थेन जीयते ॥
यत्नेनाद्यतनेनाशु ह्यस्तनायतनं यथा ॥ ३१ ॥
(वा. प्र. ६ पूर्वा. अ. ५५ श्लो. ३१)

आतां या देहांत केलेल्या शुभाशुभात्मक कर्मांचें फळ अन्य देहांत मिळतें असा सामान्यतः जरी शास्त्रसिद्धांत आहे, तथापि त्याला किंचित् विरोधी विशेष सिद्धांतनियम असा आहे कीं,

" अत्युत्कटैः पुण्यपापैरिहैव फलमश्नुते ॥
त्रिभिर्मासैस्त्रिभिः पक्षैः त्रिभिरब्दैस्त्रिभिर्दिनैः ॥ १ ॥

अर्थ—या जन्मांत अति प्रबल जर पुण्य किंवा पाप मनुष्यानें केलें असेल तर त्याचें फल याच जन्मांत त्याला भोगावें लागतें. मात्र तारतम्यानें ज्या किंमतीचें त्याचें पापपुण्य असेल त्या मानानें तीन वर्षांत किंवा तीन महिन्यांत, तीन पक्षांत किंवा तीन दिवसांतच त्याला तें फल मिळतें. पुढील जन्मापर्यंत त्याचें तें प्रबल पापपुण्य शिल्लक राहत नाहीं. यास दृष्टांत— एखाद्याचे हातून जर खून झाला, व तो खून किंवा चोरी वगैरे पचविण्या-इतकी, त्या मनुष्यांत पुण्याई नसेल, तर त्यास फाशीची शिक्षा येथेंच भोगावी लागते. इत्यादि दृष्टांत जगांत पुष्कळ आढळण्यांत येतात. म्हणून कित्येक प्रबळ यत्न, याच देहांत फलद्रूप होतात. व कित्येक या देहांतील यत्न, येथें फलद्रूप न होतां, अन्यजन्मीं फलद्रूप होतात. तात्पर्य, यत्न हा

कधींही फुकट जात नाहीं, हें तत्व लक्षांत ठेवावें. आतां दुसरें असें कीं, आपल्या दैवांत अमुक गोष्ट आहे किंवा नाहीं, हें कळण्याला तरी यत्न करून पाहिल्याशिवाय काय कळणार? आपल्या घरांत पूर्वजांनीं एखादा द्रव्याचा हंडा पुरून ठेवला आहे, असें जरी आपणांस श्रुत असलें, तरी पण तो हंडा तेथें आहे किंवा नाहीं, हें खणून पाहाण्याचे परिश्रम केल्यावांचून, तो जसा हस्तगत होणें, किंवा तेथें नाहीं असा निश्चय होणें शक्य नाहीं, त्याप्रमाणें विद्या, धन, पुत्र, यश, वगैरे संसारांतील सर्व विषय, किंवा परमार्थप्राप्ति कां होईना, यांची प्राप्ति आपल्या दैवांत आहे किंवा नाहीं, याविषयीं तरी शास्त्रोक्त मार्गानें तत्तत्प्राप्तीचे उपाय करून पाहिल्यानंतर जर ते न प्राप्त होतील, तर मग मनुष्याकडे त्याचा दोष नाहीं. ह्मणून "यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः" असें ह्मटलें आहे. कित्येक अदृष्ट कर्में स्वतः पंगू असतात. तीं कर्में फलद्रूप होण्याकरितां किंचित् यत्नाची अथवा पुष्कळ यत्नाची वाटच पहात असतात. तितका यत्न जर कर्त्याकडून न झाला, तर त्याच्या दैवांत असून तें फल नष्ट होतें. व कित्येक सुखदुःखादि पूर्व कर्में अगदीं फलोन्मुख परिपक्व अशीं झालेलीं असतात कीं, त्यांना प्रयत्नाचा टेका यत्किंचितूही लागत नाहीं. प्रयत्नावांचूनच त्यांचा फलभोग आपोआपच मिळतो. कारण तितके पूर्ण यत्न पूर्वींच त्यांचे झालेले असतात. यास दृष्टांत असा कीं, झाडावरच फल पक्व झालें असेल तर तें आपोआपच खालीं गळून लागलेंच खाण्यास योग्य होतें. व फल पक्व झालें नसेल तर त्यास साधनेंकरून पक्व करण्याचे परिश्रम करून नंतर त्याचा उपयोग कालानें होतो. तद्वत् या देहांत कांहीं दुःखरूप पूर्व कर्में इतकीं पक्व झालेलीं असतात कीं, एखादा जन्माला आल्यावरोबरच एकदम त्याचा कांहीं तरी इंद्रियआघात होतो. किंवा अग्निदाह, सर्प-वृश्चिकदंश, किंवा अनेक रोगादि आघात, हे हल्लींच्या प्रयत्नावांचून पूर्व कर्मानेंच होतात. त्याप्रमाणें सुखरूप विषयही पुष्कळ वेळा प्रयत्नावांचून प्राप्त झाल्याचा अनुभव येतो. याचें कारण पूर्वींच तत्संबंधी योग्य प्रयत्न पक्व होऊन गेला आहे.

यामुळें मूर्खांना असें वाटतें कीं, दैव म्हणून कोणी एक आयतेंच फळ आपणांस देणारा गृहस्थ गुप्तरूपानें आहे कीं काय? प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, अशी गैरसमज झाल्यामुळें ज्या काळीं ज्या गोष्टीचा योग्य शास्त्रोक्त प्रयत्न करावयास पाहिजे तो न होतां खाऊनापिऊन, पुढील मोक्षविषयक किंवा पारलौकिक चिंता न करतां, जे कोणी व्यर्थ आळसानें पशुतुल्य आपलें आयुःक्षपणमात्र करितात, ते नर वृक्षपाषाणादि जन्मास जातात.

प्रकरणतात्पर्य आणि

व्यावहारिक सिद्धांतविचार.



शंका–शिष्य ह्मणतो–गुरुमहाराज! हा वेळपर्यंत मीं आपल्या मुखांतून प्रारब्धादि विषयासंबंधानें सर्व प्रकारचीं मतें श्रवण केलीं. या श्रवणेंकरून, माझें मन सर्व प्रकारें घोटाळून गेलें आहे. याविषयीं एक निश्चय कोणता करावा, हें मला अझून चांगलें कळलें नाहीं. कारण प्रत्येक वाद्याचें मत, सप्रमाण व सयुक्तिक असल्यामुळें त्या त्या वेळीं तेंच मत खरें असावें, असें मला वाटत गेलें. पण अखेर प्रयत्नवाद ऐकिल्यानें, प्रयत्नवादच सर्व वादांत श्रेष्ठ आहे असें वाटत आहे. पण या मतावरही पूर्वीप्रमाणेंच आणखी कांहीं कोटिक्रम निघाला असतां, याचेंही खंडण होईल कीं काय? असें मनांत येऊन अझून एक निश्चय चांगला होत नसल्यामुळें, हें खरें कां तें खरें, अशा तऱ्हेनें आंतून मन अगदीं गोंधळून गेलें आहे. आणि

बहू शास्त्र धुंडाळितां वाद आहे, बरा निश्चयो एक तोही न साहे ॥
मती भांडती शास्त्रबोधें विरोधें, गती खुंटती ज्ञानबोधें विरुद्धें १५९

या समर्थांच्या श्लोकांची मला आठवण होते. तेव्हां यासंबंधानें व्यावहारिक आणि पारमार्थिक एक निश्चित सिद्धांतविचार काय असेल

तो पुन्हा एकदां कृपा करून सप्रमाण सांगावा, अशी आपणांस माझी नम्र विनंति आहे.

गुरुः–शिष्या ! पूर्वीं झालेल्या सर्व प्रकाराचें तात्पर्य तुला थोडक्यांत सांगतों, नीट लक्षपूर्वक ऐक. चित्त असें गोंधळूं देऊं नकोस. विनापारमार्थिक सिद्धांताचा विचार श्रवण केल्यावांचून खरें समाधान नाहीं, हें आम्ही पूर्वींच तुला सांगितलें, हें तूं विसरलास म्हणून घोटाळ्यांत पडलास. अरे ! व्यावहारिक सिद्धांत व्यवहारदशेपुरताच खरा असतो. आत्यंतिक समाधान त्यांत नाहीं. तथापि साधकअवस्था आणि मुमुक्षुअवस्था जेथपर्यंत आहे, तेथपर्यंत सर्वांना व्यावहारिक सिद्धांत समजून घेण्याची अवश्य जरूरी आहे. त्यावांचून शास्त्राच्या निरनिराळ्या विरोधी वाक्यांची व्यवस्था लक्षांत येणें शक्य नाहीं. म्हणून व्यावहारिकदृष्टया तुला अगोदर मागील सर्व प्रकरणांतील विषयांचें तात्पर्य सांगतों. मग प्रकरणोपसंहारांत याचा पारमार्थिक विचार करूं.

शिष्या ! यावद्देहात्मबुद्धि आहे, तेथपर्यंत परमार्थप्राप्तीच्या साधनांविषयीं प्रयत्नवादालाच प्राधान्यत्व शास्त्रकारांनीं सांगितलें आहे. मोक्षविषयक प्रयत्नाविषयीं मनुष्यांना स्वातंत्र्य जर नसतें, तर त्यांना संसारप्रवाहांतून सुटण्याची कधींच आशा करावयास नको असें होईल ! म्हणून प्रयत्नवादानें बाकीच्या सर्व वादांचें खंडण करून वासिष्ठमतें व्यावहारिक दृष्टया प्रयत्नवादालाच श्रेष्ठत्व कथन केलें आहे. व या हेतूनेंच हा प्रयत्नवाद आम्हीं या प्रकरणांत शेवटीं घेतला आहे. जीवाचे ठिकाणीं देहाभिनिवेशानें कर्तृत्वबुद्धि आहे, तेथपर्यंत प्रारब्धादि वादापेक्षां प्रयत्नवादालाच विशेष महत्व आहे. हा या सर्व प्रकरणाचा तात्पर्यसिद्धांत होय, हें पूर्ण लक्षांत ठेव. यावर व्यावहारिक दृष्टया बाकीच्या कोणत्याही वादाचा कोटिक्रम निघणें शक्य नाहीं. व मूर्खपणानें निघाल्यास, तो, उत्तम बुद्धिवान पुरुषांकडून, प्रमाणेंकरून, सहज खंडित केला जाईल. म्हणून या बाबतींत तुझें मन डळमळूं न देतां हाच सिद्धांत खरा आहे असा

निश्चय कर. प्रत्येक वाद्याचें मत श्रवण करते वेळीं तेंच मत योग्य व श्रेष्ठ आहे, असें जें वाटतें, तेंही तुझें ह्मणणें बरोबर आहे. कारण प्रत्येक वादाला स्वस्वाविषयांत प्राधान्यता आहेच. ह्मणून तसें वाटणें साहजिक आहे. आम्ही वरती प्रयत्नवादाला श्रेष्ठत्व सांगितलें. यावरून दैव आणि ईश्वर या वादांना कनिष्ठत्व समजून, ते त्याज्य आहेत असें मात्र तू समजूं नकोस. कारण ईश्वर, दैव, आणि यत्न, या तिघांचें स्वरूप एकच आहे. यांत तिळमात्र भेद नाहीं. फक्त कालभेदामुळें दैव आणि यत्न, यांत सजातीय–विजातीय भेद नसून स्वगतभेद मात्र मानला जातो, हें पुढें दिलेल्या दृष्टांतावरून लक्षांत आण:—जेथें दोन झाडांची जाति निराळी असते, तेथें विजातीय वृक्षभेद असें म्हणतात. जसें, आम्रवृक्ष आणि बाभळ या दोन झाडांत विजातीय भेद मानला जातो. आणि एकाच जातीचीं अनेक आंब्यांचीं झाडें असणें, या ठिकाणीं परस्पर आम्रवृक्षांतील भेदास ‘सजातीय भेद’ असें म्हणतात. आतां ‘स्वगत भेद’ म्हणजे असें कीं, एकाच आम्रवृक्षांतील निरनिराळ्या शाखापल्लवादि भेदांस ‘स्वगत भेद’ असें ह्मणतात. ज्याप्रमाणें आम्रवृक्ष आणि त्याच्या शाखा-पानें वगैरे त्या वृक्षाहून भिन्न पदार्थ नसतात, त्याप्रमाणें प्रारब्ध, प्रयत्न, जीव, ईश वगैरे मिळून चित्स्पंदात्मक स्वरूप एकच, पण भिन्न भिन्न व्यवहारार्थ, यांत स्वगत भेद मानला जातो. म्हणून तिघेही आपआपल्या विषयांत श्रेष्ठच ह्मटले जातात. वास्तविक हे चित्स्पंदरूपानें एकरूप असल्यामुळें कोणी श्रेष्ठही नाहीं, व कोणी कनिष्ठही नाहीं. आतां या तिघांची एकरूपता किंवा अभेद कसा ? याविषयीं वशिष्ठमुनि सांगतात—

“ संवित्स्पंदस्मस्यैव दैवकर्मनरादयः ॥
पर्यायशब्दा न पुनः पृथक्कर्मादयः स्थिताः ॥ १० ॥

कर्मैव पुरुषो राम पुरुषस्त्वैव कर्मता ॥
एते ह्यभिन्ने विद्धि त्वं यथा तुहिनशीतते ॥ ८ ॥

मनागपि न भेदोऽस्ति संवित्स्पंदमयात्मनोः ॥

बीजांकुरविकल्पानां क्रियापुरुषकर्मणां ॥
ऊर्मिवीचितरंगाणां नास्ति भेदो न वस्तुनि ॥ २१ ॥

बीजं संवित्स्पंद एव तस्य बीजं न विद्यते ॥
(वा. प्र. ६ उत्त. अ. २९ पान ११२०)

याचा भावार्थ असा कीं, आत्मवस्तूचे ठिकाणीं मायामय उत्पन्न झालेला असा जो चैतन्यशक्तीचा स्पंद, (ह्म. स्फूर्ति) या चित्स्पंदालाच दैव, प्रयत्न, जीव, ईश्वर, अहंकार, मन, प्रकृति, संचित, क्रियमाण, प्रारब्ध, कर्म, अकर्म, विकर्म वगैरे कार्यानुरूप अनेक प्रकारचीं नांवें दिलीं जातात. यांचे पर्यायशब्द मात्र निराळे, पण स्पंदात्मक स्वरूप एकच आहे.

ज्याप्रमाणें बीजांकुर विकल्पामध्यें सजातीय—विजातीय भेद नाहीं, किंवा जल, तरंग, लाट वगैरे यांच्या स्वरूपांत जलत्वानें जसा भेद नाहीं, फक्त यांचे पर्याय शब्दमात्र निराळे आहेत, त्याप्रमाणें प्रारब्ध, प्रयत्न व पुरुष म्हणजे जीव, ईश्वर यांच्या स्पंदात्मक स्वरूपांत भेद नाहीं. हे सदैव अभिन्नरूपानेंच आहेत. अरे ! कर्म म्हणजेच पुरुष, व पुरुष म्हणजेच कर्म व प्रयत्न, आणि प्रयत्न ह्मणजेच प्रारब्धकर्म व तेंच क्रियमाण, व तेंच संचित वगैरे सर्व स्पंदरूप आहे. तात्पर्य, मिथ्या-कल्पनामय असा जो हा एक चित्स्पंद, त्याचींच हीं सगळीं अनेक नामें होत. तूं असें पहा कीं, अग्नीहून उष्णता, जलाहून तरंग, तसेंच बीजापासून अंकुर हे जसे निराळे करून दाखवितां येणार नाहींत, त्याप्रमाणें जीवाहून प्रयत्न व प्रयत्नाहून प्रारब्ध निराळें करून दाखवितां येणार नाहीं. तसेंच प्रारब्ध, प्रयत्न आणि जीव यांहून ईश्वराचेंही स्वरूप निराळें करून दाख-वितां येणार नाहीं. अर्थात् वसिष्ठ म्हणतात—या सर्वांचें मिळून स्वरूप एकच जर आहे, तर यांत अमुक कनिष्ठ आणि अमुक वरिष्ठ हें कसें सिद्ध करून देतां येणार ? ज्याप्रमाणें आपल्या शरीराचे अवयव आपणांस शरीराहून निरनिराळे करून दाखवितां येणार नाहींत, कारण अवयव आणि अवयवी मिळून आपलें स्वरूप एकच आहे. तसें या चित्स्पंदाचें आणि

त्याच्या प्रारब्धादि सर्व अवयवांचें मिळून स्वरूप एकच आहे. यांत भेद मानतां येत नाहीं व अवयवाच्या दृष्टांतामध्यें अमुक अवयव श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ असेंही ठरवितां येणार नाहीं. कारण शरिराचा चक्षुरादि प्रत्येक अवयव स्वस्वविषयांत श्रेष्ठच म्हटला जातो. जसें रूपावलोकन करण्याच्या कामांत नेत्रांना श्रेष्ठत्व आहे. चालण्याच्या कामांत पायांना श्रेष्ठत्व आहे. रसग्रहणाच्या व बोलण्याच्या कामांत जिव्हेला श्रेष्ठत्व द्यावें लागतें. याप्रमाणें प्रत्येक इंद्रियांना स्वस्वविषयांत श्रेष्ठत्व आहे व अन्य विषयांत कनिष्ठत्व आहे. याप्रमाणें दैव, ईश्वर आणि प्रयत्न यांना स्वस्वविषयांत परस्परांच्या मदतीनें प्राधान्यता आहे. यांतील रहस्य, या तिघांची स्वरूपऐक्यता असल्यामुळें प्रत्येकांना स्वस्वविषयांत निरपेक्ष स्वातंत्र्य नाहीं, तर सापेक्ष स्वातंत्र्य आहे, एवढें रहस्य अवश्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे. असो. तेव्हां अवयवाच्या दृष्टांतामध्यें जसे कोणी श्रेष्ठ व कनिष्ठ ह्मणतां येत नाहींत, असें जरी आहे तथापि " सर्वेषु गात्रेषु शिरः प्रधानं " या न्यायानें ह्मणजे सर्व गात्रांत शिरोभाग ज्ञानेंद्रियप्रधान असल्यामुळें शिरोभागालाच श्रेष्ठत्व दिलें आहे. बाकीचीं इंद्रियें जड असल्यामुळें त्यांना विशेष प्राधान्यता नाहीं. त्याप्रमाणें या वरील न्यायानें संचित, प्रारब्ध, व क्रियमाण कर्मे बनविणारा कारागीर हा जीव असल्यामुळें याच्या कर्तृत्वानें होणाऱ्या प्रयत्नाला व याला सर्व वादांत श्रेष्ठत्व दिलें जातें. ह्मणून पूर्वी आह्मी प्रयत्नवादालाच जें श्रेष्ठत्व प्रतिपादन केलें आहे, तें याच दृष्टीनें केलें आहे. ह्मणून व्यावहारिक भेददृष्टया प्रयत्नवादच सर्वांत श्रेष्ठ आहे. याचा तूं नीट बारीक विचार करून पहा.

ईश्वर, जीव आणि प्रारब्ध,
यांच्या स्वातंत्र्यतेचे विषय.



शंका—शिष्य ह्मणतो— गुरुमहाराज! जीव, ईश्वर, आणि प्रारब्ध, यांना कोणकोणत्या विषयांत स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य आहे व कोणत्या

विषयांत यांना सापेक्ष प्राधान्यता आहे, हा विषय मला पुन्हां एकदा कृपा करून नीट चांगल्या तऱ्हेनें स्पष्ट करून सांग.

उत्तर—गुरु ह्मणतात या विषयाचा अगदीं निश्चित सिद्धांत पुन्हां तुला सांगतों, नीट लक्षपूर्वक ऐक.

ईशस्वातंत्र्यता, आणि प्राधान्यता

सर्व जीवांच्या हातून घडणाऱ्या सर्व प्रकारच्या क्रियेला व प्रारब्ध-भोगांना, सत्ता, स्फूर्ति, आणि ज्ञानप्रकाश, अबुद्धिपूर्वक स्वभावतःच करणें, फक्त एवढ्याच विषयांत ईश्वरास स्वातंत्र्य व प्राधान्यता आहे. अन्य विषयांत नाहीं. उष्णता आणि प्रकाश करणें, हा जसा दीपाचा सहज स्वभावधर्मच, तसा सत्ता, स्फूर्ति आणि ज्ञानप्रकाश करणें, हा ईश्वराचा सहज स्वभावधर्म आहे. यांत ईश्वरास हेतुपूर्वक नवीन क्रिया कांहीं एक करावी लागत नाहीं. आंता ईश्वराचे ठायीं फलदातृत्वाचें वगैरे स्वातंत्र्य जें सांगितलें आहे, तें जीवाच्या प्रारब्धकर्मानुसार असल्या-मुळें, अमक्यास अमुकच फल द्यावें, हें ईश्वराच्या स्वातंत्र्यांत नाहीं. फक्त ईशसान्निध्यानें किंवा सान्निध्यामुळें, प्रत्येकास स्वस्वकर्मानुसार सुख-दुःखादि फल आपोआप सहजच प्राप्त होतें. ईश्वर तें आपल्या पदरचें देतो असें नाहीं. म्हणून जीवांकडून कर्मकारयितृत्व आणि फलदातृत्व याविषयीं निरपेक्ष स्वातंत्र्य ईश्वरांत नाहीं. फक्त सापेक्ष स्वातंत्र्य आहे. आणि ईश्वरास सत्ता, स्फूर्ति आणि प्रकाश करण्यामध्यें मात्र दुसऱ्या कोणाचीही अपेक्षा लागत नसल्यामुळें निरपेक्ष स्वतंत्रता ईश्वराचे ठिकाणीं आहे. हा एक विषय झाला. आतां दुसरा—

प्रारब्धस्वातंत्र्यता व प्राधान्यता.

सर्व जीवांना त्या त्या ठराविक काळांत सुखःदुखाचा भोग निश्चित-पणानें देणें आणि त्या भोग्य विषयाच्या प्राप्तीकरितां, अवश्य लागणारा प्रयत्न जीवाकडून घडून आणणें, फक्त एवढ्याच बाबतींत प्रारब्धास सापेक्ष स्वातंत्र्यता आणि प्राधान्यता आहे. अन्य विषयांत प्राधान्यता व

स्वातंत्र्यता नाहीं, हा निश्चित सिद्धांत जाणावा.

आतां यांत रहस्य इतकेंच आहे कीं, पूर्वी ईश्वराच्या सत्ता, स्फूर्ति व ज्ञान, या स्वभावधर्मांत जशी निरपेक्ष स्वतंत्रता सांगितली, तशी प्रारब्ध हें स्वतः जड असल्यामुळें त्याला वर निर्दिष्ट केलेल्या ईशधर्माची सहायता किंवा अनुमोदन घेतल्यावांचून जीवांना सुखदुःखभोग वगैरे देण्याविषयीं स्वतंत्रता नाहीं. ईशसाहाय्यानेंच तें आपली कामगिरी बजावण्यास समर्थ असल्यामुळें सापेक्ष स्वातंत्र्यता प्रारब्धांत आहे. निरपेक्ष स्वातंत्र्यता नाहीं. (ईश्वरापेक्षा प्रारब्धांत येवढी न्यूनता आहे.) म्हणून प्रारब्धापेक्षां फलदातृत्वाच्या कामांत ईश्वरास विशेष वैशिष्ट्य दिलें जातें.

आतां यांत दुसरें रहस्य असें कीं, जीवांना कोणत्याही विषयाची इच्छा होणें किंवा न होणें, हें प्रारब्धाच्या आधीन आहे. कारण " इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः " इत्यादि हे, या शरीररूप क्षेत्राचेच धर्म भगवंतांनीं सांगितले आहेत. म्हणून प्रारब्धदोषानें शुभाशुभ इच्छा होणें संभवनीय आहे. पण शुभाशुभ वासना उत्पन्न होणें हा विषय मात्र प्रारब्धाच्या हद्दींतला नाहीं. तर जीवाच्या मूर्खपणामुळें किंवा आपल्या स्वरूपाचें ज्ञान नसल्यामुळें, आणि विषयाचें मिथ्यात्वज्ञान नसल्यामुळें, वासना उत्पन्न होतात. प्रारब्धामुळें त्या होत नाहींत. हें रहस्य अवश्य लक्षांत ठेव. परमार्थसाधनाविषयीं वासना मनुष्यास होऊंच नये, विषयसेवनाचीच निरंतर वासना व्हावी, असा कांहीं प्रारब्धाचा आपणावर बलात्कार नाहीं. बलात्कार फक्त पूर्व कर्मानुसार ज्याचें ज्या योग्यतेचें शरीर असेल, तदनुसार विषयाची इच्छा उत्पन्न करणें, प्रयत्न घडवून आणणें व फळभोग देणें, एवढ्याच बाबतींत प्रारब्धाचा आपणांवर बलात्कार आहे. अर्थात यावरून अशुभ वासनेची निवृत्ति करणें, व शुभ वासनेची वृद्धि करणें एवढेंच जीवांच्या स्वाधीन आहे. एवढें या सर्व प्रकरणाचें रहस्य लक्षांत ठेविलें पाहिजे. असो. आतां विषयाच्या क्रमानेंच आलेल्या जीवांच्या स्वातंत्र्याबद्दल आणखी विचार करूं.

जीवांच्या प्रयत्नस्वातंत्र्यांतील विषय.

मनुष्यांत उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशा त्रिविध अधिकार-भेदानें प्रयत्न करण्याविषयीं त्याच्या स्वाधीन कोणकोणत्या गोष्टी आहेत, हें तुला स्पष्ट करून सांगतों. हा विषय मोठा व्यापक आणि सूक्ष्म असल्यामुळें एकाग्रचित्तानें विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

(१) उत्तम अधिकारी व उत्तम सिद्धांताचें पहिलें कलम:—

गुरुशास्त्रद्वारां धर्माऽधर्माचें ज्ञान संपादन करून असद्वासना किंवा अधर्मवासना नष्ट करणें, आणि सद्वासनेची विशिष्ट ध्यासानें वृद्धि व दृढता करणें, आणि स्वस्वरूप अकर्तृ आहे असें जाणून कोणत्याही क्रियेच्या कर्तृत्वाचा अभिमान सोडणें, अथवा धरणें; फक्त एवढ्याच गोष्टींविषयीं मनुष्यमात्र जीवांत स्वातंत्र्य आहे. हातून प्रत्यक्ष शुभ किंवा अशुभ क्रिया घडून येणें किंवा न येणें या बाबतींत जीवांना स्वातंत्र्य नाहीं. या सर्व बाबतींत जीव, प्रारब्धपरतंत्र आहेत.


(२) कलम दुसरें, मध्यम अधिकारी:—

यथाशक्ति व यथामति शुभ अथवा अशुभ, वाटेल तें करण्याचें मनुष्यांच्या स्वाधीन आहे, पण याच देहांत असतांना तो सर्व करील असें मात्र नाहीं. कालानें व क्रमाक्रमानें मनुष्य वाटेल तें करूं शकतो. ह्मणून सर्व विषयांत प्रयत्न करण्याविषयीं जीव स्वतंत्र आहे.

(३) आतां तिसरें सिद्धांतकलम असें कीं,

केवल अनन्यभावानें प्रभूला शरण जाणें, यापलीकडे जीवांच्या कांहींएक स्वाधीन नाहीं. जीव सर्वथैव ईशपराधीन आहेत.

आतां या त्रिविध सिद्धांताचें स्पष्टीकरण तुला थोडक्यांत सांगतों, वर्म लक्षांत ठेव. पहिल्या कलमांतील सिद्धांतानें प्रारब्धवादालाही धक्का बसत नाहीं. म्हणजे यांत प्रारब्धप्राधान्यप्रतिपादक शास्त्रवाक्यांना वैय्यर्थ्य न येतां, प्रयत्नप्राधान्यता दर्शित केली आहे. तसेंच दुसऱ्या कल-



मांतील सिद्धांतानें प्रयत्नाला प्राधान्यता दाखवून 'यथामति' व यथा-शक्ति या शब्दानें प्रारब्धाचा व ईश्वराचाही बोज म्ह० सन्मान ठेविला आहे. तसेंच तिसऱ्या कलमांतील सिद्धांतानें ईश्वरवादास प्राधान्यता दाखवून अन्य दोन्ही वादांचा सन्मान ठेविला. एवंच, या जीवकर्तृक प्रयत्नवादांतही बाकीच्या वादांना स्वस्वविषयांत प्राधान्यता दर्शित केली आहे.

असो—आतां प्रथम कलमाचें स्पष्टीकरण तुला सांगतों. मनुष्यांत विचारी आणि पशुतुल्य अविचारी असे दोन भेद आहेत. त्यांपैकीं उत्तम विचारवान् जो असतो, त्यामध्यें जन्मतःच धर्माधर्माचें विमर्शन करण्याची नैसर्गिक शक्ति असते. केवळ पशुसमान असणाऱ्या मनुष्यांत ती शक्ति नसते व पशुदेहामध्येंही ती शक्ति नाहीं. म्हणून पशूला शास्त्र, धर्माधर्माचें विधान करीत नाहीं. विवेकी मनुष्यांनाच करतें. पशूंचा देह फक्त प्रारब्धभोग संपविण्याकरितांच आहे. आणि मनुष्यांचा देह, प्रारब्धभोग संपविण्याकरितां असून नवीन आणखी वासनारूपानें क्रियमाण कर्मे करण्याचेंही मनुष्यांत सामर्थ्य आहे. आणि पूर्वीचें अविचारजन्य वासनात्मक संचित कर्म नष्ट करण्याचेंही मनुष्यांत सामर्थ्य आणि स्वातंत्र्य आहे. आतां विषयभोगवासना ही विषयांच्या व स्वस्वरूपाच्या अविचारापासून उत्पन्न होते. ती विषयदोष-दर्शनरूप विचारानें नष्ट होते. तें विचारसामर्थ्य या मनुष्यदेहांतच आहे. म्हणून सर्व प्रकारच्या वासना नष्ट करण्याचें स्वातंत्र्य जीवांत आहे. या देहाकडून पापाचरण किंवा पुण्याचरण करणें किंवा न करणें, हें मनुष्यांच्या सर्वथैव स्वाधीन नाहीं, इतकें सिद्ध झालें. कारण हा सर्व देह आणि मन, प्रारब्ध कर्माची केवळ मूस आहे. म्हणून देहाकडून मरेपर्यंत होणाऱ्या सर्व शुभाशुभ क्रिया, पूर्वील ठराविक नियतीप्रमाणेंच तत्तत्कालीं होणारच; त्या ब्रह्मदेवालाही चुकणार नाहींत. म्हणून धर्माधर्माच्या ज्ञानानें पुढील जन्माला व सुखदुःखाला कारणीभूत असणाऱ्या वासनाच फक्त पौरुष प्रयत्नानें नष्ट होतात. मनुष्यांचा स्वभाव आणि क्रिया ज्ञानानें निःशेष पालटतात असा नियम नाहीं. व तसा विधिनिषेधप्रतिपादक शास्त्रांचा अभिप्रायही नाहीं. कारण तसें असतें तर,

स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ॥
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि यत् ॥

हें वाक्य व्यर्थ म्हणावें लागेल. तसेंच " सदृश्यं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि । इंद्रियाणींद्रियार्थेषु ॥ " इत्यादि वाक्यें, देह व मनानें होणाऱ्या सर्व क्रिया प्रकृतीच्या म्हणजे प्रारब्धाच्या आधीन आहेत, जीवांच्या पौरुष प्रयत्नांतील नाहींत, असें सांगत आहेत. व वासिष्ठेऽपि—

पौरुषेण प्रयत्नेन बलात्संत्यज्य वासनां ॥
स्थिति बध्नासि चेत्तर्हि पदमासादयस्यलं ॥
प्राक्तनं वासनाजालं पुरुषार्थेन जीयते ॥
यत्नेनाद्यतनेनाशु ह्यस्तनायतनं यथा ॥१॥ इति ॥

हीं वाक्यें विषयवासना विचाररूप प्रयत्नानें नष्ट करणें, यालाच पौरुष प्रयत्न असें म्हणतात. देहाकडून शास्त्रोक्त क्रिया होणें किंवा न होणें, याला पौरुष प्रयत्न ह्मणत नाहींत. कारण त्या बाबतींत मनुष्यांचा देह प्रारब्धपरतंत्र आहे. शास्त्र समजणारा उत्तम वागतो, व न समजणारा वाईट वागतो, असा नियम नाहीं. खरा पुरुषप्रयत्न म्हणजे भ्रम, मोह, किंवा अज्ञान—निवृत्तिद्वारा सर्व विषयवासनानिवृत्ति करण्यांतच आहे. ह्मणून कर्तृत्वभोक्तृत्वाचा अभिमान सोडून स्वस्वरूपविचारानें सर्व विषयवासनांचा त्याग करणें, एवढेंच विचारी जीवांच्या स्वाधीन आहे. हा पहिल्या कलमांतील अचल सिद्धांत ठरला. हें निश्चित लक्षांत ठेव.

आतां, मागें सांगितलेल्या दुसऱ्या नंबरच्या कलमांत " यथामति व यथाशक्ति, इच्छेनुरूप वाटेल तें करण्याचें जीवांत स्वातंत्र्य आहे. " असें सांगितलें होतें. त्या सिद्धांताचें स्पष्टीकरण सांगतों. तूं असें पहा कीं, अग्नीच्या ठिणगींत सर्व ब्रह्मांड जाळण्याचेंही सामर्थ्य आहे. पण त्या ठिणगीनें आपला अल्पदेह अन्य उपाधींनें क्रमाक्रमानें वृद्धिंगत केल्यावांचून तिला ब्रह्मांड जाळतां येणें शक्य नाहीं. त्याप्रमाणें " नर करणी करे तो नरका नारायण हो जाय " या वचनावरून जीवांत ब्रह्मांड

उत्पन्न करण्याचें व नष्ट करण्याचें अथवा वाटेल तें करण्याचें सामर्थ्य आहे. कारण "ममैवांशो जीवलोके" यावरून अग्नीच्या ठिणगीप्रमाणें जीव हा परमात्म्याचा अल्पांश जरी आहे, तरी त्यानें यथाशक्ति व यथामति, क्रमाक्रमानें व कालानें आपल्या मनाचा व देहाचा उपाधि तपोबलानें वाढवीत वाढवीत वाढविला असतां सर्व करण्याचें सामर्थ्य जीवांत येतें. (तें मूळचेंच आहे. पण अल्पज्ञतेमुळें व हा साडेतीन हाताचा अल्प उपाधि स्वीकारल्यामुळें आपणच आपलें सामर्थ्य व स्वातंत्र्य नष्ट करून विनाकारण घेतलें. त्यामुळें तें लुप्त झालें आहे.) क्रमाक्रमानें तें सामर्थ्य प्राप्त करून घेण्याचें स्वातंत्र्य जीवांत आहे. यांतील अभिप्राय, याच देहांत जीव वाटेल तें करूं शकतो, असा नाहीं. तर इष्ट विषयाचा आत्तांपासूनच ध्यास व वासनावृद्धि, हा जीव जर करूं लागेल, तर देहांतरानें वाटेल तें होईल. या देहांत जेवढें प्रारब्धानें ठरलें, तेवढेंच होणार. येवढें वर्म विसरूं नको. व आपल्या स्वातंत्र्यांत परमार्थविषयक मुख्य प्रयत्न जेवढा सांगितला आहे तो करण्याविषयीं हातपाय गाळूं नकोस.

आंता पूर्वीं 'यथाशक्ति आणि यथामति' हे जे आम्हीं शब्द घातले आहेत, याचा अभिप्राय:—मुंगीला गुळाची ढेप उचलण्याचें जरी सामर्थ्य नाहीं, तरी एकएक कण उचलून नेण्याचें सामर्थ्य तिच्यांत नैसर्गिक असल्यामुळें, कांहीं कालानें ती सर्व ढेप उचलून नेऊं शकते. ही गोष्ट तिच्या स्वातंत्र्यांत आहे. त्याप्रमाणें शास्त्रविधीनें वागणें व निषिद्ध कर्माचा त्याग करणें, या बाबतींत पूर्वीचे कांहीं प्रारब्धसंस्कार अप्रबळ जर असतील तर त्यांचा पराभव करण्याचें यथाशक्ति सामर्थ्य व स्वातंत्र्य जीवांत आहे. म्हणूनच शास्त्रांत आपद्धर्माचें वगैरे प्रतिपादन केलें आहे. साग्र वेदाध्ययनाचें सामर्थ्य ब्राह्मणांत नसेल, तर निदान एक ऋचा पाठ करण्याचें सामर्थ्य आपणांत आहे. तसेंच ब्राह्मणास सर्वस्व दान करण्याचें सामर्थ्य जरी नसेल, तरी एक तुळशीपत्र किंवा तत्सम कांहीं तरी अर्पण करण्याचें सामर्थ्य जीवांत आहे. तसेंच माशीला गरुडाइतकें उड्डाण करण्याचें स्वातंत्र्य व सामर्थ्य अदृष्टवशात् जरी नाहीं, तरी

यथाशक्ति उडण्याचें सामर्थ्य आहे. आणि भृंगीकीटन्यायानें वासनावृद्धीचा अत्यंत अभ्यास केल्यानें, मक्षिकाही गरुड होऊं शकेल. एखादा मनुष्य पुष्कळ वर्षांपसून एखाद्या विषयांत अत्यंत व्यसनी जरी असला, तथापि त्या व्यसनापासून आपलें मरण आहे, असें निश्चित ज्ञान त्यास झालें असतां व्यसनाचा प्रबळ संस्कार जरी त्यास असला, तरी यथाशक्ति प्रयत्नानें व कालांतरानें त्या व्यसनाचा त्याला त्याग करतां येतो. याप्रमाणें यथाशक्ति प्रयत्नानें या देहांत किंवा अन्य देहांत क्रमानें व कालानें नराचा नारायणही होऊं शकतो. अशा दृष्टीनेंच प्रयत्नवादाला सर्वांत प्राधान्यत्व सांगितलें आहे.

शंका—शिष्य ह्मणतो, मनुष्यानें होईल तितकें शास्त्रविधीनें वागण्याविषयीं यथाशक्ति प्रयत्न करीत असावें, याविषयीं मनुष्यांत स्वातंत्र्य आहे, असें आपण सिद्धांतक्रम सांगितलें. पण हें तरी मनुष्याच्या आधीन आहे का दैवाधीन आहे, हा माझा निश्चय अझून होत नाहीं. याविषयीं अनुभवशीर एखादा दृष्टांत सांगून तें मला पुन्हां चांगलें पटवून द्या.

उत्तर–गु० " तस्मात्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ॥

या वचनावरून आणि

हस्तं हस्तेन संपीड्य दंतैर्दंताश्च पीडयन् ॥
अंगान्यंगैः समाक्रम्य जयेदादौ स्वकं मनः ॥

या वाशिष्ठोक्तीवरून कोणत्याही बाबतींत जितेंद्रिय होणें, किंवा मनोनिग्रह करणें याविषयीं यथाशक्ति प्रयत्न करण्याची स्वातंत्र्यशक्ति मनुष्यांत नैसर्गिकच कशी ठेविली आहे, हें तुझ्या लक्षांत येण्याकरितां सर्वत्र अनुभवांत येणारा दृष्टांत तुला सांगतों. यावरून 'यथाशक्ति' पदाचा अर्थ लक्षांत आण.

तूं असें पहा कीं, एखाद्या सभ्य व मर्यादित सभेंत एखाद्या सभ्य मनुष्यास पूर्वी रेचन वगैरे घेतलें असल्यामुळें त्यास फारच घाईनें जरी शौच्यास लागली, तरी मर्यादित सभेंत मध्यंतरीं उठून जाण्याचा प्रतिबंध मानल्यामुळें, ती सभा विसर्जन होईपर्यंत किंवा पूर्वरेचनकर्म जोरांत जरी

असलें तरी निदान शौचस्थळाकडे जाईपर्यंत, तो आपल्या इंद्रियाचा निग्रह करून तसाच थांबतो. किंवा समाजांत भोजन करतांना, माक्षिका-भक्षण झालें असता, त्या ठिकाणीं पानावर वमन होण्याचा वेग जरी आला असला, तरी तेथून उठून बाहेर जाईपर्यंत निदान तो वमनवेग थांबविण्याचें यथाशक्ति मनुष्यांत सामर्थ्य असतें. शौच आणि वमन यांचा असा कांहीं आग्रह नाहीं, कीं लहान मुलाप्रमाणें किंवा मूर्खाप्रमाणें सभेंतच पुरीषोत्सर्ग आणि पानावरच वमन करावें! असा प्राक्कर्माचा आग्रह नाहीं. यथाशक्ति मन आणि इंद्रियनिग्रहाविषयीं असे पुष्कळ दृष्टांत अनुभवांत येतात. यांतील तात्पर्य असें कीं, प्रारब्धकर्मापैकीं, अप्रबल संस्कार तर प्रबळ प्रयत्नानें नष्ट होतातच. पण प्रबळ संस्कार जरी असले तरी त्यांचा शास्त्रोक्त यथाशक्ति प्रयत्नानें व विधीनें त्याचा विनियोग करणें हें विचारी मनुष्यांच्या स्वाधीन आहे. याविषयीं तूं असें पहा कीं, आपल्या नशिबांत सर्वथैव पापाचरण करण्याचें जरी आहे, म्हणजे अगम्यागमन, अभक्ष्याभक्षण, चौर्य वगैरे अकृत्याकृत्य हें जरी होण्याचा योग असेल; तथापि शास्त्राज्ञा अशी आहे कीं, तें कृत्य विधिनेंच करावें, व तसें करणें मनुष्याधीन आहे. विश्वामित्राला अदृष्टवशात् कुत्र्याचें मांस चोरण्याचा व खाण्याचा प्रसंग आला, पण त्यानें चोरीही विधिनेंच केली, व मांसही यज्ञविधिनेंच खाल्लें. वास्तविक पापाचरण करूं नयेच. पण तें करण्याची अदृष्टानुसार इच्छा झाल्यास आपद्धर्मांतील शास्त्रविधीनें करण्याचें स्वातंत्र्य मनुष्यांत आहे. आतां येवढें मात्र खरें आहे कीं "कर्मणो गहना गतिः" या वचनावरून कर्माची गति फारच गहन असल्यामुळें कर्म काय व अकर्म काय? पाप कोणचें व पुण्य कोणचें? विधि कोणचा व अविधि कोणचा? हें शास्त्ररहस्य एक ब्रह्मवेत्त्या पुरुषावांचून अन्यास कळणें फार दुर्घट आहे. कर्मांची गहन गति म्हणण्याचें कारण असें कीं, एखादा मनुष्य आपल्या समजुतीनें शास्त्रप्रमाणावरून पुण्य कर्म करावयास जातो, किंवा विधियुक्त वर्तन करावयास जातो. पण "देशकाल-वयोऽवस्था" हें तो जाणत नसल्यामुळें व अधिकारपरत्वें विधीचें व

अविधीचें स्वरूप तो जाणत नसल्यामुळें, तें पुण्यकर्म असूनही अन्य शास्त्र-वचनांवरून पापच किंवा अविधिच तो ठरला जातो. कारण

" क्वचित् गुणोऽपि दोषः स्यात् दोषोऽपि विधिना गुणः "

या भागवतवचनावरून एखादे वेळीं गुणाचाही दोष होतो, व दोषाचाही गुण होतो. म्हणून

" गुणदोषदृशिर्दोषः गुणस्तूभयवर्जितः "

हें तत्त्व ब्रह्मवेत्ताच समजतो. सर्वांना विधिनिषेधशास्त्राचें रहस्य कळणार नाहीं, म्हणून भक्तिमार्ग व ईश्वरवादाला प्राधान्यता आहे. व तें दर्शित करण्याकरितांच आम्ही स्वतंत्रतेसंबंधानें येथें तिसरें कलम सांगितलें आहे. म्हणून 'यथामति निषिद्धाचरणत्यागाविषयीं मति ठेवून, शास्त्र-विधि समजेल तितका जाणून, भक्तिभावानेंच सदाचरणाविषयीं प्रवृत्ति ठेवावी. परमात्म्याचे ठिकाणीं प्रेमलक्षणा भक्ति ठेवून, विधीचें व अविधीचें यथार्थ स्वरूप न कळल्यामुळें कदाचित् अविधीनें जरी वर्तन झालें, तरी भक्तीमुळें तो अविधि, विधींतच गणला जातो, असें शास्त्रवर्म आहे. असो. म्हणून सर्व कांहीं यथाशक्ति करण्याचें जीवांत स्वातंत्र्य व सामर्थ्य आहे, हें सिद्ध झालें. अशा युक्तीनें व अभिप्रायानें शास्त्रांतील विधिनि-षेधाला आणि मागें सांगितलेल्या प्रयत्न व प्रारब्धवादालाही व्यर्थता येत नाहीं.

आतां मागील तिसऱ्या कलमाचें स्पष्टीकरण सांगतों. " केवल अनन्यभावानें प्रभूला शरण जाणें, यापेक्षां मनुष्यांच्या कांहींएक स्वाधीन नाहीं, " असें जें मागें सांगितलें, याचा अभिप्राय असा कीं, कित्येक पशु-तुल्य अविचारी मनुष्यांना धर्म म्हणजे काय ? व अधर्म काय ? याचें ज्ञान, शास्त्रसंस्कार, व सत्संगति वगैरे नसल्यामुळें लेशमात्रही नसतें, व वासना म्हणजे काय व ती कशी नष्ट करावी वगैरे कांहींच ज्ञान नसतें. आतां फक्त त्यांना मनुष्याचा देहमात्र असल्यामुळें सामान्यतः पापपुण्याचें साधा-रण ज्ञान त्यांना असतें एवढेंच, पण विशेष ज्ञान नसतें. अशा अविचारी

मनुष्यांना सर्व दुःखांतून सुटण्याला त्यांच्या अधिकारांत व स्वातंत्र्यांत कोणता विषय आहे, अशा आक्षेपावर भगवान् उत्तर देतात कीं,

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ॥
तत्प्रसादात् परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतं "

याचा भावार्थ असा कीं, आपल्याहून परमात्मा निराळा आहे असें जे समजतात, त्यांनीं निरंतर सर्वभावेंकरून परमात्म्याला शरण जावें. यापलीकडे अशा अविचारी लोकांच्या स्वाधीन काय असणार ? कांहीं नाहीं. प्रारब्धभोगसमाप्तीनंतर कालानें व माझ्या प्रसादानेंच ते शाश्वत सुखाला प्राप्त होतील. ह्मणून

" हरि ठेविल तैसें रहावें । जें जें होइल तें तें पहावें ॥


या वाक्यावर भरंवसा ठेवून त्यांनीं समाधानांत असावें. नामस्मरण व भजनपूजन करावें. यापलीकडे त्यांच्याशीं काय बोलावें ?

असो—याप्रमाणें त्रिविध अधिकारभेदानें शास्त्रकारांनीं जीवांच्या स्वातंत्र्यांत असणाऱ्या विषयासंबंधानें तीन प्रकारांनीं सिद्धांतविचार केला आहे. यांपैकीं प्रत्येकांनीं स्वतःच्या समजुतीप्रमाणें व अधिकारानुरूप ज्याला जो योग्य वाटेल तो त्यांनीं पत्करून अधिकारानुरूप योग्य कर्तव्याविषयीं सावध रहावें. हा मनुष्यांच्या स्वातंत्र्यतेसंबंधानें मागें सांगितलेल्या तीन प्रकारच्या कलमांचा इत्यर्थ झाला. आंता या तीन कलमांतील त्रिविध सिद्धांतांपैकीं प्रथम कलमांतील वासनानिवृत्तीबद्दल ठरविलेला सिद्धांत उत्तम जाणावा. दुसऱ्या कलमांतील यथाशक्ति प्रयत्नांबद्दल ठरलेला सिद्धांत मध्यम जाणावा; व तिसऱ्या कलमांतील भेदबुद्धीनें शरण जाण्याविषयीं सांगितलेला सिद्धांत कनिष्ठ जाणावा. याप्रमाणें त्रिविध अधिकारानुरूप त्रिविध सिद्धांतांची योजना ठरविली जाते.

प्रारब्ध, जीव आणि ईश्वर यांना कोणत्याही विषयांत

निरपेक्ष पृथक् स्वातंत्र्य नाहीं

याविषयीं सप्रमाण निरूपण.



आतां या तिन्हीही वादांची एकरूपता व भेदवादखंडण लक्षांत येण्याकरितां दुसऱ्या तऱ्हेनें असा विचार केला पाहिजे कीं, जीव, ईश आणि प्रारब्ध, या तिघांनाही आपआपल्या कर्तव्यअधिकारांत कोणतेंही कर्म करण्यास परस्परांच्या साहाय्यतेवांचून पृथक् स्वातंत्र्य नाहीं, हें मी दृष्टांतपूर्वक तुला सांगतों, नीट लक्षांत आण. याविषयीं तुकोबांनीं असा दृष्टांत दिला आहे कीं,—

उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक ॥ एकावीण एक कामा न ये ॥

तूं असें पहा कीं, एक भात तयार करणें झाल्यास आपणांजवळ नुसते तांदूळ असून उपयोग नाहीं. किंवा केवल अग्नि किंवा पाणीही असून उपयोग नाहीं. तर भात तयार होण्यास अग्नि, उदक, तांदूळ (आणि कर्ता) इतक्या सामुग्रीचा ऐक्यभाव असल्यावांचून भात तयार होत नाहीं. यद्यपि या पदार्थांत तांदुळाला प्राधान्यता आहे, तथापि अन्य पदार्थसाहाय्यतेवांचून त्या तांदुळांना भातपणा प्राप्त होत नाहीं. याप्रमाणें द्राष्टांतामध्यें जीवाकडून कोणतेंही कर्म घडून येण्यास यद्यपि जीव आणि जीवाचा प्रयत्न यांना प्राधान्यता प्रयत्नवादांत सांगितली आहे, तथापि जीवाचे हातून न्याय्य अथवा अन्याय्य कोणतेंही कर्म घडून येण्यास व त्याचें फल प्राप्त होण्यास केवल जीवास स्वातंत्र्य नसून ईश्वर आणि प्रारब्ध यांच्या साहाय्यतेची त्यास अपेक्षा आहे. त्यावांचून कोणतेंही कर्म घडणार नाहीं, व हा त्रिकूटसंयोग असल्यावांचून फलही मिळणार नाहीं. तें कसें म्हणशील तर ऐक. तूं असें पहा कीं, एखाद्या जीवाच्या मनांत पूर्वसंस्कारानें पापकर्म करण्याचें आलें, पण तें कर्म हातून घडून येण्यास ईश्वरा-

कडून सत्ता, स्फूर्ति आणि ज्ञानप्रकाश, यांची मदत न झाल्यास तें कसें घडणार? म्हणून या बाबतींत ईश्वरसाहाय्यतेचीही जीवास अपेक्षा आहे. आतां जरी हा जीव पापकर्म करण्यास तयार आहे आणि ईश्वरही त्यास सत्ता, स्फूर्ति व प्रकाश देण्यास तयार आहे; तथापि जीवाकडून तें कर्म घडून येण्यास प्रारब्धाची अनुकूलता जर नसेल, ह्मणजे याच्या हातून तें कर्म घडण्याचें याच्या पत्रिकेंत जर नसेल, तर दोघांची मदत असूनही तें पापकर्म जीवांच्या हातून घडलें जाणार नाहीं. आंता यांत आणखी दुसरा मुद्दा असा कीं, जरी ईश्वर आणि दैव, यांच्याकडून जीवांच्या हातून पापकर्म घडवून आणण्याविषयीं मदत करण्याची तयारी आहे, व त्याप्रमाणें ते घडवूनही आणतील, परंतु जीवानें पापकर्माचा कर्तृत्व अभिमानच जर न धरला व तद्विषयक वासना जर न ठेविली तर तें कर्म घडून न घडून सारखेंच. कारण हा जीव कर्मफलाविषयीं वासनारहित असून कर्तृत्वअभिमानरहित असल्यामुळें त्या पापकर्माचें फल त्यास प्राप्त होणार नाहीं. हा अनुभव तत्ववेत्त्याचे ठिकाणीं मात्र येतो. कारण तत्ववेत्त्याला कोणत्याही फलाची वासना नसते. व कर्तृत्वअभिमानही नसतो. ह्मणून प्रारब्ध आणि ईश्वर कितीही कुप्यमान झालें तरी त्या कोपाचें जीवास पुनर्जन्म वगैरे कांहीं फल नसल्यामुळें त्यांचा पराक्रम तत्ववेत्त्याचे ठिकाणीं निष्फलच म्हटला पाहिजे. कारण "प्रारब्धाय समर्पितं स्ववपुरित्येषा मनीषा मम" याप्रमाणें ज्ञात्यानें आपलें शरीर प्रारब्ध आणि ईश्वर, यांना अगोदरच अर्पण करून टाकल्यामुळें हा स्वरूपबोधामुळें दोघांच्याही कचाट्यांतून सुटला आहे. तात्पर्य, तिघांचेंही ऐकमत्य झाल्यावांचून एकाकडूनच कोणतेंही कर्म घडून येत नाहीं, हें सिद्ध झालें. ह्मणून कोणत्याही बाबतींत एकाच वादाला प्राधान्यता देतां येत नाहीं. या अभिप्रायानेंच श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतात—

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथक्विधम् ॥
विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचमं ॥
न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ॥ इति ॥

अर्थ—भगवान म्हणतात, जीवाच्या हातून कोणतेंही न्याय्य अथवा अन्याय्य कर्म घडून येण्यास वरील श्लोकांत निर्दिष्ट केलेली ही पांच प्रकारची साधनसामुग्री असावी लागते. त्यावांचून कोणतेंही कर्म एकाकडूनच घडलें जाणार नाहीं. ती सामुग्री अशी—एक अधिष्ठान म्ह० देह, कर्ता म्ह० जीव, करण म्ह० इंद्रियें, पृथक्चेष्टा म्ह० प्रयत्न किंवा हालचाल, आणि पाचवें दैव, म्हणजे इंद्रियांच्या सूर्यादि देवता, किंवा प्रारब्ध, याप्रमाणें हे पांच हेतु कोणतेंही पाप अथवा पुण्यरूप कर्म घडून येण्यास अवश्य असावे लागतात. आम्ही, मागें कर्म घडण्यास प्रारब्ध, प्रयत्न, आणि ईश्वर, असे जे तीन प्रकार सांगितले, त्यांतच या वरील पांच कारणांचा अंतर्भाव आहे असें जाणावें. जीव आणि ईश, हे चित्प्रकाशरूपानें एकच असल्यामुळें वरील श्लोकांत 'कर्ता' हें पद आहे, यांतच दोघांचा अंतर्भाव जाणावा. 'चेष्टा' या पदांत देह, इंद्रियें व प्रयत्न, यांचा अंतर्भाव जाणावा आणि प्रारब्धार्थी दैवपद प्रत्यक्ष श्लोकांत आहेच. असो या पंच सामुग्रीपैकीं, एक जरी न्यून असलें तरी कोणतेंही कर्म जीवाकडून घडलें जाणार नाहीं. याविषयीं भागवतकारांनींही एकादशस्कंधांत दुसरा एक दृष्टांत असा दिला आहे कीं,

"स्नेहाधिष्ठानवर्त्यग्निसंयोगो यावदीयते ॥
ततो दीपस्य दीपत्वं तथा देहकृतो भवः ॥"

म्हणजे दीपाचे ठिकाणीं दीपत्व येण्याला जसें समई वगैरे कांहींतरी अधिष्ठान असावें लागतें, व तेल, वात आणि अग्नि इतकी सामुग्री अवश्य लागते. यांपैकीं एखादें साधन जर न्यून झालें तरी दीपाला दीपत्व जसें येणार नाहीं, त्याप्रमाणें कोणतेंही कर्म हातून घडण्यास जीव, ईश आणि दैव वगैरे वर निर्दिष्ट केलेली सर्व सामुग्री अवश्य असावी लागते. किंवा याला दुसरा साधा दृष्टांतः—तूं असें पहा कीं, एखादी तीन पायाची घडवंची असावी आणि एखाद्यानें जर असा प्रश्न केला कीं, या घडवंचीच्या तीन पायांपैकीं मुख्य पाय कोणचा? तर याचें काय उत्तर देणार?

तर हा प्रश्नच चुकीचा संभवतो. कारण घडवंचीचे तिन्हीं बाजूंचे तिन्हीही पाय तिन्हीं बाजूंचा भार उचलण्याच्या कामांत श्रेष्ठच आहेत. त्यांतील एक पाय जर कमी असेल तर घडवंचीवर उभें राहण्याचें काम होणार नाहीं. याप्रमाणें जीवांकडून कोणतेंही शुभाशुभ कर्म घडून येण्यास प्रारब्ध, प्रयत्न आणि ईश्वर या तिघांचीही परस्परांना परस्परसहायता असल्यावांचून तें घडणार नाहीं. ह्मणून अशा ऐक्यभावदृष्टीनें प्रारब्ध, प्रयत्न आणि ईश्वर या तीन वादांपैकीं कोणत्याही वादाला श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व देतां येणार नाहीं. ह्मणून प्रारब्ध श्रेष्ठ, कां प्रयत्न श्रेष्ठ, कां ईश्वर श्रेष्ठ ? असले प्रश्न अविचाराचे असतात, हें सिद्ध झालें. याचें एकच उत्तर असें कीं, हे तीन पदार्थ भिन्नच नाहींत. या तिघांचें स्पंदात्मक एकच स्वरूप आहे. भेद हा अविचारानें केवळ मनोमात्र आहे. असो. येथपर्यंत अध्यारोपदृष्ट्या प्रारब्धादिकर्माविषयीं विचार संपला.

प्रकरणोपसंहार व

पारमार्थिक सिद्धांतविचार.

बा शिष्या ! येथपर्यंत द्वैतकल्पनेचा अंगीकार करून तुझ्या प्रश्नानुसार तुला प्रारब्धप्रयत्नादिकांविषयीं व्यावहारिक शास्त्रदृष्ट्या सर्व विचार सांगितला. आतां या प्रकरणाचा पारमार्थिक विचार तुला सांगावयाचा राहिला आहे, तो थोडक्यांत तुला सांगून हें प्रकरण संपवितों. यांत प्रथमतः एक तत्त्व असें सांगतों कीं, व्यावहारिकदृष्टच्या कोणत्याही वाद्यानें द्वैत पत्करून कोणत्याही विषयासंबंधानें कसाही जरी सिद्धांत ठरविला, तरी पारमार्थिक दृष्ट्या तो अपसिद्धांतच ठरतो. म्हणून प्रारब्धप्रयत्नादिकांविषयीं आत्तांपर्यंत व्यावहारिक सिद्धांताची जी कांहीं भाषा झाली, ती पारमार्थिक दृष्ट्या सर्व अपसिद्धांतच ठरणार आहे. कारण—

" मनोमात्रमिदं द्वैतं अद्वैतं परमार्थतः ॥ "

या श्रुतीवरून जीव, ईश्वर, किंवा प्रारब्धप्रयत्नादि कर्माविषयीं ज्या ज्या भेदकल्पना केल्या जातात त्या सर्व मनोमात्र असल्यामुळें मिथ्या आहेत. मिथ्या वस्तूची काथ्याकूट करीत बसण्यांत कांहीं फल नसून खरें समाधान नाहीं. खरें समाधान म्हणजे अद्वैतबोधांतच आहे. या प्रकरणांत पूर्वीपासून आमचा सांगण्याचा कटाक्ष हाच आहे कीं, प्रारब्ध आणि प्रयत्न, जीव आणि ईश्वर, यांच्या तात्विक स्वरूपांत किंचितही भेद नाहीं. यांत भेद मानून कोणी कांहीं जरी सिद्धांत ठरविला, तरी पुन्हा कोणच्या तरी कक्षेंत घोटाळा होणारच, व शेवटीं विचाराअंतीं या पारमार्थिक सिद्धांतावरच यावें लागणार. कारण याविषयीं श्रुतिस्मृतींचें म्हणणें असें आहे कीं,

"य एष उदरमंतरं कुरुते अथ तस्य भयं भवति"
"द्वितीयाद्वै भयं भवति" "स्वल्पमप्यंतरं कृत्वा जीवात्मपरमात्मनोः। यस्तिष्ठति स मूढात्मा भयं तस्याभिभाषितं॥"

याचा भावार्थ—ईश्वरांत व आपणांत जो कोणी यत्किंचित् अंतर किंवा भेद मानतो, त्या मूर्खाला भीति उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. ह्मणून भेदज्ञान आहे तेथपर्यंत संशय कधींही नष्ट होणार नाहींत. यावरून श्रुतींना यत्किंचितही द्वैतकल्पना खपत नाहीं. तुकोबांचेंही ह्मणणें सुद्धां हेंच कीं "आपुलीया जीवें शिवाशीं पहावें॥ आत्मसुख ध्यावें वेळोवेळा॥" याप्रमाणें जीव आणि ईश यांत जसा ज्ञप्तिरूपानें यत्किंचित् भेद नाहीं, त्याप्रमाणें प्रारब्ध आणि प्रयत्न, यांत चित्स्पंदात्मक कर्मरूपानें भेद नाहीं. याबद्दल वसिष्ठांचें ह्मणणें असें आहे कीं, (वा. प्र. २ सर्ग ९)

"वासना मनसो नान्या मनो हि पुरुषः स्मृतः॥
तद्दैवं तानि कर्माणि कर्म साधो मनो हि तत्॥
मनो हि पुरुषस्तस्माद्दैवं नास्तीति निश्चयः॥"
"यदेव तीव्रसंवेगात् दृढं कर्म कृतं पुरा॥
तदेव दैवशब्देन पर्यायेणेह कथ्यते॥"

अर्थ.—रामा, वासना ही मनाहून निराळी नाहीं व मन हें जीवाहून निराळें नाहीं. जीव ईश्वराहून निराळा नाहीं व ईश्वराहून दैव किंवा प्रयत्नात्मक कर्म निराळें नाहीं. हीं सर्व मिथ्या स्पंदाचीं किंवा मिथ्या कल्पनेचीं स्वरूपें होत. हे सर्व मिळून स्पंद एकच. मिथ्या व्यवहारांत यांचे पर्याय शब्दमात्र कार्यानुरूप निरनिराळे दिले जातात, एवढेंच. या सर्वांचें स्पंदात्मैकत्वरूपानें अभेदज्ञान नसल्यामुळेंच यांच्या श्रेष्ठत्वकनिष्ठत्वासंबंधानें हा भेदवाद उपस्थित होतो. वास्तविक यांच्या अभेदज्ञानांत कोणताही वादच संभवत नाहीं. अरे, तूं असा निश्चय कर कीं, जीवही आपणच, प्रयत्नही आपणच, प्रारब्धकल्पनाही आपणच, ईश्वरकल्पना करणारेही आपणच. किंवा कर्म, अकर्म, विकर्म वगैरे सर्व कल्पना करणारे कल्पनारूपानें आपणच जर आहोंत, तर यांत श्रेष्ठत्वकनिष्ठत्व कसें ठरणार ? व तें ठरविलें तरी काल्पनिकच ठरणार ! आणि कल्पनेच्या आश्रयानें जें कांहीं ठरविलें जातें, तें सर्व मिथ्याच ठरतें. तुकोबांचें म्हणणें बरोबर आहे—

कल्पनेचा देव कल्पनेची पूजा । तेथे कोणी दुजा आढळेना ॥
आढळेना देव आढळेना भक्त । कल्पनेरहित काय आहे ॥

देव आपल्याहून निराळा आहे, हें तरी आपल्या कल्पनेनेंच ठरविलें आहे व त्या दृढाध्यासानेंच एखाद्या भक्ताला स्वतःचें स्वरूपच स्वतःला जशी भावना करील तशा रूपानें निराळें दिसूं लागतें. आरशांत जसें आपलेंच रूप आपणांस भिन्न रूपानें दिसूं लागतें, तसें येथें कल्पनारूप आरसा विचित्र असल्यामुळें त्या कल्पनेंत स्वतःचें स्वरूप भिन्नत्वानें अनेक तऱ्हेचें भासूं लागतें. त्यामुळें मूर्खांना वाटतें कीं, " अमक्याला, देव निराळ्या रूपानें भेटला, व अमक्याला भगवत्साक्षात्कार मुळींच झाला नाहीं ! " अशा अनेक तऱ्हेच्या स्वप्नस्थ गप्पा मूर्ख भक्त लोकांत सुरू असतात. देवाची योग्यता ज्यास्त, का भक्ताची योग्यता ज्यास्त ? असा आक्षेप घेणारास वरील अभंगांत तुकोबांनीं याचें उत्तर देऊन ठेविलेंच आहे कीं,

एखाद्या वंध्येला, दोन लेंकरांचें जुळें जसें उत्पन्न होतें; त्याप्रमाणें कल्पनामाउलीचींच हीं दोन्ही लेकरें आहेत. व हीं दोन्ही एकाच वेळेला जुळ्या भावंडांप्रमाणें उत्पन्न झालीं आहेत.

" द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते " ॥

या श्रुतिवचनामध्यें सुद्धा 'सयुजा' पदानें जीव आणि ईश्वर, हें युग्म, बीजांकुरन्यायाप्रमाणें अविद्यात्मक (मिथ्या) कल्पनामाउलीच्या ठिकाणीं एककालींच उत्पन्न झालें आहे असें सांगितलें आहे. यामुळें यांत धाकटा भाऊ कोणचा व वडील कोणचा, हें सांगतां येणें शक्य नाहीं. तात्पर्य, दोघांचीही आपल्या कल्पनेनेंच उत्पत्ति केली असल्यामुळें श्रेष्ठ व कनिष्ठत्वासंबंधानें ज्याची कल्पना जसें ठरवील, तोच सिद्धांत खरा. कारण ईश्वराची योग्यता ज्यास्त का जीवाची ज्यास्त, हें ठरविणाराच्या कल्पनेवर अवलंबून असल्यामुळें, कल्पकाच्या कल्पनेचीच योग्यता दोघांपेक्षां ज्यास्त आहे असें न्यायतःच म्हणावें लागतें. ह्मणून वरील अभंगांत " कल्पनेरहित काय आहे " असें तुकोबांनीं यासंबंधानें सिद्धांतवचन सांगून ठेविलें आहे. तात्पर्य, हा भेदवाद सर्व काल्पनिक असल्यामुळें कल्पनेचाच बाजार आहे. मिथ्या कल्पनेखेरीज जीवही सत्य नव्हे, व जीवांनीं कल्पित मानलेला ईश्वरही सत्य नव्हे. त्याचप्रमाणें प्रारब्धप्रयत्नादि सर्व प्रकारचे कर्मभेद, काल्पनिक असल्यामुळें वंध्यापुत्रवत् अत्यंत मिथ्या आहेत. मिथ्यावस्तूला श्रेष्ठकनिष्ठत्वादि भाव ठरवीत बसणें किंवा त्याचा सिद्धांत सांगणें, म्हणजे याचें उत्तर केवळ मौन धरल्यावांचून कोणालाही देतां येणार नाहीं. म्हणून वसिष्ठ ह्मणतात,

तस्मान्न द्वैतमस्तीह न चैक्यं न च शून्यता ॥
न चेतनाचेतनं वै मौनमेव न तच्च वा ॥
न चेतति क्वचित किंचित् कश्चित् चेत्यात्मभावतः ॥
तेन चेतापि नास्तीव मौनमेवावशिष्यते ॥

अर्थ—वशिष्ठ ह्मणतात—बाबारे ! भेद, अभेद, शून्यता, चेतन, अचेतन, तूं, मी, कर्म, अकर्म, प्रारब्ध, प्रयत्न वगैरे हे सव भाव काल्पनिक आहेत, ह्मणून कल्पना सोडून स्वस्थ मौन धरून बसणें हें फार चांगलें. पण मौन धरणें हा विधिसुद्धां कल्पनेंतच येणार. म्हणून मौनकल्पनेचाही आग्रह ज्या वेळेस सुटेल, त्या वेळेला खरा अद्वैतबोध झाला असें ठरतें. तेथपर्यंत सर्व द्वैतकल्पनेचाच बाजार आहे. त्यांत समाधान ह्मणून कधींही मिळणार नाहीं. परमार्थतः अद्वैतबोधाची खरी वस्तुस्थिति अशी आहे. पण व्यावहारिक अविचारी मनुष्यानें भेदाचा अंगीकार करून प्रारब्धप्रयत्नादिकांत श्रेष्ठ कोण ? असा प्रश्नच जर केला, तर मात्र त्याला हा सिद्धांत सांगण्याची सोय नाहीं. व हें बोलणें त्याला पटणारही नाहीं. ह्मणून भेदाचाच अंगीकार करून मोठ्या संकटानेंच असें सांगावें लागतें कीं, बाबांनो ! प्रारब्ध कांहीं खरें नाहीं. परमार्थबोधसंपादनार्थ प्रयत्नवादच श्रेष्ठ आहे. याविषयीं व्यावहारिक सिद्धांताचें, मागें तीन प्रकारानें, सर्व विवेचन झालेंच आहे. असो—शिष्या ! या विषयासंबंधानें पारमार्थिक वस्तुस्थिति काय आहे, हें रहस्य तुला एकदा मी सांगतों. तूं यांतील अभिप्राय नीट लक्षांत घे. मूळांत खरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, आत्मा निर्विकार, शांत व अक्रिय असा असल्यामुळें, त्याचे ठिकाणीं कर्म, अकर्म अथवा विकर्म किंवा संचित, प्रारब्ध व क्रियमाण अशा कोणत्याही क्रियेचा उद्भव संभवत नाहीं. असें "निष्कलं निष्क्रियं शांतं निर्विकारं निरंजनं" ही श्रुति सांगत आहे पूर्वीं आम्हीं तुला आत्म्याचे ठिकाणीं पुरुषकर्मात्मक चित्स्पंद उत्पन्न झाला, व त्याचींच हीं अनेक नामें आहेत, असें जरी सांगितलें होतें, तथापि तें आमचें सांगणें, अध्यारोपांतील आहे. वास्तविक हा कर्मस्पंद आत्म्याचे ठिकाणीं उत्पन्न झालाच नाहीं. म्हणून त्याला आम्ही 'मायामय स्पंद' असें विशेषण दिलें आहे. मायामयं पदार्थालाच मिथ्या असें ह्मणतात. "स्पंद इव स्पंदः, मायया जात इव जातः" अशी येथील 'उत्पन्न झाला' या शब्दाची पारमार्थिक परिभाषा आहे. याचा अर्थ स्वभ्रांतीनें किंवा मायाशक्तीनें आत्म्याचे

ठिकाणीं स्पंद ह्मणजे स्फुरण नसून तें झाल्याचे सारखे वाटणें, यालाच अध्यारोप ह्मणतात.

" ध्यायतीव लेलायतीव " ' स्पंदीव भवाति ' इति श्रुतेः ॥

येथील ' इव ' शब्दाचा अर्थ स्पंद झाल्याचे सारखें वाटणें, एवढाच होय. य विषयीं वसिष्ठांचेंही म्हणणें असेंच आहे कीं (प्र. ३ अ. ९ श्लो. ९८)

सस्पंदे समुदेतीव निस्पंदांतर्गतेन च ॥
इयं यस्मिञ्जगल्लक्ष्मी रलात इव चक्रता ॥
स्फुरंतीव बाहिष्ट्वेन स्वस्वप्नोऽत्र निदर्शनं ॥
जलं द्रवत्वात्स्पंदीव निस्पं परमं पदं ॥
भाः स्वात्मनीव कचति न कचत्येव तत्पदं ॥
स्पंदास्पंदस्वभावं हि चिन्मात्रमिह विद्यते ॥
स्पंदात् स्फुराति चित्सर्गः निस्पंदात् ब्रह्म शाश्वतं ॥

अर्थ—आत्मवस्तु स्वतः निस्पंद जरी आहे, तथापि त्याच्या मायारुप चिद्रूप स्वभावामुळें असें वाटावें कीं, हा पुरुषकर्मात्मक स्पंद त्याचे ठिकाणीं खराच आहे. पण तो या ठिकाणीं खरा नाहींच. गारोड्यांनीं केलेले पैसे वास्तविक ती माती असून पाहाणाराला ते खरेच आहेत असें वाटतें. त्याप्रमाणें येथें स्पंद नसून तो खरा आहे असें वाटतें. ह्मणून या मायिक स्पंदाची मिथ्या उत्पत्ति आहे असें समज. आत्मा स्फुरद्रूप नसून तो स्फुरद्रूप झाल्याचे सारखा आहे. हा एकंदर वरील श्लोकांचा भावार्थ जाण. बाकीचा अर्थ स्पष्टच आहे.

एकस्मिन्नेव संशांते दिक्कालाद्यविभागिनी ॥
विद्यमाने परे तत्वे कलनावसरः कुतः ॥ ६४ ॥
सत्यत्वं च यथा स्वप्ने संकल्पनगरादिषु ॥
नास्त्येव सत्यनुभवे तथा नास्त्यैव ब्रह्मणि ॥ ६५ ॥
यथा नास्त्यंबरे पांसु तथा नास्ति परे कला ॥

(ब्रा. प्र. ३ अ. २१)

अर्थ—आत्मा, खरोखर देशकालवर्जित असून शांत जर आहे, तर ही स्पंदात्मक कलना होण्याला त्याचे ठिकाणीं अवसर म्ह० जागा असणार कोठून ? स्वप्नांतील किंवा मनोराज्यांतील, नगरादिकांना जितकें सत्यत्व आहे, तितकेंच प्रारब्ध, प्रयत्न, जीव, ईश वगैरे या सर्व पदार्थांना सत्यत्व आहे. जसा आकाशांत कण वगैरे कोणताही पदार्थ उत्पन्न होणें संभवत नाहीं, त्याप्रमाणें परमात्म्याचे ठिकाणीं (ह्मणजे आपलेच ठिकाणीं) हा स्पंदात्मक विकार झाला नाहीं. आत्मा शांत, आहे तसाच आहे.

सर्वमेव मनोमात्रभ्रांत्युल्हासविजृंभितं ॥
इदं जगत्तया राम प्रस्फुरत्यंबुभंगवत् ॥

अर्थ—हें सर्व जगत् व त्यांतील प्रारब्धादि सर्व वाद वगैरे केवल मनोमात्र असून भ्रांत्युल्हासानें स्फुरद्रूप झाल्याचेच परी आहेत. यापलीकडे कांहीं नाहीं. मागें सांगितलेला चित्स्पंद हा सुद्धां कल्पनामय आहे. किंवा मिथ्या कल्पना हेंच त्याचें स्वरूप होय. आतां "एकोऽहं बहुस्यां" या श्रुतीनें आत्म्याचे ठिकाणीं 'मी एकाचा अनेक होईन' असें स्फुरण झालें ह्मणून जें सांगितलें, तें अध्यारोपदृष्टीनेंच सांगितलें आहे, खरें नाहीं. किंवा तें शबल ह्मणजे मायाविशिष्ट ब्रम्हाचे ठिकाणीं झालें, शुद्धाचे ठिकाणीं नाहीं, असा या श्रुतीचा अभिप्राय आहे. स्फुरण हा मायेचाच स्वभाव आहे, आत्म्याचा नाहीं. माया ह्मणजे चित्स्वभाव, किंवा मिथ्या कल्पना, असा माया शब्दाचा अर्थ आहे. मग ती कल्पना आपली असो, कीं ईश्वराची असो, दोघांच्या कल्पनेचें स्वरूप एकच. फक्त एक लहान आणि एक मोठी एवढाच भेद होय. माया कशी असते, हें जाणण्याची ज्याला इच्छा असेल, त्यानें आपल्या स्वतःच्या कल्पनेला जाणण्यास सुरवात करावी. ह्मणजे जाणतां जाणतां त्याला कल्पनेचा किंवा मायेचा प्रत्यय न येतां, स्वात्मप्रत्ययच अनुभवास येतो. कल्पना हा कांहीं एक पदार्थ नसल्यामुळें, पाहतां पाहतां पाहाणेपणाची कल्पना नाहींशी

होऊन शेवटीं केवळ पहाणेपणाच प्रकाशित होतो.

" मनसा मन आलोक्य स्वयमात्मा प्रकाशते "
इति सदाचारे आचार्योक्तिः प्रमाणं ॥

असो—तात्पर्य, अहंस्फूर्तिरूपानें उत्पन्न झालेला जो हा कर्माकर्मात्मक स्पंद, चित्रांतील मनुष्यांच्या कल्पनास्पंदाप्रमाणें किंवा स्वप्नस्थ पुरुषाच्या अहंस्फूर्तिप्रमाणें आत्म्याचे ठिकाणीं वंध्यापुत्रवत् अत्यंत मिथ्यास्वरूपानें राहात आहे, आणि या मिथ्या स्पंदाची किंवा स्फुरणाचींच प्रारब्ध, प्रयत्न, जीव, ईश, कर्माकर्म, वगैरे अनेक नांवें असल्यामुळें, या तुझ्या तीन प्रकारच्या वादाला कितपत सत्यत्व आहे व तसेंच यासंबंधानें केलेल्या व्यावहारिक सिद्धांतालाही कितपत सत्यत्व असेल, याचा तूंच आपल्या मनाशीं विचार कर. अरे! ' न कश्चित् जायते जीवः' आत्म्याचे ठिकाणीं कर्मकर्त्या जीवांचाच मूळांत असंभव असल्यामुळें, तेथें शुभाशुम किंवा प्रारब्धप्रयत्नादि कर्म संभवणार कोठून? व कर्माचाच असंभव ठरल्यावर मग तत्संबंधानें होणारा वादविवाद आणि त्यांत ठरलेले सिद्धांत, हे स्वप्नस्थ वृत्तापैकींच ठरणार नाहींत काय? अर्थात आतांपर्यंत या प्रकरणांत झालेल्या सर्व कल्पना लघु स्वप्नाप्रमाणेंच या दीर्घ स्वप्नांतील असल्यामुळें, सर्वच मिथ्या आहेत. स्वप्नांत आपणांस अनेक शुभाशुभ क्रिया करीत असल्याचा प्रत्यक्ष देखावा जरी दिसत असला, तरी त्या ठिकाणीं आपल्या हातून वास्तविक कोणतीही क्रिया घडत नसते. त्याप्रमाणें या व्यावहारिक जागृतींत होणारे सर्व कर्तृत्वभोक्तृत्वादि व्यवहार आपण करीत असल्याचा. आपणांस प्रत्यक्ष जरी अनुभव येत असतो; तथापि हा व्यवहार अविद्याकल्पित असल्यामुळें आत्म्याचे ठायीं रज्जुसर्पवत् अत्यंत मिथ्या आहे. व हा प्रत्यक्षपणाचा अनुभवही मिथ्या आहे. कारण तूं असें पाहा कीं, कोणतेंही कर्म घडण्यास हस्तपादादि अवयवांची किंवा देहाची आवश्यकता असावी लागते. पण " अप्राणो ह्यमनाः शुभ्रः " या श्रुतीवरून आत्म्यास प्राण, मन, देह आणि किंवा कोणतेंही

अवयवच जर नाहींत, तर त्याचे ठिकाणीं किंवा त्यापासून हा शुभाशुभात्मक कर्मस्पंद उत्पन्न होणार कोठून ? कारण, स्पंद उत्पन्न होण्याला प्राण आणि मन यांची अपेक्षा लागते. ते तर आत्म्याचे ठायीं नाहींत. आणि

" निष्कलं निष्क्रियं शांतं आदिमध्यांतवर्जितं "

ही श्रुति आत्मा आदिमध्यांतरहित असून निष्कल, निष्क्रिय ह्म० अकर्मस्वरूप आहे व शांत आहे असें सांगत आहे. मग त्या ठिकाणीं कर्ता, कर्म, क्रियापद वगैरे हीं सप्तविध कारकें असणार कोठून ? ह्मणून हा कर्माकर्मविकर्मादि वाद किंवा प्रारब्धप्रयत्नादि वाद व त्यासंबंधीं श्रेष्ठत्व-कनिष्ठत्वकल्पना या सर्व मिथ्या आहेत. अरे ! तूं असें पहा कीं, एखाद्या मूर्ख व्यक्तीनें असा प्रश्न केला कीं, रज्जूवरील सर्पाचा खालचा दांत श्रेष्ठ का वरचा श्रेष्ठ? किंवा वंध्यापुत्र आकाशांत राहतो का पृथ्वीवर राहतो ? या प्रश्नाचें उत्तर काय देणार ? तसेंच प्रारब्ध श्रेष्ठ कां प्रयत्न श्रेष्ठ, याचा निर्णय. वशिष्ठ म्हणतात: —

न वयं निर्णयं विद्मः वंध्यापुत्रगिरामिव ॥
न निर्णयः संभवति खपुष्पाणां किमुच्यते ॥
निर्णय एष यवात्र यदशेषमभावयन् ॥

खपुष्पाचा स्वाद कसा ? याचा निर्णय करण्याची अक्कल आह्मांला नाहीं. वंध्यापुत्राच्या भाषणाचा अर्थ आम्हांला करतां येत नाहीं. वशिष्ठ म्हणतात, याचप्रमाणें पारमार्थिकदृष्ट्या वरील प्रश्नाचें उत्तर आम्हांला देतां येत नाहीं. कसलीच भावना न करतां स्वस्थ बसणें हेंच याचें उत्तर.

शिष्या ! याप्रमाणें तूं प्रथमतः असा प्रश्न केलास कीं, प्रारब्ध, प्रयत्न, व ईश्वर या तीन वादांपैकीं प्राधान्यता कोणाला ? तर या तुझ्या प्रश्नाचें या पारमार्थिक विचाराच्या बाजूनें काय उत्तर असावें याचा तूंच आतां विचार कर. आह्मांला यावर स्वस्थ बसण्याखेरीज दुसरें उत्तर समजत नाहीं. स्वप्नस्थ वृत्ताप्रमाणें व्यावहारिक दृष्टया तुझ्या सर्व प्रश्नांचें उत्तर काय द्यावयाचें, तें सर्व मागील व्याख्यानांत आह्मीं दिलेंच आहे.

पारमार्थिक दृष्टया मिथ्या वस्तूची काथ्याकूट करीत बसणें म्हणजे व्यर्थ कालक्षेप करणें होय. यापलीकडे दुसरें कांहींएक त्यांत फल दिसत नाहीं. वास्तविक पाहतां—

न कश्चिज्जायते जीवो संभवोऽस्य न विद्यते ॥
ह्येतत्तदुत्तमं सत्यं यत्र किंचिन्न जायते ॥

या गौडपादाचार्यांच्या कारिकेवरून आत्मवस्तूचे ठिकाणीं तात्विक दृष्टया हा जीव—ईश्वरात्मक स्पंद मूळांत उत्पन्नच जर झाला नाहीं, तर मग कोठचा प्रयत्न व कसले प्रारब्धादि भाव सत्य मानतोस? अरे! हा कर्म-कर्तृत्वादि स्पंद केवळ मायामय ह्मणजे कल्पनामय असल्यामुळें यासंबंधानें कोणत्याही वाद्यानें कोणचाही जरी सिद्धांत ठरविला तरी तो कल्पनामूलक असल्यामुळें केव्हांही मिथ्याच ठरणार. ह्मणून कर्म, अकर्म, विकर्म किंवा संचित, क्रियमाण, प्रारब्ध, आणि जीव, ईश्वर, जगत्, व कर्ता, कर्म, करण, वगैरे इत्यादि जो हा भास होतो, यालाच 'मिथ्या प्रत्यय' किंवा भ्रम असें ह्मणतात. वास्तविक परमात्म्याचे ठिकाणीं (ह्मणजे आपले ठिकाणीं) या सर्वांचा अत्यंत अभाव आहे. हाच खरा पारमार्थिक अचल सिद्धांत होय. पण हें अजातसिद्धांताचें रहस्य लक्षांत येणें योग्य अधिकाऱ्यावांचून इतरांना अत्यंत दुर्घट आहे. कारण "अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिं" अशा अधिकाराचा पुरुष जगांत फारच विरळा. "कर्मण्यकर्म यः पश्येद-कर्मणि च कर्म यः। स बुद्धिमान् मनुष्येषु०' हा गीतेंतील अजात सिद्धांताचा श्लोक ज्या महात्म्याच्या बुद्धीवर यथार्थ ठसला असेल, तोच जगांत बुद्धिमान् व तोच धन्य होय. असो—शिष्या! आत्तांपर्यंत या सर्व प्रकरणांत एकंदर जी आमची भाषा झाली या सर्व भाषेचें सारभूत रहस्य दोन शब्दांत तुला सांगून हें प्रकरण संपवितों. नीट लक्षपूर्वक ऐक. हा जगद्विषयक किंवा देहविषयक भ्रम, कोणत्याही कारणामुळें व कोणींही उत्पन्न केलेला नाहीं. हा, आपले ठिकाणीं पदार्थाच्या छायेप्रमाणें मिथ्याप्रत्यय-रूप असूनही अनादि कालापासून सत्यत्वानें रूढ झाला आहे. व हाच

द्वैतभावनेला व सुखदुःखाला कारण आहे. म्हणून हा स्वतःचा भ्रम स्वतःच स्वस्वरूपविचारानें निवृत्त केला पाहिजे. येवढें मनुष्याच्या स्वाधीन आहे. हा भ्रम निवृत्त झाल्यावर तत्कार्यभूत वासना वगैरे आपोआप निवृत्त होतात. त्यांच्या निवृत्तीला निराळा आणखी प्रयत्न करावा लागत नाहीं. हा भ्रम, स्वतःच्या विचाररूप प्रयत्नावांचून ईश्वर, गुरु, प्रारब्ध किंवा अन्य कोणाकडूनही व कोणत्याही उपायानें निवृत्त होणार नाहीं. कारण हा ईश्वरादिकांनीं किंवा दुसऱ्या कोणीं जर उत्पन्न केला असता, तर त्याची दुसऱ्याकडून निवृत्ति झाली असती. पण तो स्वतःचे ठिकाणीं स्वतःच्या अविचारानेंच स्वभावसिद्ध असल्यामुळें त्याची निवृत्ति स्वप्रयत्नानेंच केली पाहिजे. हा भ्रम, स्वात्मबोधानंतरच मिथ्या ठरतो. तोंपर्यंत सत्य आहे. हा अनादि जरी आहे, तरी प्रागभावाप्रमाणें सांत आहे. सांत आहे, म्हणूनच त्याला प्रयत्नानें नष्ट करण्याचें मनुष्याधीन आहे, हें वर्म लक्षांत ठेव. आतां लक्षांत ठेवण्यासारखें दुसरें एक रहस्य असें कीं, भ्रम-निवृत्ति झाल्यावांचून जगांतील कोणत्याही गोष्टीविषयीं न्यूनाधिक भाव करण्याचें सामर्थ्य कोणांतही नाहीं. कारण भूत, भविष्य आणि वर्तमान, या तिन्हीं कालांत होणारे व न होणारे जेवढे भाव आहेत, हे अनादि कालापासून चित्रपटांतील देखाव्याप्रमाणें स्वभावसिद्ध ठरलेलेच आहेत. त्यांत प्रयत्नेंकरून न्यूनाधिकभाव होणें कधींही शक्य नाहीं. वर निर्दिष्ट केलेल्या या जगाच्या अचल नियतींत भ्रमनिवृत्ति होणें एवढें मात्र ठरलेलें नाहीं. ह्मणून जें ठराविक नाहीं, तेवढें मात्र प्रयत्नानें न्यूना-धिक करतां येतें हें लक्षांत ठेव. भ्रम किंवा अज्ञान हें जगदंतःपाती नाहीं. तर जगत् हें कार्य आहे व भ्रम त्याचें कारण आहे. ह्मणून भ्रम हा जगां-तील नियतीपैकीं ठराविक नाहीं, ह्मणूनच तो प्रयत्नानें जाण्यासारखा आहे. आतां जगांतील ठराविक नियतीविषयीं उदाहरण तूं असें पहा कीं, रवि-वाराच्या पुढें मंगळवार किंवा शनिवार कधींही येणार नाहीं. तसेंच दिवसा-नंतर रात्रच येणार. सुखानंतर दुःखच येणार. तसेंच अग्नि कधींही प्रयत्नानें पाणी होऊं शकणार नाहीं व पाणी कधींही वायु होणार नाहीं. तात्पर्य,

जें होणार तें होणारच व न होणार तें होणार नाहींच. असा जर जगांतील सर्व विषयांसंबंधानें निश्चित ठराव, स्वभावसिद्ध आहे, तर मग जगद्विषयक चिंतन व प्रयत्न करण्यांत फळ काय? ह्मणून वामनपंडित म्हणतात,

होणार होइल अशा दृढ निश्चयातें ।
घेतां प्रयत्न न घडे सुखनिस्पृहातें ॥
या कारणें सकळ टाकुनि लोकधंदा ।
चित्तीं धरा दृढ मुकुंदपदारविंदा ॥ १ ॥

तात्पर्य, सत्संगति व सच्छास्त्रश्रवणानें स्वस्वरूपविषयक भ्रमनिवृत्ति केली असतां त्यांत सर्व कांहीं इष्ट साध्य होतें. असो. बोलावें तितकें थोडेंच. " यथेच्छसि तथा कुरु "

ॐतत्सत् श्रीकृष्णार्पणमस्तु ।



" वासिष्ठादि सर्वसिद्धांतसार "

यांपैकीं छापून तयार झालेलीं आमचीं प्रकरणें:—

(१) आत्मसाक्षात्कार, किं. ८ आणे.

(२) प्रारब्धप्रयत्नादि भेदवादखंडन, किं. १२ आणे.

(३) वेदस्तुतींतील " सत इदमुत्थितं " आणि एकादशांतील " लोके व्यवायामिषमद्यसेवा " हे दोन्ही श्लोक, पाध्ये यांच्या टीकेनुसार श्रीधरी टीकेचे मराठी सुबोध भाषांतरासह समग्र व्याख्यानरूपानें तयार केले आहेत. दोहोंची मिळून किंमत ८ आहे.

मिळण्याचा पत्ता—

(१) सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, घर नं. ५८ शनवार पेठ, पुणें.

(२) महादेव गोविंद भिडे, घ. नं. ६९९, सदाशिव पेठ, पुणें.

(३) विष्णुपंत मचाळ, घ नं. ५७८, कसबा पेठ, पुणें शहर.

चित्रावशास्त्री यांचीं पुस्तकें.

(सार्थ, सटीप व विस्तृत प्रस्तावनेसह)

(१) संध्या ॥२ (२) ब्रह्मयज्ञ ॥२ (३) वैश्वदेव ॥२ (४) पूजा ॥३ (५) श्राद्धप्रयोग ॥१० (६) हिंदुधर्मतत्त्वसंग्रह ॥२ (७) धर्मशिक्षण ॥२ (८) यज्ञोपवीतसंस्कार ॥२ (९) शुद्धिसंस्कार ॥६ (१०) चौलसंस्कार ॥२ (११) उपनयनसंस्कार ॥४ (१२) समावर्तनसंस्कार ॥२ (१३) विवाहसंस्कार ॥१२ (१४) गणेशाथर्वशीर्ष ॥२

ऋग्वेदाचें मराठी भाषान्तर—किंमत १२ रुपये; महाभाष्यशब्दकोषः—किंमत १५ रुपये; ऋग्वेदाचा उपसंहार—हीं सर्व पुस्तकें हिन्दींत तयार होत आहेत.

पत्ताः—घ. नं. ५८ शनवार, पुणें.